म. ग्रं सं. ठाणें.
निबंध
३६२

1580



REFBK-0005985

# आदर्श जीवन

# आमची कुटुंबसंस्था

पूर्वींच्या त्या कुटुंबसंस्थांचीं सुमधुर चित्रें, जरा भूतकालांत नजर टाकून पहावी. प्रपंचदक्ष गृहिणी, धनधान्यांनीं समृद्ध गृहें, त्यांमध्यें बागडणारी तेजस्वी संतति आज कोठें आहे ? हीं मुंग्यांच्या वारुळा-प्रमाणें बुजबुजलेलीं शहरें, त्यांतील ते हिडिस प्रकार अनैसर्गिक जीवन-क्रम, व खाणावळीच्या स्वरूपाची गृहें. काय शिल्लक आहे पूर्वींच्या गृहांची शोभा ?

पूर्वींच्या सुखमय संसारांत येणाऱ्या अडीअडचणींचें ज्ञान आर्य स्त्री आपल्या लेकींना देण्यास समर्थ होती. आर्यांच्या उज्ज्वल कथांनीं प्रगल्भ झालेली ती स्त्री गृहाचें भूषण होती. तिच्या दारांतून अतिथि विन्मुख जाणार नाहीं, पैपाहुणा हिरमुष्टी होणार नाहीं, तिच्या राज्याला वैभव कमी पडूं न देणाऱ्या पतीशीं ती हमरीतुमरी करणार नाहीं. अशा या प्रात्यक्षिक शिक्षणसंस्थेतून बाहेर पडलेल्या तिच्या लेकी दुसरे संसार उभेच करतील; धुळीला मिळविणार नाहींत यांत शंका नाहीं.

( आदर्श स्त्रीजीवन )

वाचा आणि विचार करा

पुस्तक २ रें

# आदर्श-स्त्रीजीवन

( केसरींतून " स्त्रियांचें समाजांतील स्थान आणि आर्यसंस्कृति "
या नांवाखालीं प्रसिद्ध झालेली लेखमाला )


...लय ठाणे
क्र. ...



लेखकः—नारायण परशुराम थत्ते.

सहाय्यकः—डॉ. सौ. मनोरमाबाई थत्ते,
एल्. एम्. ( रोटंडा, डब्लिन )
युसूफ बिल्डिंग, व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई.



REFBK-0005985


किंमत एक रुपया

मुद्रक—
जयराम दिपाजी देसाई,
राष्ट्रवैभव प्रेस,
२७३, विठ्ठलभाई पटेल रोड,
गिरगांव, मुंबई नं. ४

या पुस्तकाचे सर्व हक्क लेखकांचे स्वाधीन आहेत.

प्रकाशक—
शि. श्री. वाशीकर,
राष्ट्रवैभव प्रेस,
२७३, विठ्ठलभाई पटेल रोड,
गिरगांव मुंबई नं. ४

# आरंभीं

" वाचा आणि विचार करा " या मालेंतील आमच्या लेखांतून प्रसिद्ध होणारें पहिलें पुस्तक ' **आदर्श स्त्रीजीवन** ' आज वाचकांच्या हातीं देण्यांत मला मोठा आनंद होत आहे. " स्त्रियांचें समाजांतील नैसर्गिक स्थान व आर्य संस्कृति " या मथळ्याखालीं कांहीं दिवसांपूर्वीं हीच लेखमाला केसरींत येऊन गेली आहे. ती प्रसिद्ध होत असतांना लोकांना ती इतकी आवडली कीं, ती पुस्तक रूपानें प्रसिद्ध होणें अवश्य आहे, अशा पुष्कळ लोकांनीं आग्रहाच्या सूचना केल्या. श्रीमत् जगद्गुरू शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी यांना तर हे लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणें म्हणजे समाजदृष्ट्या एक विशेष कामगिरी बजावण्यासारखें आहे असेंच वाटत असावें असें दिसतें. पाश्चात्य विचारांशीं आमचा हरघडीं संबंध येतो कांहीं आगंतुक कारणांनीं त्यांचा आमच्यावर तात्काल परिणाम होतो व त्याप्रमाणें आपण आचरणही करूं लागतों. आर्य-संस्कृतीविषयीं आमच्या मनांत अनादर नसला तरी भडक विचारांच्या आहारीं जाऊन आपल्या हातून ज्या कांहीं कृति घडतात, त्यांतील आधुनिक स्त्रीस्वातंत्र्य आणि संततिनियमन या दोन गोष्टींवर प्रस्तुत पुस्तकांत ऊहापोह केला आहे. हा ऊहापोह मनोविश्लेषणात्मक असून मोठा मार्मिक आणि उद्बोधक आहे असेंच वाचकांना आढळून येईल. चर्चेकरतां उपयोजिलेली भाषा सडेतोड आणि जोरदार आहे. तरी चर्चा करतांना आर्य-संस्कृतीचा खोटा अभिमान धरून कांहींतरी लिहीत सुटायचें अशी लेखकांची भूमिका नाहीं, अभ्यासपूर्वक आणि निरीक्षणपूर्वक झालेल्या मतांचें निदर्शन किंवा आधुनिक रूढ विचारांची दुसरी बाजू म्हणून लोकांच्या विचारासाठीं त्यांनीं लोकांपुढें मांडली आहे. आमच्या **संस्कृतीच्या श्रेष्ठतेचें गमक** ते मोठ्या मार्मिकपणें सांगतात.

"जगाच्या पाठीवर आजपर्यंत अनेक संस्कृति झाल्या. खाल्डियन, रोमन, ग्रीक, सुमेरियन किती तरी संस्कृति जगाच्या पाठीवर नांदून गेल्या आहेत. केवढी त्यांचीं तीं वैभवें आणि काय त्यांचा तो दिमाख पण आज त्यांचीं प्रतीकें उकरून काढावीं लागत आहेत. या संस्कृतीच्या नाशांच्या इतिहासाची छाननी आपण करूं लागतों त्यावेळीं प्रामुख्यानें एकच गोष्ट--आपल्या नजरेस येते, ती म्हणजे या संस्कृतींनीं, आपल्या उत्कर्षाच्या आणि विकासाच्या सर्व कल्पना सदासर्वकाळ बदलणाऱ्या जातिवंत अशा आधिभौतिक सुखवादावर अवलंबून ठेविल्या, आणि जडवादाच्या नादाला लागल्यानें दुरभिमान, हिंसाप्रवृत्ति इत्यादिकांच्या आहारीं गेलेल्या या संस्कृतींची आपल्या वैभवांतच आपल्या नाशाचीं बीजें पेरून ठेविलीं. सांस्कृतिक अभ्युदयांतील हा दोष ज्यांनीं काढून टाकला व **स्थिर, अविनाशी अशा अध्यात्मतत्वावर** ज्यांनीं आपल्या संस्कृतीची उभारणी केली, ते या सर्वनाशी कालाला बगल देऊनही स्थिर राहिलें; आणि अशी उच्च दर्जाची संस्कृती आज जगावर एकच नांदते आहे. ही **आर्यसंस्कृति, हिंदुसंस्कृति होय.**"

डॉ. सौ. मनोरमाबाई थत्ते यांनीं संततिनियमनाच्या व्यावहारिक इष्टानिष्टतेवर लिहिलेलें एक प्रकरण या पुस्तकाला जोडलें आहे. संततिनियमनाची अनिष्टता सांगतांना त्यांनीं या चळवळीचा इतिहास, आपलें डॉक्टरी ज्ञान, आणि चळवळीचे दृश्य परिणाम हीं चांगलीं विचारांत घेतलीं असल्यामुळें त्यांच्या लेखाला विशेष महत्त्व आहे.

या पुस्तकाच्या वाचनानें वाचकांच्या विचारांना एक नवीन चालना मिळेल अशी मला खात्री वाटते.

**शि. श्री. वाशीकर.**

## श्रीमत् शंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) नाशिक यांच्याकडून आलेला

# आशीर्वाद

'स्त्रियांचें समाजांतील नैसर्गिक स्थान व आर्य संस्कृति'—या विषयावर केसरींतून प्रसिद्ध झालेले १२ लेख, निराळे पुस्तकरूपानें लेखकांनीं प्रसिद्ध करण्याचें मनावर घेतलें हें फार योग्य झालें. ती लेखमाला केसरींतून आलेली ज्यांनीं वाचली त्यांना आतां नवीन असें कांहीं वाटत नसलें तरी ते सर्व निरनिराळ्या अंकांतून आलेले लेख एकत्र पुस्तकरूपानें वाचावयास मिळणें हाच काय तो विशेष होय.

आर्य-वंशीयांच्या मनांत आर्य-संस्कृतीविषयीं एक प्रकारचा अभिमान जागृत नसला तरी जिवंत असतो हें मार्मिक रीतीनें बघणाऱ्या कोणाच्याही ध्यानीं आल्यावांचून रहाणार नाहीं. परंतु त्या संस्कृतीचें वैशिष्ट्य काय आहे हें बहुजनांना समजत देखील नाहीं मग दुसऱ्यांना समजावून देणें तर दूरच! ज्याप्रमाणें आपल्या प्राचीन पूर्वजांविषयीं अभिमान वाटतो त्याचप्रमाणें सद्यःकाळीं पाश्चात्यांच्या विचारानें आपले डोळे दिपून गेल्यामुळें त्यांविषयीं आपणांस आदर वाटतो आणि तसें आचरण करण्याची आपली प्रवृत्तिही होते. अशावेळीं आपल्या समाजांतील महत्त्वाचा भाग गणल्या जाणाऱ्या स्त्रीवर्गाविषयीं आर्य-संस्कृतीची विचारसरणी संक्षेपानें कां होईना पण स्पष्ट रीतीनें या लेखांत मांडली गेली, ही फार उपयुक्त गोष्ट झाली. केवळ एकाच दिशेनें वाहून जाणाऱ्या आपल्या समाजाला दुसऱ्या दिशेची कल्पना आली तरी दोन्हींची तुलना करून आपणांस व्यवहारांत फार कठिण जाणार नाहीं आणि हितकारक होईल असा मार्ग ठरविण्यास अवसर मिळेल. ह्या दृष्टीनें पहातांना या लेखांतील कितीतरी विचारांचा सुपरिणाम झाल्यावांचून रहाणार नाहीं. कांहीं कांहीं विषयांचें अधिक स्पष्टीकरण पाहिजे होतें, परंतु संक्षेपानें लिहावयाचें असल्यामुळें तितका विस्तार करितां आला नाहीं. यामुळें त्याविषयीं कांहीं जनांच्या मनांत शंका येऊं शकतील त्याही त्यांनीं त्याचप्रमाणें वर्तमानपत्रांतून स्पष्ट रीतीनें प्रसिद्ध केल्यास त्यावर चर्चा होऊन निश्चित असें

स्वरूप उघडकीस येऊं शकेल, आणि इति कर्तव्यता–मूढ झालेल्या आतांच्या हिंदुसमाजाला स्त्रियांच्याविषयीं तरी आपलें कर्तव्य पार पाडण्याची वाट अशा विकट परिस्थितींतून सांपडेल.

यास्तव पुस्तकरूपानें या लेखांच्या प्रकाशनाविषयीं प्रोत्साहन देण्यास संतोष वाटतो. आणखी एक अभिनंदनीय गोष्ट म्हणजे, या लेखांचे लेखक आणि त्यांच्या सहधर्मिणी हे दोघे लेखनव्यवसायांतील नसूनही त्यांच्या लेखनशैलीकडे पाहिल्यास कौतुकच वाटण्यासारखें आहे. यापुढेंही या दंपतीकडून अशा प्रकारची समाजसेवा आणि वाङ्मयसेवा एकाच वेळीं साधेल अशी सत्क्रिया घडो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

---

# अनुक्रमणिका


१ **व्यक्ति, कुटुंब आणि समाज ऋण**—संस्कृतीच्या श्रेष्ठतेच गमक; आत्मविकासाला प्राधान्य; समाजरचनाकारांचें कर्तव्य; आमची कुटुंब संस्था; सध्यांचें स्त्रीशिक्षण; स्वातंत्र्य कीं स्वैराचार? १–११

२ **आजचें स्त्रीस्वातंत्र्य म्हणजे स्त्रियांची आत्महत्या**—लैंगिक विचार व अमरत्व; चांगलें व वाईट; तडफदार अगर उत्साही माणसाचा स्वभावधर्म; मुलांची उत्साही वृत्ति; मोठ्या कुटुंबांत राहण्याचा फायदा; सर्वत्र स्त्रिया सारख्याच; मावन जीवनांत स्त्रियांचें महत्त्व; दुःखाचें मूळ; अनीति हीच नीति; विद्वानांचा मूर्खपणा; ही स्त्रियांचीं आत्महत्या. १२–२६

३ **स्त्री जन्माचें सार्थक–जातिसंवर्धन**—मुलांची अंतःप्रेरणा; शरीरसंवेदनेचा विपर्यस्त परिणाम; एक संवाद; विद्याप्रेमाची खरी भूमिका; धंदेवाईक जातिरचना. २७–३४

४ **आदर्श–स्त्रीजीवन म्हणजे गृहस्वामित्व**—स्त्रियांच्या संवेदना; पुरुषांची वासनातृप्ति; स्त्रीजन्माचें सार्थक; स्त्रियांना कोणता पुरुष आवडतो; आधुनिक स्त्रियांतील फरक; निसर्गाची ओढ; आंधळें प्रेम; पुरुषद्वेष्ट्या कुमारिका; विवाहसंस्था व कुटुंबसंस्था; भावी पिढ्यांची घडण; स्त्रियांच्या आनंदाचा ठेवा. ३५–४९

५ **पाश्चात्य जीवनाकडे ओझरती नजर**—स्त्रीजीवनांतील सौख्याचा साठा; स्त्रियांचे प्रमाद; निसर्गाचे कायदे व मनुष्याचे कायदे; पुरुषांची भूक; अष्टपुत्रा सौभाग्यवती भव; संतति-नियमन; घटस्फोटाचें धंदेवारी प्रमाण दाखवणारा तक्ता; कुमारिकांचा शिक्षण व्यवसाय. ५–६२

६ **स्त्री गुणदोष चर्चा**—स्त्रियांचे दुर्गुण; स्त्रियांची गुलामगिरी; पुरुषांचा दोष नाहीं; स्त्रियांची कर्तबगारी; मूर्तिमंत निसर्ग; स्त्रिया व संततिनियमन; स्त्रियांवरील आरोप; स्त्रियांना पुरुषां[illegible]व: पाश्चिमात्य कुमारिका; स्त्री ही धोंड आहे; स्त्रिया व राजकारण. ६३–७८

७ **तुझें आहे तुजपाशीं**—बालविवाहापासून फायदे; मानसिक प्रभाव; पुनर्विवाहासंबंधीं निर्बंध; देहपावित्र्य व नियोग पद्धति; नैतिक व बौद्धिक सामर्थ्याची आवश्यकता; आमची स्वाभिमानशून्यता. ७९–८८

८ **भपक्याला भुलूं नका**—पाश्चिमात्य स्त्रियांचीं भडक चित्रें; जीवनोपयोगी कार्याचें मोल; बालविवाहाची उपयुक्तता, दीर्घायुष्य कोणास लाभतें; क्षयरोगाचा प्रादुर्भाव; अविभक्त कुटुंबपद्धति व विधवा स्त्रिया; पाश्चात्य स्त्रीचें हिडिस स्वरूप; आर्थिक स्थितीचा बाऊ. ८९–१०२

**संतति नियमन आणि लोकसंख्या**—अपवाद हा नियम नव्हे; नीतिविरुद्ध ओरड; मोठ्या कुटुंबाची भीति; कुटुंब-वाढीची अनर्थ परंपरा; कर्तबगारीला पुरुषांचा अपत्यक्रम; वाढत्या लोकसंख्येची आपत्ति? १०३–११८


# कै. ती. लक्ष्मीबाई थत्ते



आदर्श—स्त्रीजीवन लिहिण्यास
माझ्यापुढें जो आदर्श होता
त्या प्रेमळ मातेच्या चरणीं

नारायण.

श्री. नारायण परशुराम थत्ते



# आदर्श स्त्रीजीवन

## १ : व्यक्ति, कुटुंब आणि समाजऋण

एका विख्यात इंग्लिश कवीची एक कविता आहे; आमच्या विषयास आरंभ करतांनाच आम्हांला त्या कवितेची आठवण झाली. कविता फारशी मोठी नाहीं, पण तींत प्रतिपादन केलेलें तत्त्व मात्र खास मोठें आहे, " ओझामांडियस " नांव या कवितेचें. कालप्रवाहांत सांपडून छिन्नविछिन्न होऊन गेलेल्या एका महाप्रतापी राजाच्या राज्याचें व त्याच्या स्वतःच्या पुतळ्याचें वर्णन त्यांत केलें आहे. कवितेंतल्या प्रवाशाला एका प्रचंड वाळवंटांतून प्रवास करीत असतांना हा पुतळा दिसला आणि त्या मोडूनतोडून पडलेल्या पुतळ्याचे चौथऱ्यावर जो मजकूर खोदला होता त्यावरून त्या प्रवाशाला कळलें कीं, हा पुतळा राजाधिराज ओझामांडियसचा ! त्याला कळलें कीं, याच विस्तारलेल्या वाळवंटावर, स्मशानभूमीसारख्या ओसाड रौद्र अशा जागेवर या ओझामांडियसची सौंदर्यसंपन्न नगरी होती, त्याचे बागबगीचे आणि विलासमंदिरें होतीं, आणि आतां मात्र तेथें फक्त वाळवंटाचा पसारा. सृष्टिदेवतेच्या अमानुष सामर्थ्यानें त्या सर्वांची विल्हेवाट लावली होती. कालाच्या प्रचंड ओघांत तें सर्व वाहून गेलें होतें. उमरखय्यामच्या जडवादाशीं ज्या आमच्या सुशिक्षित बंधुभगिनींचा परिचय आहे त्यांना यांतील मर्म निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. मनुष्यानें अमर्याद खटपटीनें निर्माण केलेलें वैभव, हें कालाचें भक्ष्य आहे. ही गोष्ट आजपर्यंत आम्हांपैकीं प्रत्येकजण शिकत आलेला आहे. परंतु इतकें असूनहि मानवानें कांहीं आपला हव्यास सोडलेला नाहीं; आणि त्याचें कारण मनुष्यस्वभाव ! जगाचा इतिहास काढून पाहिला तर मानवी कल्पनेनें

निश्चित केलेल्या त्याच्या आरंभकालापासून एकच गोष्ट दिसून येते, ती हीच कीं, प्रत्येक कालखंडांतील मानव समाजानें विशिष्ट सुखकल्पना मनाशीं धरून त्यांच्या तृप्त्यर्थ धडपडी केल्या आणि आजहि पण तीच गोष्ट आपल्या नजरेपुढें दिसत आहे. सुखकल्पना असणें, तिच्या तृप्तीची धडपड करणें या गोष्टी इतक्या स्वाभाविक आहेत कीं, त्यांना निर्बंध घालणेंच मुळीं अशक्य आहे, अशी स्थिति असली तरी जगाचा सर्व दृष्टींनीं विकास करूं म्हणणाऱ्यांनीं मानवांच्या या सुखकल्पनांना योग्य वळण देऊन एका विशिष्ट वर्गाचें अगर पंथाचें हितानहित न पाहतां उभ्या मानवजातीचें हित करतील अशा सुखकल्पनांची धारणा मानवी मनांत होईल या दृष्टीनें खटपट करणें अवश्य आहे.

## संस्कृतीच्या श्रेष्ठतेचें गमक

जगाच्या पाठीवर आजपर्यंत अनेक संस्कृति झाल्या; त्यांचीं वर्णनें आपणांस वाचावयास मिळतात व त्यांचे अवशेषहि आपणांस वस्तु-संग्रहालयांत पाहावयास मिळतात. खाल्डीयन, रोमन, ग्रीक, सुमेरियन किती तरी संस्कृति या जगाचे पाठीवर नांदून गेल्या आहेत, केवढी तरी तीं त्यांचीं वैभवें, आणि काय तो त्यांचा दिमाख. परंतु आज ! आज त्यांचीं प्रतीकें उकरून काढावीं लागत आहेत. हजारों वर्षांपूर्वी अस्तित्वांत असलेलें त्यांचें वैभव आज नाममात्र आहे. मानवांचें आयुष्य क्षणभंगुर आहे. त्याचप्रमाणें मानवानेंच निर्माण केलेल्या संस्कृतीसारख्या संस्थांचें आयुष्य क्षणभंगुर ठरावें ही खेदाची, व त्या संस्कृतीला अस्तित्वांत आणणाऱ्या मानवांच्या भ्रामक कल्पनांची द्योतक गोष्ट आहे. या संस्कृतींनी जगावर काढलेलें आयुष्य ज्या प्रमाणांत कमी अधिक दिवस काढले त्याच प्रमाणांत त्यांच्या अनुयायांच्या सांस्कृतिक कल्प-नांच्या उच्चनीचतेचा अंदाज करण्यास हरकत नाहीं. या नष्ट संस्कृतींच्या नाशाच्या इतिहासाची छाननी ज्या वेळीं आपण करूं लागतों, त्या वेळीं प्रामुख्यानें एकच गोष्ट आपल्या नजरेस येते; ती म्हणजे या संस्कृतींनीं

आपल्या उत्कर्षाच्या व विकासाच्या सर्व कल्पना सदासर्वकाळ बदलणाऱ्या जातिवंत अशा आधिभौतिक सुखवादावर अवलंबून ठेविल्या आणि जडवादाच्या नादाला लागल्यानें दुरभिमान, हिंसाप्रवृत्ति, इत्यादिकांच्या आहारीं गेलेल्या या संस्कृतींनीं आपल्या वैभवांतच आपल्या नाशाचीं बीजें पेरून ठेविलीं. सांस्कृतिक अभ्युदयांतील हा दोष ज्यांनीं काढून टाकला, व स्थिर अविनाशी अशा अध्यात्म तत्वावर ज्यांनीं आपल्या संस्कृतीची उभारणी केली, ते या सर्वनाशी कालाला बगल देऊनहि स्थिर राहिले; आणि अशी उच्च दर्जाची संस्कृति आज जगावर एकच नांदत आहे कीं जीमुळें आपण आज हजारों वर्षें या जगावर नांदत आहोंत आणि पुढेंहि नांदूं. ही संस्कृति आर्यसंस्कृति, हिंदू-संस्कृति होय! ही संस्कृति किती जुनी आहे, हें निश्चित सांगतां येत नाहीं इतकी ती जुनी आहे. इच्या मागून आलेल्या कितीतरी संस्कृति आल्या आणि गेल्या पण हजारों वर्षें ही संस्कृति मात्र आपलें रंगरूप टिकवून आहे व तशी ती पुढेंहि राहाणारच याबद्दल फारशी शंका नाहीं. या संस्कृतीनें खरोखरीच चमत्कार करून दाखविला. कारण जगांतील कोणत्याच संस्कृतीला जी गोष्ट साध्य झाली नाहीं ती या संस्कृतीनें साध्य करून दाखविली आहे. आणि याचें खरें रहस्य तिच्या पायाच्या स्थिरतेंतच आहे. आधिभौतिक सुखवादाला यांत महत्त्व नसून आध्यात्मिक विकासाला यांत वाव आहे. आणि म्हणूनच आमच्या समाजरचनेंत त्यागाच्या भूमिकेला महत्त्व देऊन भोगाला तुच्छ लेखण्यांत आलें आहे. या विशिष्ट तत्त्वावर समाजधारणा केल्यानें, लुबाडण्यापेक्षां एकमेकांला पूरक होण्यांतच समाज–घटक धन्यता मानूं लागले. नाशाला व क्रूरतेला फाटा मिळून प्रेमाची अभिवृद्धि झाली. "आत्मवत् सर्वभूतानि" मानण्याची प्रवृत्ति असल्यानें मानवांतील उदात्त भावनांचा प्रकर्ष होऊन समाज उत्कर्ष-प्रवण झाला. जडवादाप्रमाणें या उत्कर्षाचें परिमाण संपत्तींत व वैभवांत जरी राहिलें नाहीं, तरी तो स्थिर व मानसिक

दृष्ट्या महत्त्वाचा असा झाला. आणि म्हणूनच या संस्कृतीनें उभारलेलीं मानव्याचीं दिव्य उत्कर्ष मंदिरें हजारों वर्षे टक्केटोणपे खाऊनहि आज त्याच स्थितींत जगाला आदर्श होण्याच्या तयारीनें उभीं आहेत.

आर्यसंस्कृतीचा हा विशेष लक्षांत घेतल्यानंतर आतां या समाजाकडे वळण्यास हरकत नाहीं, समाज हा शब्द उच्चारतांच आपण शंका प्रदर्शित करूं कीं आज हिंदुस्थानांत अनेक धर्मांचे व पंथांचे समाज अस्तित्वांत आहेत. अशा सर्व समाजांची जी एक भेसळ तिचा विचार कर्तव्य नाहीं. अशा मिश्र समाजाला अनुसरून आम्हांस कांहीं सांगावयाचें नसून, फक्त हिंदु समाज-घटनेंतील स्त्रियांचाच फक्त विचार कर्तव्य आहे.

## आत्मविकासाला प्राधान्य

व्यष्टि म्हणजे व्यक्ति. या व्यक्तींच्या समुदायाला समाज म्हणतात. ज्या वेळीं अनेक कारणांनीं अशा व्यक्तींचे हितसंबंध एका विशिष्ट सांचांत बसतात त्या वेळींच समाजांतील शासन-संस्थांचा उदय होतो. आणि मगच देशकाल आचारविचारमर्यादा अस्तित्वांत येतात. अर्थात् या आचारविचारांचा संबंध निवळ स्वार्थाशींच व बाह्य जड वस्तूशींच असेल, अमर्याद आधिभौतिक सुखोपभोगाकडेच असेल, तर कांहीं काळ समाज उन्नत झाल्यासारखा आपणांस दिसतो, पण त्याबरोबरच त्याचा नाशहि तितक्याच लवकर झालेला दिसतो हें आम्हीं सांगितलेंच आहे. आणि म्हणून आमच्या पूर्वजांनीं जर फार मोठी काळजी समाजाच्या चिरकालतेच्या दृष्टीनें घेतली असेल, तर ती हीच कीं, मनुष्याच्या उत्कर्षाची कल्पना उपभोग्य पदार्थांच्या समृद्धीवर न ठेवितां, आत्मविकासाला प्राधान्य दिलें व तीच गोष्ट आज समाजसत्तावाद कांहीं निराळ्या दृष्टीनें करूं पाहतो. आणि अशा समाजरचनेंत वावर-ण्याचें भाग्य आपणांस लाधलें आहे.

समाज हा विराट–पुरुष कल्पिल्यानंतर त्याला अर्धनारीनटेश्वराचें रूप आहे हेंहि आपणांस विसरून भागणार नाहीं. त्याचा अर्धा भाग स्त्रीचा

आणि अर्धा भाग पुरुषाचा आहे. या विराट घटनेमध्यें स्त्री आणि पुरुष सामील आहेत. अर्थात् वरील घटनेच्या स्थैर्याची सर्व जबाबदारी या दोनहि वर्गांवर आहे, मग श्रेष्ठ-कनिष्ठ वाद कोठें निर्माण होतो हेंच कळत नाहीं. कर्तव्यभिन्नता ही आवश्यक गोष्ट आहे. समाजाच्या स्थैर्याला या दोन घटकांची जशी आवश्यकता आहे, तशीच त्यांच्या कार्यभिन्नत्वाचीहि आहे. दोनहि वर्ग एकच कार्य करूं म्हणतील, तर समाजाच्या संस्कृतीचा नाश झाल्याशिवाय राहणार नाहीं. कार्यभिन्नत्वाबद्दल कोठेंच मतभेद होणार नाहीं, मतभेद काय तो वाटणीच्या वेळीं. परंतु कार्यविभागणीचा प्रश्न सोडवण्यापूर्वीं आणखी कांहीं गोष्टी विचारांत घेतल्यास वावगें होणार नाहीं.

## समाजरचनाकारांचें कर्तव्य

व्यक्ति म्हणतांच आपण एक मनुष्य–प्राणी, मग ती स्त्री असो अगर पुरुष असो एवढाच अर्थ घेतों; परंतु अशा व्यक्ति स्वतंत्र व एकलकोंडेपणानें आपलें आयुष्य कंठूं शकत नाहींत, हा निसर्गनियम आहे. स्त्री असेल तर पुरुष व पुरुष असेल तर स्त्री एकमेकांला पूरक आहेत. अशी एक अमोघ लालसा परमेश्वरानें मानवी मनांत निर्माण करून ठेवली आहे कीं, या दोन भिन्न शरीररचनेच्या व्यक्तींनी एकत्र आल्याविना सृष्टीचें गाडेंच मुळीं सुरळीत चालू शकत नाहीं. अशा एकत्र आलेल्या व्यक्तींच्या मनांत स्वाभाविकच जे प्रेमबंध निर्माण होतात ते त्यांना क्वचितच विभक्त होऊं देतात. अशा स्थितींत अपत्यजन्मामुळें त्या प्रेमबंधनाची गांठच जणूं या तीन्ही व्यक्तीच्या ठिकाणीं बांधली जाऊन हा एक लहानसा गटच निसर्गाच्या प्रेरणेनें निर्माण होतो. आणि अशा गटालाच आपण कुटुंब ही संज्ञा देतों. म्हणजे कुटुंब ही निसर्गाची क्रिया आहे. आणि माणसानें त्यांत आपल्या बुद्धीची भर घालून त्याला नीटनेटकें स्वरूप दिलें आहे, एवढाच अर्थ होतो. अर्थात् असे लहान लहान गट निर्माण होतांच त्यांचें परस्परावलंबित्व वाढतें. एका गटाला

दुसऱ्या गटाची मदत घेण्याचा प्रसंग येतो. अशा प्रकारानें एकमेकांशीं निगडित झालेले गट एखादी वसाहत करून स्थिर होतांच त्याला आपण गांव अशी संज्ञा देतों. म्हणजे समाज म्हटल्यावर व्यक्ति, कुटुंब, गांव अशा पायऱ्या चढाव्या लागतात व त्यांतील प्रत्येक पायरीचें स्थैर्य तेंच समाजाचे स्थैर्य! कित्येक यंत्रें अशीं असतात कीं, त्यांमध्यें दात्यांचीं पुष्कळ चक्रें असतात. एका चक्राचे दाते दुसऱ्या चक्राच्या दात्यांत बसवून दिले असल्याकारणानें मुख्य शक्ति एकाच चाकावर कार्य करीत असूनहि या यंत्राचें काम अगदीं सुरळीत चालूं असतें. परंतु यांत अशी गंमत आहे कीं, एका चाकाचे दाते निसटले कीं, थांबलें सर्व यंत्राचें काम! समाज हें एक असेंच यंत्र आहे. त्यांतील कोणत्याहि एका घटकांत घोटाळा झाला किंवा त्यानें आपलें कार्य सोडलें कीं, सर्व समाजांत घोटाळा झाला म्हणून समजावें. आणि एवढ्याचसाठीं समाजघटक सुस्थितींत राहतील, त्यांचा तोल सुटणार नाहीं अशीच व्यवस्था समाज–रचनाकारांना करावी लागते. आतां आम्हीं आमच्या मूळ प्रश्नाकडे वळतों.

एखादें काम एखाद्या व्यक्तीवर सोंपविलें जात असतांना त्या व्यक्तीच्या नैसर्गिक कुवतीचा विचार करावा लागतो, आणि तो जर केला नाहीं तर कार्यहानी होते. मनुष्य–प्राण्यांमध्यें जसा कुटुंबपद्धतीचा फैलाव झाला, तसा त्या कुटुंबांतील व्यक्तींना कुटुंबपोषक-संवर्धक अशा कार्याला वाहून घ्यावें लागलें व कुटुंबाची अंतर्गत सुस्थिति व त्याच्या पोषणाची जबाबदारी अशीं दोन कामें कुटुंब–स्वास्थ्याच्या दृष्टीनें आवश्यक ठरलीं. अर्थात् त्या काळीं कोणतीं कामें कोणीं करावींत हा कांहीं विधिनिषेध नसेलच, परंतु स्त्रीची स्वाभाविक शरीररचना, गरजा, मनःप्रवृत्ति व सामर्थ्य या सर्वांनीं तिला गृहराज्याची स्वामिनी केली असली पाहिजे. आणि नंतर बऱ्याच दिवसांच्या अनुभवांतीं हा सिद्धांत ठरला कीं, स्त्री ही गृहाची स्वामिनी असावी. व हा सिद्धांत

लक्षांत ठेवून आतां आपण प्रथमपासून त्या दृष्टीनें भेद करूनच आपल्या अपत्यांना कार्यक्षम करण्याचें शिक्षण देतों व आजपर्यंत देत होतों. स्त्री आणि पुरुष यांच्या प्रकृतिभिन्नत्वानें त्यांच्या कार्यांमध्यें जरूर तें भिन्नत्व पाहिजे हें आतांच येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं; कारण आमच्या लेखमालेंत आम्हीं तेंच प्रतिपादन करणार आहों. आणि हीं दोनहि भिन्न कार्यें कुटुंबाला व समाजाला सारखींच पोषक ठरल्यानंतर मग त्यांत श्रेष्ठकनिष्ठभाव राहिला कोठें? समाजाला आवश्यक कुटुंब व कुटुंब म्हणजे स्त्री-पुरुषांचा गट—कीं जो समाजाच्या प्रथमावस्थेंत नैसर्गिक भुकेनें व्यक्ति एकत्रित झाल्यानें निर्माण झाला, पण स्थैर्याच्या दृष्टीनें मानवी बंधनांनीं व शासनसंस्थांनीं मर्यादित केल्याकारणानें अविभक्तच राहिला. या कुटुंबांतील व्यक्तींना एकत्र टिकविण्याच्या दृष्टीनें जसा शासनसंस्थांचा उपयोग झाला, तसा नैसर्गिक प्रेमबंधनांचाहि झाला. आणि प्रेमांत भोगापेक्षां त्यागाचें अधिष्ठान अधिक असल्यानें अगदीं अभूतपूर्व अशी कुटुंबसंस्था या आर्यावर्तांत अस्तित्वांत आली.

## आमची कुटुंबसंस्था

पूर्वींच्या त्या कुटुंबसंस्थांचीं सुमधुर चित्रें जरा भूतकालांत नजर टाकून पहावी. प्रपंचदक्ष गृहिणी, धनधान्यांनीं समृद्ध गृहें, त्यांमध्यें बागडणारी तेजस्वी संतति आज कोठें आहे? हीं मुंग्यांच्या वारुळाप्रमाणें बुजबुजलेलीं शहरें, त्यांतील ते हिडिस प्रकार अनैसर्गिक जीवनक्रम, व खाणावळीच्या स्वरूपाचीं गृहें. काय शिल्लक आहे पूर्वींच्या गृहांची शोभा? अर्थात् हा दोष आपला नाहीं. ही सर्व घडी विस्कटून टाकणाऱ्या परकीय हाताचा आहे. परंतु त्याचबरोबर त्या परकीय हातानें आपल्या विचारसरणीला व प्राचीन परंपरेला धक्का द्यावा याचें आम्हांला आश्चर्य वाटतें. आपल्या मनामध्यें जो बदल झाला, त्या बदलामुळें आपण आज आपल्या हातांनीं आपल्या संस्कृतीचा पाया उखडून काढून आपल्या नाशाची तयारी करीत आहोंत. जडवादाला नसतें प्राधान्य देऊन

त्यागाऐवजीं स्वार्थाची भाषा ज्या दिवशीं सुरू झाली त्याच दिवशीं या प्राचीन संस्कृतीच्या नाशाचा पाया घातला गेला, असें आम्हांला म्हणावेसें वाटतें. स्त्री-पुरुष ज्या दिवशीं आपल्या कर्तव्याविषयीं साशंक झाले त्याच दिवशीं त्यांच्या कुटुंबसौख्याचे बारा वाजले! पूर्वीच्या सुखमय संसारांत येणाऱ्या नडीअडचणींचें ज्ञान आर्यस्त्री आपल्या लेकींना देण्यास समर्थ होती. आर्यांच्या उज्ज्वल कथांनीं प्रगल्भ झालेली ती स्त्री गृहाचें भूषण होती. तिच्या दारांतून अतिथि विन्मुख जाणार नाहीं, पैपाहुणा हिरमुष्टी होणार नाहीं, तिच्या राज्याला वैभव कमी पडूं न देणाऱ्या पतीशीं ती हमरीतुमरी करणार नाहीं. अशा या प्रात्यक्षिक शिक्षणसंस्थेंतून बाहेर पडलेल्या तिच्या लेकी दुसरे संसार उभेच करतील; धुळीला मिळविणार नाहींत यांत शंका नाहीं.

इंग्रजींत एक म्हण आहे "सांडल्या दुधाबद्दल दुःख करूं नये" तसेंच आतां ज्या गोष्टी नष्ट झाल्या, अगर झाल्यागत दिसतात, त्यांबद्दल खेद प्रदर्शित करीत न बसतां त्यांच्यावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीनें थोडाफार विचार करणें प्राप्त आहे.

## सध्याचें स्त्री-शिक्षण

सध्यां स्त्रियांमध्यें शिक्षणाचा वाढता प्रसार होत असल्याचें पाहून आनंद प्रदर्शित करण्यांत येतो; पण या शिक्षणामुळें स्त्रियांच्या भावी जबाबदारीची काय जाणीव त्यांना झाली? ती पार पाडण्यांस त्यांना त्या शिक्षणानें किती समर्थ केलें याचा काडीमात्र विचार कोणी करीत नाहीं, ही आश्चर्याची गोष्ट आहे. स्त्रियांना मातृत्व व अपत्यसंगोपन चुकणार नाहीं आणि नाना उपायांनीं त्या तें टाळण्याचा प्रयत्न करतील तर आपला व उभ्या मानव जातीचा पुढें बळी देतील हें आम्हीं प्रतिपादन करीत आहोंतच. मग क्रमप्राप्त गोष्टीबद्दल कांहीं तरी तजवीज होणें जरूर नाहीं काय? अपत्यसंगोपनाची काय माहिती या शिक्षणांत भावी मातेला मिळते? या भावी गृहिणीला गृहकृत्यांची कोणती माहिती या

शिक्षणांत मिळते? भगिनीनो! आपल्या गृहाचें सौंदर्य व सुखसमाधान नष्ट न व्हावें, आपलें भावी आयुष्य म्हणजे ओसाड वाळवंटांतील प्रवास न होता नंदनवनांतील विहार व्हावा, असें तुम्हांस वाटत असेल तर भावी जबाबदारी ओळखूनच तुम्हांला आपल्या शिक्षणाची व कार्याची दिशा ठरविली पाहिजे. स्त्रीशिक्षणाचा आणि सुधारणेचा हा सध्यां चालू असलेला सारा खटाटोप स्त्रियांच्या व पर्यायानें समाजाच्या नाशाची पूर्व तयारी करीत आहे. त्याला आळा घालण्यास आतां सर्वांनीं तयार झालें पाहिजे. प्रत्येक गोष्टींत आज आपण परक्यांच्या सल्ल्यानें चालत आहोंत. आपलें सर्व त्याज्य, अशी चुकीची समजूत सर्वांच्या बुडाशीं आहे. आपल्या संस्कृतीचें लेणं आपल्या पूर्वजांनीं आपल्यापर्यंत आणून दिलें आहे. तें पुढच्या पिढीच्या स्वाधीन निर्भेळपणें करण्याची जबाबदारी आपणांवर आहे. या दृष्टीनें आपल्या मुलाबाळांना धडे दिले पाहिजेत.

आम्हीं मागें सांगितलेंच आहे कीं, समाजव्यवस्थेंतील अनेक घटकांपैकीं कुटुंब हा एक महत्त्वाचा घटक आहे. आणि हा घटक जर ढांसळला, त्यांत जर बिघाड झाला तर त्याचे दुष्परिणाम समाजाला सोसावे लागतात, आणि म्हणूनच कुटुंबाचें स्थैर्य बिघडूं नये या दृष्टीनें खटपट करणें हें जसें प्रत्येक आर्यपुरुषाचें तसेंच आर्यस्त्रीचेंहि कर्तव्य आहे. किंबहुना ही जबाबदारी स्त्रियांपेक्षां पुरुषांवर अधिक आहे असें आमचें स्पष्ट मत आहे. लोक कदाचित् आमच्या विचारांना प्रतिगामी म्हणतील, पण आम्हांला ते पुरोगामीच वाटतात. समाजाचा विकास व सौख्यसंवर्धन प्राचीन समाजरचनेंमुळें जितकें होईल, तितकें आजच्या या दिखाऊ तत्वज्ञानानें होणार नाहीं. कारण मानवस्वभावाचें सूक्ष्म परीक्षण यांत नाहीं. मानवावरील निसर्गधर्माच्या वर्चस्वाची खरी कल्पना न झाल्यामुळें आजची नवी म्हटली जाणारी विचारसरणी पुढें आणण्याचें धाडस कांहीं लोक करीत आहेत, आणि म्हणून स्त्रियांच्या

मनोधर्माचें व शरीररचनेचें सूक्ष्म परीक्षण करून त्याचें समाजरचनेंतील स्थान स्पष्ट करण्याच्या हेतूनें आम्हीं ही लेखमाला लिहीत आहोंत.

## स्वातंत्र्य का स्वैराचार ?

आपणां सर्वांना आमची विचारसरणी पटेलच असें आम्हांला गृहीत धरावयाचें नाहीं. आमचा दृष्टिकोन काय आहे तो आम्हीं आपणांपुढें मांडणार आहोंत. Movement towards perfect freedom अशी विकासाची–उत्क्रांतीची व्याख्या कांहीं तत्त्वज्ञांनीं केली आहे. मानवांची आत्यंतिक स्वातंत्र्याकडील गति म्हणजे उत्क्रांति, ही विचारसरणी खरोखरच चुकीची आहे. कारण पूर्ण स्वातंत्र्याची व्याख्याच करणें अशक्य आहे. व्यक्तीच्या स्वैराचाराला स्वातंत्र्य म्हणतां येईल काय? आणि स्वैराचारानें समाज उत्क्रांत होईल काय? स्वैराचारानें समाजाचा नाश होतो, हें आपणांस दिसतच आहे. मनुष्याचे नियंत्रण योग्य प्रकारानें झालें नाहीं तर वैयक्तिक दुर्गुणामुळें अघोर कृत्यें मानवांचे हातून घडतात, असें आपणांस पदोपदीं दिसत आहे नियंत्रणांत मानवांचें मानव्य सांठविलें आहे. नियंत्रणानेंच विकास होतो. नियंत्रणाचा पाया मात्र अनुभवावर पाहिजे. ज्याला बहुजन समाजाच्या गरजांचा, तज्ज्ञांच्या शहाणपणाची जोड नाहीं अशीं बंधनें आपण पाळूं नका; परंतु वाळल्याबरोबर ओलेंहि जाळूं नका. आपली दृष्टि दूषित झाली म्हणजे चांगल्या गोष्टीहि वाईट दिसूं लागतात हा दृष्टिदोष काढून टाकिला पाहिजे.

निव्वळ जडवादाचाच आश्रय न करतां आपल्या आजपर्यंतच्या समाजरचनेचें व त्यांतील स्त्रियांच्या स्थानाचें परीक्षण करा, आपल्या संस्कृतीच्या स्थैर्याचा व तिला स्थैर्य प्राप्त करून देणाऱ्या वृत्तीचा विचार करा आणि मग आमची खात्री आहे कीं, आपल्या आज झालेल्या सर्व कल्पना खास बदलतील, आणि याच दृष्टीनें आम्हीं स्त्रियांचें व त्यांच्या समाजरचनेंतील स्थानाचें परीक्षण करण्याचें योजिलें आहे.

आयुष्यक्रम यशस्वी होण्यास स्त्रीपुरुषांना आपल्या कर्तव्यांची व परस्परसंबंधाची योग्य जाणीव झाली पाहिजे. त्याचप्रमाणें स्त्रीपुरुष-संबंध हा केवळ त्यांच्या पुरताच मर्यादित नसतो; भावी मानववंशाच्या स्थिरतेचें एक ऋण त्यांचेवर असतें हेंहि त्यांस विसरून भागणार नाहीं. स्त्रीपुरुषांच्या परस्परसंबंधाची सुरुवात लैंगिक आकर्षणापासून होते व ही महत्त्वाची बाब असल्यानें किंबहुना जीवनाचा मध्य येथें असल्यानें याचें महत्त्व पुढें प्रतिपादन करून क्रमाक्रमानें आम्हीं मानव्याच्या एकंदर जबाबदारीचें परीक्षण करणार आहों. स्त्रीजीवनाचें परीक्षण करतांना पुरुषांना दूर ठेवून भागत नाहीं. परंतु पुरुषांचा विचार प्रामुख्यानें न करतां स्त्रीजीवनाचा एक भाग या दृष्टीनेंच त्याच्याकडे आम्हीं पाहणार आहोंत.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. निबंध ६६२
ता. ३०|५|
ठाणे.

## २ : आजचें स्त्रीस्वातंत्र्य म्हणजे स्त्रियांची आत्महत्या.

सृष्टींतील जीवसृष्टीचा कालक्रमें नाश करणारा मृत्यु हा एक मोठा कूट प्रश्न आहे. अनेक तज्ज्ञांनीं अनेक तऱ्हांनीं त्याचा विचार करूनहि हा प्रश्न अद्यापपर्यंतहि अज्ञात, अगम्य असाच राहिला आहे. आणि तो पुढेंहि पण तसाच राहील यांत शंका दिसत नाहीं. निसर्गानें मात्र याला एक तोडगा काढलेला आहे. मृत्यूमुळें घसाऱ्याला लागणारा जीव-सृष्टीचा तराजू तोलून धरण्यासाठीं म्हणून त्यानें जननाची जोड जीवमात्राला करून दिली आहे, जाणि त्यामुळें मृत्यूचें कार्य अव्याहत चालूनहि प्राणिसृष्टि आहे तशीच स्थिर आहे. जुन्या पिढ्या मृत्यूनें हाणून काढल्या न काढल्या तोंच नवीन पिढ्या त्यांची जागा घेण्यास तयार असा हा खेळ सतत चालू आहे.

प्राणिमात्राला मृत्यु न टळणारा असल्यानें प्राण्यांची उत्पत्तिहि पण न टळणारी अगर टाळतां न येणारी अशीच राहिली पाहिजे; आणि प्राण्यांची उत्पत्ति लैंगिक व्यवहाराशीं संलग्न असल्यानें मृत्यूला पराभूत करण्यास लैंगिक आचार अर्थात् नवजीवन-निर्मिति हाच एक राजमार्ग होय. मृत्यूचें जगांतील स्थान नष्ट झालें, जगांतून मृत्युच नाहींसा झाला तर अर्थातच जनन नष्ट होणें, म्हणजेच लैंगिक आचार नष्ट होणें भाग आहे. प्राण्यांनीं हरप्रयत्नानें लैंगिक आचार अगर त्याचे परिणाम नष्ट केले, पण त्यांना अमरत्व मिळालें नाहीं तर जीवसृष्टि नाहींशी होऊन जाईल ही गोष्ट उघड आहे. जनन आणि मरण हे जीवमात्राचे परस्पर पूरक असे घटक आहेत. जननोद्देशपूर्वक झालेला लैंगिक आचार म्हणजेच मृत्यूचा पराभव! जीवनाचा नाश करण्यास टपलेल्या या राक्षसाला बरोबर पराभूत करण्याचा हा एकच सर्वोत्कृष्ट मार्ग आहे. आणि म्हणूनच मानवांच्या लैंगिक आचाराव्यतिरिक्त अमरत्वाची कल्पना

फोल आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मानवसमाज अमर करण्यास लैंगिक आचाराची निसर्गसिद्ध योजना शाबूत राखणें अत्यंत आवश्यक आहे, याच्या अगदीं विरुद्ध समीकरण मांडून कोणी असेंहि म्हणतील कीं, अमरत्व मिळविण्यास लैंगिक आचारापासून पूर्णपणें अलिप्त राहणें हा एकच उपाय आहे. आमच्यांतील संपूर्ण ब्रह्मचर्य व अमरत्व यांची कल्पना याच तत्त्वावर उभारण्यांत आली असावी. जननव्यवहारापासून अलिप्त राहण्यानें व्यक्ति अमर होण्यास हरकत नाहीं असा हा सिद्धांत आहे.

## लैंगिक विचार व अमरत्व

मृत्यु आहे म्हणून जनन आहे. याच्या उलट जनन नाहीं म्हणून मृत्यु नाहीं असें समीकरण रचण्यांत आलें असावें. परंतु लैंगिक आचाराची भूक एवढ्या मोठ्या प्रमाणांत विधात्यानें प्राणिमात्राच्या ठिकाणीं निर्माण करून ठेविली आहे कीं, प्राणिमात्रांचा लैंगिक आचार सुटणें अशक्यच आहे. अतएव मृत्यूहि अपरिहार्य आहे आणि ही गोष्ट विचारांत घेतां मुसलमानी धर्मकल्पना आपल्यापेक्षां साफ चुकल्या आहेत असें दिसून येतें. हिंदुधर्मांतील स्वर्गाच्या कल्पनेंत अप्सरा उपभोगण्याची लालूच आहे, त्याजबरोबर पुण्यक्षयाबरोबर स्वर्गांतून च्युत होण्याचीहि धमकी आहे, म्हणजे या ठिकाणींहि लैंगिक आचाराशीं मृत्यु हा संलग्न ठेवण्यांत आलेला आहे. परंतु मुसलमानी धर्मानें अमरत्वालाच लैंगिक आचाराची जोड दिली आहे. अर्थात् ही गोष्ट तर्कशून्य आहे. इंग्रजींतील You cannot eat your cake and have it too या म्हणींतील मख्खीसुद्धां हीच आहे. आपल्या हातांतील रोटी एक खातांतरी येईल किंवा तशीच ठेवून तरी देतां येईल; पण दोन्हीं गोष्टी एकदम होणें शक्य नाहींत. तीच गोष्ट वरील व्यवहाराची. लैंगिक आचार आणि अमरत्व या दोनहि गोष्टी एकदम मिळणें शक्य नाहीं, म्हणूनच हिंदुधर्मशास्त्रानें अमर व्यक्ति मारुतिराय, अश्वत्थामा या पूर्ण ब्रह्मचारी दाखविल्या.

वरील विवेचनावरून एक निश्चित तत्त्व निघतें तें हें कीं, जे कोणी लैंगिक आचाराला तुच्छ लेखतात, त्यांच्यांशीं पापाचा संबंध जोडतात, त्यांच्याविरुद्ध काहूर उठवितात ते मृत्यूची बाजू उचलून धरतात. परंतु जे जननोद्देशपूर्ण लैंगिक आचाराची योग्यता, आवश्यकता व पावित्र्य प्रतिपादन करून त्याचें महत्व जाणतात ते जीवसृष्टीच्या शत्रूशीं, प्रत्यक्ष मृत्यूशीं सामना देण्यास तयार असतात. या ठिकाणीं आपलीं पुराणें तर्कशुद्ध पायावर उभीं आहेत असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. कारण तीं अमरत्वाचे गोडवे गातात म्हणून लैंगिक आचाराला दोष देतात! अमरत्वाची आणि लैंगिक आचाराची जोड घालण्याचा तर्कहीन मूर्खपणा तरी ते करीत नाहींत. लैंगिक आचार म्हणून मृत्यु अगर मृत्यु म्हणून लैंगिक आचार, कोणतेंहि समीकरण घेतलें तरी व्यक्तिमात्राला लैंगिक आचार सुटूं शकत नाहीं एवढी गोष्ट निर्विवाद आहे. मग लैंगिक आचारामध्यें अनैतिक कांहीं आहे असें वाटण्याचें कारण काय? ( याचा अर्थ लैंगिक स्वातंत्र्य असा मात्र नाहीं. हा प्रश्न आम्हीं पुढें विचारांत घेणार आहोंत ) आणि लैंगिक आचार अनैतिक नाहीं असें म्हटल्यानंतर स्त्री म्हणजे पाप आहे, भवसागरांत बुडविणारी धोंड आहे. पुरुषाला पापप्रवृत्त करणारी मायाविनी आहे इत्यादि कल्पना, आधिभौतिक दृष्टीनें त्याज्यच ठरतात.

सामान्य माणसें नेहमीच्या चाकोरींतून जाणारी असल्यानें, त्यांनीं अशाश्वत असा हा आयुष्यक्रम स्वीकारलेला असतो व त्याखेरीज त्यांना गत्यंतरहि पण नसतें, या आयुष्यक्रमांतील क्रमप्राप्त व्यवहाराशीं समरस होण्यांतच त्यांचें समाधान असतें. जगांत असामान्य माणसें हाताच्या बोटावर मोजण्याइतकींच असतात, त्यामुळें त्यांच्या आचारविचारांची छाननी करीत बसण्यांत फारसें तात्पर्य नाहीं.

सर्वसामान्य माणसांना प्राप्त आयुष्यक्रमाखेरीज दुसरा मार्ग स्वीकारण्याची कुवत वा प्रवृत्ति नसल्यानें आलेल्या परिस्थितींतच उल्हसित

वृत्ति ठेऊन कालक्रमणा करणें अवश्य आहे. ही सृष्टि आपलें घर आहे अर्थात् आपण तिचा अभिमान बाळगला पाहिजे. या गृहाची योग्य प्रकारें रचना करण्याचा, त्यांतील वस्तूंची मांडामांड करण्याचा आपणांस पूर्ण अधिकार आहे. या अशाश्वत जीवनक्रमांत सुखदु:खाची जोड आहे, परंतु या दुकलीशींहि सारख्याच उत्साहानें तोंड देण्याची वृत्ति संपादन करण्यांत एक प्रकारची मजा आहे. दु:खापुढें माघार घेण्यांत तात्पर्य नाहीं. अगर दु:ख आहे म्हणून भीतीनें त्याचा वाढावा करण्यांत व जीवित त्याज्य मानण्यांत अर्थ नाहीं. दु:खापुढें माघार घेण्याची वृत्ति भ्याडपणाची आहे, मानवांचा इतिहास हा त्याच्या पराक्रमाचा, वेडर वृत्तीचा व त्यांनीं निसर्गावर मिळविलेल्या विजयाचा इतिहास आहे आणि ही परंपरा कायम ठेवण्याची वृत्ति म्हणजेच आयुष्यक्रमाकडे हसतमुखानें पाहावयास लावणारी मानवांची तडफदार उत्साह वृत्ति होय.

आमचीं कर्तव्यें कांहीं सामान्य नाहींत. त्यांमध्यें अनेक गोष्टींचा समावेश होतो; परंतु त्यांतील मुख्य भाग म्हणजे अशाश्वत असा हा आयुष्यक्रम सुखी करून घेणें हा होय. आणि या दृष्टीनें काय केलें पाहिजे, काय न केलें पाहिजे, कोणत्या गोष्टी त्याज्य समजाव्या, कोणत्या स्वीकाराव्या, कशाला वाईट म्हणावें, कशाला चांगलें म्हणावें इत्यादि गोष्टींचें एक शास्त्र करणें व तें पाळणें आवश्यक आहे.

अशाश्वत अशा या आयुष्यक्रमाला पोषक व त्यांतील सुखांना संवर्धक, त्याचप्रमाणें याच आयुष्यक्रमांतून जाणाऱ्या जीवांची वाढ होण्याच्या दृष्टीनें आवश्यक अशा सर्वच गोष्टी चांगल्या असा एक सर्वसाधारण नियम या ठिकाणीं करण्यास हरकत नाहीं. या पुढील लिखाणांत ज्या गोष्टी त्याज्य म्हणून ठरविण्यांत येतील त्या अर्थात् आमच्या मतानें आमच्या वरील नियमाला बाधक अशाच असतील असेंही गृहीत धरण्यास हरकत नाहीं.

## चांगले व वाईट

आपले सर्व व्यवहार सुरळीत चालून आपला आयुष्यक्रम हवा हवासा वाटावयास लावणारी प्रत्येक गोष्ट मतानें चांगलीच आहे. भूक, इच्छा, तृष्णा, मातृत्व, पितृत्व, देहासंबंधीं आदर, आत्मप्रियता, प्रेम, जनन, सौंदर्य, त्याचें संवर्धन आणि द्विगुणीकरण या गोष्टी जशा चांगल्या म्हणून दाखवितां येतील तशाच अन्यायाची, किळसवाण्या प्रकारांची, कृष्णकृत्यांची चीड, व्यभिचारातिरेकाबद्दल तिरस्कार इत्यादि गोष्टीहि पण चांगल्यांतच जमा होतील. भुकेचा नाश, असमाधान वृत्ति, भोगेच्छालोप, आजार कीं, ज्या गोष्टी या आयुष्यक्रमाला विघातक ठरतात, त्या केव्हांहि वाईट या सदरांतच पडणार! अर्थात् प्रथम निवेदिलेल्या गुणधर्मांचा परिपोष कोणत्या तत्वावर व समाजरचनेवर समाजामध्यें जास्तींत जास्त करतां येईल हें पाहणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे व बहुजन समाज यानेंच सुखी होणार आहे. आपण मात्र मनाशीं एवढी खूणगांठ बांधली पाहिजे कीं, उत्तम आदर्श आयुष्यक्रमाला पोषक ते चांगले व त्याच्याशीं विरोधी ते वाईट आणि ही गोष्ट लक्षांत ठेवून आयुष्यक्रमाशीं सामना देणारी तडफदार मंडळी आपण उत्साही या सदरांत घालूं व येथें कच खाणाऱ्या अगर भ्याड वृत्ति प्रकट करणाऱ्या मेंग्या लोकांना 'निरुत्साही' म्हणूं आतां अशाश्वत आयुष्यक्रम, अमरत्व, लैंगिक आचार व यांच्या परस्पर संबंध इत्यादि गोष्टी थोड्या बाजूस सारून वरील दोन वृत्तीच्या माणसांचा विचार करण्यास हरकत नाहीं.

## तडफदार अगर उत्साही माणसाचा स्वभावधर्म

आजारी, अशक्त, नाजूक अशा मुलांखेरीज बहुतेक सर्व मुलें उत्साही असतात, सृष्टिदेवीच्या पदराखालून नुकतेच उजेडांत आलेले ते देवदूत आहेत. जिवंतपणाचे, नवचैतन्याचे मूर्तिमंत फवारे म्हणजेच मुलें. त्यांनीं अद्याप चूक केलेली नाहीं आणि चूक म्हणजे काय याची कल्पनाहि पण त्यांना नाहीं. आयुष्यांत निराश करणारे, धमक चुरडून

टाकणारे, परिस्थितीचे कठोर तडाखे कीं जे मानवांचा तेजोभंग करण्यास सदैव सज्ज असतात ते त्यांना बसलेले नसतात. आयुष्यांत उत्साहाखेरीज त्यांना दुसरें कांहींच दिसत नसतें. जणुं कांहीं इतस्ततः बागडणारी कोकरेंच ! आयुष्यक्रमाकडे पाहण्याची त्यांची ही उत्साही दृष्टि, वृत्ति, अज्ञानामुळें अगर निर्मळ अंतःकरणामुळें त्यांना प्राप्त झालेली असते. एखाद्या तत्त्वज्ञान्यालासुद्धां मुग्ध करणारी ही मुलांची वृत्ति कायम राखणें अवश्य आहे. परंतु जी वृत्ति अज्ञानामुळें आज दिसते तीच कायम ठेवण्यास पुढील आयुष्यक्रमांत बौद्धिक सामर्थ्याची गरज लागते ही गोष्ट तितकीच खरी आहे. परंतु मूळ मुलांतच वरील वृत्तीचा अभाव असेल ती उपजतच मुलाचे ठिकाणीं नसेल, तर ती प्रौढपणीं कोठून येणार ? उत्साही मुलांतूनच उत्साही पुरुष निर्माण होतो–होणें शक्य आहे. मुलांना आपल्या या उत्साहाचा अर्थ सांगतां येणार नाहीं. प्रौढपणीं तेवढी गोष्ट त्याला करतां येईल एवढाच फरक ! !

उत्साही लोक आपल्या आयुष्यक्रमाला कांहीं विशेष महत्त्व आहे या भावनेनें वागतात, आयुष्यक्रमाकंडे काळजीपूर्वक पाहण्याची त्यांची दृष्टि असते. त्यांच्या प्रत्येक कृतीमध्यें एक प्रकारचा भारदस्तपणा असतो. लैंगिक आचारासुद्धां आयुष्याच्या प्रत्येक विभागाकडे पाहतांना आपण कांहींतरी विशेष करीत आहों, आपल्या जीवनाशीं आपल्या कृतीचा निकट संबंध आहे अशी वृत्ति ते प्रकट करीत असतात. हीं माणसें दीर्घद्वेषी न राहतां अपराध व आगळीक विसरून जाण्याकडे व क्षमा करण्याकडे त्यांचा स्वाभाविक कल असतो. आयुष्यक्रमावर विशेष आघात करणाऱ्या आकस्मिक गोष्टीसुद्धां फार काळ त्यांच्या मनाचा ताबा घेऊं शकत नाहींत. निरोगी शरीरानें ज्याप्रमाणें उपयोगी अन्नरस शोषून घ्यावेत व निरुपयोगी भाग टाकून द्यावा, त्याप्रमाणें यांचीं मनेंहि उपयोगीं विचारांचा संग्रह करीत असतात, इतर विचारांना, कल्पनांना तेथें थारा मिळत नाहीं. उत्साही माणसांचीं मनें वाईट विचार अगर

कल्पना न स्वीकारण्याच्या कामांत पूर्ण वाकबगार असतात. कोणत्याहि विचाराचें फाजील दडपण या मनावर पडत नाहीं. ग्राह्य भाग तत्काळ ग्रहण केला जातो व अग्राह्य तितक्याच जलदीनें विसरला जातो. अशा वृत्तीचीं माणसें दुःखांना भीक घालीत नाहींत. कांहीं विशेष खटपटींत झालेल्या दुःखांना अगर यातनांना तर ते मुळींच जुमानीत नाहींत.

## मुलांची उत्साही वृत्ति

लहान मुलांना उलट यांतच गम्मत वाटते. त्यांच्या कांहीं तरी उसाबरीत, खटपटींत त्यांना लागलें सवरलें तर त्यांना भानहि नसतें. आपल्या हुंदाडण्यांत व्यत्यय येतो असें दिसलें तर तो तीं हरप्रयत्नानें दूर करतील. पाऊस संततधारा ओततो आहे, म्हणून त्यांना कोठेंहि छत्रीखालून नेण्याचा प्रयत्न करा त्यांना तो जुलूम वाटेल. पावसांत जावयास नाहीं मिळालें तर निदान हात तरी छत्रीच्या बाहेर काढून पावसाच्या सरींत ते धरतील, जातां जातां डबक्यांतील पाणी पायानें उडवतील. या गोष्टी दिसतांना क्षुल्लक दिसल्या तरी त्यांत त्यांची "उत्साही" वृत्ति सूक्ष्मपणें प्रकट होते. पाण्यांत भिजणें अगर अंगावर राड उडवून घेणें या गोष्टी आपणांस खास सौख्यदायक नाहींत, परंतु मुलांना मात्र त्या आनंददायक वाटतात; याचें कारण हेंच कीं, त्यांची वृत्तीच इतकी उत्साहपूर्ण असते कीं, अवयवांना कांहीं तरी काम दिल्याशिवाय त्यांना चैनच पडत नाहीं. चिखल, पाऊस, पडझड, चाकू, कात्र्या यांसारखीं हत्यारें, उंच उंच ठिकाणें, स्फोटक पदार्थ, यंत्रें, आगगाड्या, मोटारी इत्यादि संबंधानें त्यांना इतकें आकर्षण असतें कीं, प्रसंगीं धोका पत्करूनहि त्यांच्याकडे धांव घेण्याची त्यांची जी वृत्ति असते ती त्यांच्या आरोग्याची, धडाडीची, बेडर वृत्तीची द्योतक असते. आईचा ओंचा न सोडणारीं बाळें आणि बरणींतलें लोणचें सारखींच? मुलांच्या वरील तडफदार वृत्तीला वळण द्यावयाचें असतें. तिची जोपासना ती समाजाला पोषक होईल अशाच तऱ्हेनें करावयाची

असते. आणि एवढ्याचसाठीं त्यांना त्यांच्या स्वातंत्र्याची मर्यादाहि पण शिकविण्यांत आली पाहिजे. त्याचप्रमाणें कोणत्या गोष्टी स्वीकाराव्यात व कोणत्या स्वीकारूं नयेत याचे धडेहि पण त्यांना मिळाले पाहिजेत. आणि हे धडें स्वीकारण्याला योग्य काल म्हणजेच मुलाचा अगर मुलीचा ऐन तारुण्यप्रवेशकाल होय. मुलांची अगर मुलींची पूर्ण वाढ होऊन त्यांनीं संसारांत प्रवेश करतांनाच त्यांना आपल्या आयुष्यक्रमाची पूर्ण कल्पना आलेली असली पाहिजे. माघार कोठें घ्यावी, कणखरवृत्ति कोठें प्रगट करावी याची त्यांना माहिती अवश्य पाहिजे.

## मोठ्या कुटुंबांत राहण्याचा फायदा

हरबर्ट स्पेन्सरच्या म्हणण्याप्रमाणें मोठ्या कुटुंबांतील मुलेंच लहान कुटुंबांतील मुलांपेक्षां अधिक सरस निपजतात; कारण मोठ्या कुटुंबांत पालकांना मुलांच्या व्यवहारांत ढवळाढवळ करण्यास फारसा अवसर सांपडत नाहीं. व त्यामुळें मुलांची वाढ निसर्गप्रवृत्तीला धरून होते व याचा परिणाम चांगला होतो. परंतु लहान कुटुंबांत मुलांच्यावर पालकांचें दडपण राहातें व त्यांची कुचंबणा होते. स्पेन्सरचें हें म्हणणें बऱ्याच अंशीं खरें आहे. हल्लीची ही निरुत्साही डरपोक प्रजा निवळ याचाच परिणाम आहे असें म्हणण्यास मला हरकत वाटत नाहीं. हरघडी मुलांच्या व्यवहारांत पालकांनीं ढवळाढवळ केल्यानें मुलांच्या निसर्गसिद्ध प्रवृत्ति दडपल्या जाऊन तीं चिरचिरीं व त्रासिक बनतात. मोकळ्या अंगानें हिंडणाऱ्या मुलांची कणखर वृत्ति, सदा कोणाच्या ना कोणाच्या ताब्यांत असणाऱ्या मुलांत दिसून येत नाहीं. हें अगदीं वरवर पहाणाऱ्याला सुद्धां कळून येणार आहे.

मुलांच्या उत्साहवृत्तीला पोषक अशा सर्व गोष्टी त्यांना अनुकूल करून देण्याचें कार्य मातापित्यांना करावें लागतें. अर्थात् मातापित्यांना आपलें संसारजीवन कोणत्या दृष्टीनें व्यतित केलें असता त्यांच्या अर्भकांच्या भावी आयुष्यक्रमाची कोणतीच काळजी करण्याचा प्रसंग

त्यांचेवर येणार नाहीं हें पाहणें आवश्य आहे. या दृष्टीनें स्त्रीपुरुषांच्या जीवनाचा विचार व्यक्तिशः त्यांच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें जितका आवश्यक तितकाच त्यांच्या भावी पिढ्यांच्या म्हणजे पर्यायानें अखिल मानव-जातीच्या हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे; आणि म्हणूनच स्त्रीपुरुषांच्या भूमिकांचा विचार जितक्या स्पष्टपणानें करावयास पाहिजे तितका करण्याच्या दृष्टीनें प्रस्तुत चर्चा करण्याचें योजिलें आहे.

लेखमाला लिहिण्यांत आमचा उद्देश एवढाच आहे कीं, स्त्रियांचा स्वतःसंबंधी कांहीं गैरसमज झाला असल्यास अगर तो तसा कोणी बुद्ध्याच करून दिला असल्यास तेवढा दूर करण्याचा प्रयत्न करावा ! या गैरसमजानें व्यक्तिशः त्यांचा शारीरिक व नैतिक अधःपात तर होतोच, पण त्याचबरोबर पुढील पिढ्यांनाहि त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. सध्यांचा स्त्रीवर्ग हा दुःखी व अनुकंपनीय स्थितींत आहे अशी आमची कल्पना आहे. पुरुष स्त्रियांच्या जीवनावर कांहीं परिणाम करूं शकतात, अगर त्यांच्या परिस्थितीला कारणीभूत होतात या गोष्टी एका अर्थानें खऱ्या आहेत, पण त्या रूढार्थानें मात्र नव्हेत. स्त्रियांच्या एका विशिष्ट वयोमर्यादेत जर पुरुषांशीं संबंध येण्याचा योग त्यांना आला नाहीं, अगर पुरुषांशीं संबंध येऊनहि अपेक्षित कार्यसिद्धि झाली नाहीं तर स्त्रियांच्या दुःखाला अगर बऱ्यावाईट परिस्थितीला आरंभ होतो. पुरुष आपणाप्रमाणें स्त्रिया बनवितात, या समजुतींवर माझा विश्वास नाहीं; कारण पुरुषाप्रमाणें स्त्री हि परिस्थितीनुरूप बदलणारी नाहीं. पुरुष उत्क्रांत होवो अगर अपक्रांत होवो, स्त्री ही एकाच नमुन्याची राहिली पाहिजे आणि ती तशीच रहावी अशी निसर्गाची योजना असल्यानें पुरुषांच्या सुखदुःखाप्रमाणें स्त्रियांच्या सुखदुःखांत फरक पडतोच असें नाहीं.

## सर्वत्र स्त्रिया सारख्याच

या ठिकाणीं उत्क्रांति अगर अपक्रांति या फक्त आधिभौतिक दृष्ट्याच विचारांत घ्यावयाच्या आहेत. स्त्रियांमध्यें अशा कांहीं विशिष्ट गोष्टी

आहेत कीं त्यामुळें त्या नेहमीं स्थिर, एका नमुन्यांच्या अशाच रहातात, पुरुष त्यांना कठोरपणें वागवतील, त्यांचा अधःपात करतील अगर त्यांना सौजन्यानें वागवून थोड्याफार सुखी करतील; पण त्यांना बदलूं मात्र शकणार नाहींत. काशीपासून रामेश्वरापर्यंतच काय पण जगाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जरी गेलें तरी स्त्रिया ह्या एकाच नमुन्याच्या आढळतील. पुरुषांकडून मिळणाऱ्या भिन्न भिन्न वागणुकीमुळें त्यांच्या शारीरिक स्वास्थ्यांत काय कमी अधिक फरक पडत असेल तेवढाच. म्हणून निसर्गानें त्यांजवर सोपविलेली जबाबदारी एकाच नमुन्याची असल्यानें त्यांचे गुणधर्म एकच ! पुरुषावर निसर्गानें त्या मानानें कांहींच जबाबदारी टाकलेली नाहीं. त्याची लैंगिक क्रिया पूर्ण झाली मग ती कोठें कां होईना, तो समाधान पावतो; परंतु स्त्रियांच्या बाबतींत असें नाहीं. स्त्रीसौख्याची लैंगिक क्रिया ही प्रथम पायरी आहे व यानंतरच्या सर्व पायऱ्या व्यवस्थितपणें ओलांडणाऱ्या स्त्रियाच खऱ्या सुखी असतात, हें आतां सिद्ध झालें आहे. स्त्रियांनीं स्वतंत्रपणें कांहीं कार्यभाग साधावयाचा आहे, त्यांचें स्त्रीत्व हें आणखी दुसऱ्या कशांत सांठवलें आहे, त्यांचें ध्येय अद्याप साध्य व्हावयाचें आहे या सर्व भाकडकथा आहेत. त्यावर आमचा विश्वास नाहीं, हिंदु तत्ववेत्त्यांबरोबरच नॉक्स, शॉपेनहार, नीत्से या तत्वज्ञान्यांनींहि ही गोष्ट मान्य केली आहे. पुरुषापासून विभक्त होऊन स्त्री स्वतंत्रपणें कांहीं करूं शकत नाहीं. आणि तिनें तसा प्रयत्न करतांच ती त्यांत फसते, कारण स्त्रीचें स्त्रीत्व हें पुरुषापासून विभक्त होण्यानें तिला हटकून दुरावतें.

## मानवजीवनांत स्त्रियांचें महत्त्व

एकटें राहून स्त्रीला आपलें खरें स्त्रीत्व कधींहि मिळवितां येणार नाहीं, पुरुष आणि मुलें यांपासून अलिप्त राहून अन्नपाण्यावांचून शरीरपोषण होतें असें सांगण्यापैकींच आहे. नाजूक द्राक्षवेलीला फोफावण्यास मांडवाचा अगर वृक्षाचा आधार नको असे सांगण्यापैकींच हा प्रकार

आहे, स्त्रियांचे सूक्ष्म परीक्षण करतांच त्यांचे पुढील दोन प्रकारचे संबंध अपरिहार्य आहेत हें दिसून येणार आहे, एक पुरुषाशीं व दुसरा मुलाशीं. आणि तिच्या आयुष्यक्रमाची पूर्ति या दोन संबंधांवांचून होऊंच शकणार नाहीं. तिची शरीररचना लक्षांत घेऊनहि जर कोणी स्त्रियांच्या स्वातंत्र्याची मातब्बरी वर्णन करील तर तो वेडा तरी असला पाहिजे अगर त्याच्या बुडाशीं त्याचा वैय्यक्तिक स्वार्थ तरी असला पाहिजे स्त्रियांना उद्योगधंद्याच्या हमालखान्यांत गाडून टाकतांना आपण असा विचार करीत नाहीं कीं, या रामरगाड्यांत पुरुषसौख्य आणि अपत्यसौख्य ह्या त्यांच्या जन्मसिद्ध हक्कांपासून आपण त्यांना वंचित करीत आहोंत ! त्यांच्या इंद्रियांच्या स्वभावधर्माविरुद्ध असलेल्या कार्यांत त्यांना गुंतवून त्यांचा शारीरिक अधःपात करीत आहोंत ! अतृप्ततेची आग त्यांच्या अंतःकरणांत भडकवून देत आहोंत ! ! जीवनाचा विकास, वर्धीकरण करण्याची जबाबदारी निसर्गानें स्त्रीवर टाकली आहे. स्त्री आणि पुरुष यांमधील लैंगिक भेद व तदनुषंगिक अंतरंग इंद्रियरचनाभेद हा पाया दृष्टीआड करून स्त्री अगर पुरुषजीवनाची मूर्ति उभारण्याचा प्रयत्न केल्यास तो खास फसल्याशिवाय राहणार नाहीं. स्त्रीवर तिच्या नैसर्गिक जीवनशक्तीचा प्रभाव अधिक असल्यानें निसर्गसंवेदनेला दूर राहून ती जेव्हां दुसऱ्या एखाद्या शक्तीच्या आहारीं जाऊन आपल्या जीवनाचा ओघ बदलूं पाहते तेव्हां मूळ निसर्गप्रेरणेशीं विरोध आल्यानें तिला यातनाच सहन कराव्या लागतात. पुरुष मानवजीवनाचा एक पूरक भाग आहे तर स्त्री ही प्रत्यक्ष जीवनाची आधात्री आहे. जीवनाचा अमर्याद ओघ, स्रोत म्हणजेच स्त्रीया जीवनौघांत आपला करभार देण्याची जबाबदारी फक्त पुरुषाकडे आहे व त्यांना ती वारंवार पार पाडावी लागते. परंतु आज आम्हीं आपण होऊन, स्त्रीजीवनाला दिलेल्या वळणामुळें त्यांना यातना, दुःखे सहन करावीं लागत आहेत, तीं कशीं याचा विचार करण्यापूर्वीं दुःख अगर यातना

म्हणजे काय याचा शारीर व मानसशास्त्रदृष्ट्या थोडासा विचार करण्यास हरकत नाहीं.

## दुःखाचें मूळ

या सृष्टीमध्यें अनेक प्राणी दृष्टीला पडतात. प्रत्येकाची इंद्रियरचना भिन्न असते व तिचा त्यांच्या जीवनाशीं संबंध असतो. कांहीं कीटकांना भुसभुशीत अशा जमिनींत शिरून राहावें लागतें व निसर्गानें त्यांना तशीं इंद्रियेंहि पण दिलेलीं असतात. अशा कीटकांना आपण फरसबंद जमिनीवर ठेवूं, बेडकांना ओसाड व वालुकामय प्रदेशांत ठेवूं किंवा एखाद्या हिंस्र श्वापदाला पिंजऱ्यांत कोंडून ठेवूं. आणि मग याचे त्यांच्या जीवनावर काय परिणाम होतात तें पाहूं. प्रथम वर्णन केलेले कीटक, जमीन उकरण्यासाठीं म्हणून परमेश्वरानें दिलेल्या आपल्या लांब पायांचा उपयोग नाहीं म्हणून खट्टू होतील, भूमिगत जीवनसत्त्वें न मिळाल्यामुळें त्यांचा नाश होईल, पाण्यावांचून बेडकाची तीच अवस्था होईल. शिकार करून भक्षणाची सर्व सिद्धता असूनहि पिंजऱ्यांत कोंडल्यामुळें निराश झालेलें श्वापद आपला राग पिंजऱ्याच्या गजावर काढूं लागेल, बेभान होईल, दुःखी होईल. म्हणजे परमेश्वरानें दिलेली विशिष्ठ इंद्रियरचना कार्यतत्पर न होईल, अशी परिस्थिति निर्माण झाली असतां प्राणिमात्र दुःखी होतात असें दिसतें.

## अनीति हीच नीति !

स्त्रियांच्या बाबतींतहि हाच नियम लागू पडतो. आज हजारों–लाखों स्त्रिया आपल्या इंद्रियांच्या स्वाभाविक व्यापाराला आंचवल्या आहेत. ज्या थोड्याफार अनुकूल परिस्थितींत आहेत त्यांच्याहि इंद्रियव्यापारांत असावा तसा निर्वेधपणा, सुरळीतपणा त्यांच्याच कृतीनें राहिलेला नाहीं आणि यामुळें बहुजन स्त्री-समाज बराच अतृप्त, निराश, दुःखी असा झालेला आहे. कांहीं विवाहित स्त्रियांतसुद्धां या आपत्तीचा प्रसार

असल्यानें, त्यांचीं दुःखें त्यांच्या अविवाहित भगिनींपेक्षांहि कांहीं ठिकाणीं अधिक असल्याचें आढळून येतें. या वरील अनर्थाला बऱ्याच अंशीं पुरुष कारणीभूत आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुरुष स्वतःला निराळे वळण लावतील. पण स्त्रियांना निराळें वळण लावणें त्यांना शक्य नाहीं. स्त्रियांच्या नैसर्गिक इंद्रियव्यापाराविरुद्ध त्यांना वळण लावणें म्हणजे त्यांना सर्कशींतील जनावरें बनविणें होय! त्यांच्या मूलभूत शारीरिक गरजांचा व परिस्थितीचा विचार न करता आपणाबरोबर त्यांनाहि व्यावसायिक जीवनांत खेचणें म्हणजे त्यांच्या आयुष्याचा खेळखंडोबा करणें होय. या वेडाच्या नादीं लागून आज हजारों स्त्रियांनीं आपल्या स्वाभाविक सुखाकडे पाठ फिरविली आहे व बेभानपणें त्या पुरुषव्यवसायांत पदार्पण करूं लागल्या आहेत. परंतु पुरुषांच्या उत्तेजनानें व आपल्या या कृतीनें आपण बेजबाबदार पुरुषांचीं खेळणीं बनून आपल्या आरोग्याचा नाश करून घेत आहोंत, हें त्यांना कळेनासें झालें आहे. पुरुषांनाहि पिळून निस्सत्त्व करून टाकणाऱ्या औद्योगिक, यांत्रिक आयुष्यक्रमांत पडण्याचा सल्ला देण्यांत येऊन त्यांची दिशाभूल करण्यांत येत आहे. एकलकोंडे आयुष्य कंठण्यांत सौख्य आहे, असें बेफाट विधान करणारांस कांहीं स्त्रियांनींहि पुष्टि देण्यास कमी केलेलें नाहीं. त्यांनीं आपल्या इतर भगिनींना वैवाहिक जीवनाची बेडी तोडून स्वतंत्र आयुष्य कंठण्यांत सौख्य आहे असें सांगण्यास कमी केलेलें नाहीं, पण ही निवळ सूडबुद्धि आहे. "माझ्यासारखी तूं कशी होशील" हाच एक हेतु त्यांत आहे. अशीं विधानें करणें म्हणजे निसर्गसिद्ध शारीरिक इंद्रियांच्या स्वाभाविक गरजा न भागवितांहि प्राणी सुखी होतो असें म्हणण्यासारखें आहे. आणि असा मूर्खपणा केला म्हणून आजचे हे दिवस आले व मनुष्याला अनीतीला नीति म्हणून वागण्याचा प्रसंग आला!

## विद्वानांचा मूर्खपणा

१९२१ च्या इंग्लंडाच्या खानेसुमारीप्रमाणें २० लक्ष स्त्रिया पुरुषांपेक्षां अधिक आहेत असें आढळून आलें. अर्थात् या स्त्रियांना जन्माचा जोडीदार मिळणें कठीण ही गोष्ट उघड होती. कित्येक विद्वानांनीं व वर्तमानपत्रकर्तेरावांनीं या प्रश्नांची चर्चा केली आणि अगदीं प्रतिष्ठितपणें सांगितलें कीं, स्त्रियांची ही संख्या जास्त आहे म्हणून काळजी करण्याचें कारण नाहीं. आज इतके उद्योगधंदे पडले आहेत कीं, त्यांत त्यांची कोठेंहि सोय होऊन जाईल. म्हणजे स्त्रियांच्या या वाढत्या संख्येचा प्रश्न हा एक आर्थिक प्रश्न एवढीच ह्या विद्वानांची कल्पना! आयुष्यांत पोटाला मिळविणें आणि जगणें एवढें एकच काम! याखेरीज दुसरें कर्तव्य नाहीं, असा प्रकार असता तर पुरुष व स्त्री असा स्पष्ट लैंगिक भेद निर्माण न करतां विधात्यानें एक तृतीयपंथीच प्राणी निर्माण केला असता व जीवनाचा कायमचाच मक्ता त्याला दिला असता! वीस लाख स्त्रियांना, कांहीं हरकत नाहीं, तुम्हांला सोंगडी मिळाला नाहीं तर, आमच्या कारखान्यांत तुम्हाला चरितार्थापुरता पैसा खास मिळेल असें सांगणारे विद्वान् या वीस लाख स्त्रिया नसून लैंगिक आकर्षण अगर गरज नसलेले तृतीयपंथी प्राणी आहेत असें समजण्याचा मूर्खपणा करीत नाहींत का? हा या स्त्रियाचा उपमर्द आहे!

## ही स्त्रियांची आत्महत्या

शारीरिकदृष्ट्या वाढ पूर्ण झाली आहे, मनाची, इंद्रियांची भूक वाढली आहे, वासनातृप्तीची आत्यंतिक इच्छा मनांत निर्माण झालेली आहे, अशा स्त्रियांपुढें जाऊन " तुम्हाला कारखान्यांत, नोकरींत पैसा मिळेल " म्हणून सांगणाऱ्या लोकांची किंमत या स्त्रिया काय करतील? आणि या प्रश्नाला बगल देण्यासाठीं म्हणून पतिपुत्रहीन असा लैंगिक आचार प्रचारांत आणण्याचा स्वार्थी सल्लाहि या विद्वानांनीं देण्यास कमी

केलें नाहीं; परंतु निसर्गाचें ऋण स्त्रीवर एवढें मोठें आहे, आणि भावी पिढ्यांना जन्म देण्याची व त्यांच्या संवर्धनाची एवढी जबाबदारी निसर्गानें स्त्रीवर टाकली आहे कीं, या स्वार्थी विद्वानांनीं केलेल्या दिशाभुलीमुळें त्या सुखी तर झाल्याच नाहींत; परंतु त्यांचीं दुःखें मात्र द्विगुणित झालीं. आंतून मूर्तिमंत जीवन त्यांना सांगत असतें, तूं चुकत आहेस, पण मृगजळाच्या मागें लागलेली स्त्री या हृदयाच्या हाकेकडे दुर्लक्ष करून पुढें पुढें धावते व मग व्याकुळ होते! पण महत्त्वाचे क्षण हुकल्यानंतर या व्याकुळतेचा काय उपयोग? सृष्टीवरील जीवनांचें द्विगुणीकरण, संवर्धन, संरक्षण करणारी शरीररचना परमेश्वरानें स्त्रीला दिली ती कांहीं उगीच पाडून ठेवण्यासाठीं नाहीं. या इंद्रियांचे स्वभावधर्म मारणें म्हणजेच स्त्रीनें आत्महत्या करणें होय! स्त्रियांना राजकारण पाहिजे, आर्थिक स्वातंत्र्य पाहिजे, समता पाहिजे, केवढा आभास! माश्यांना वाळवंटांत मोकाट सोडा आणि जमिनीवर वावरणारांना समुद्रतळाचें राज्य द्या. या जीवनविरोधी वैभवाचा प्राणिमात्रांना काय उपयोग? स्त्रियांच्या स्वाभाविक गरजांचा विपर्यास करून आपल्या स्वार्थासाठीं त्यांना नाडण्यांत कोणता पुरुषार्थ!

# ३. स्त्री जन्माचें सार्थक—जातिसंवर्धन

चांगल्या धट्ट्याकट्ट्या मुलाला एके ठिकाणीं कांहींही हालचाल न करता बसून राहण्याची कडक आज्ञा करा. बहुतेक पहिल्या एकदोन मिनिटांतच त्याच्याकडून आज्ञाभंगाचें पातक घडेल. एखाद्या गेंड्याला अगदीं चांगल्या तबेल्यांत कोंडा. लवकरच नाकावरील शिंगाचा उपयोग करून व भिंतीवर धडका मारून त्यानें तबेला खिळखिळा केलाच म्हणून समजा. याचप्रमाणें आणखी कित्येक उदाहरणें देतां येतील. उंदरांना खाण्याचे कठिण पदार्थ कुरतडण्यास मिळाले नाहींत तर निदान ते कपडे व लाकडी सामान कुरतडण्यास कमी करणार नाहींत. येथें नमूद केलेल्या वरील सर्व कृतींच्या बुडाशीं असलेल्या मनोधर्माचें विवेचन माझ्या मतानें खालीलप्रमाणें करतां येईल.

## मुलांची अन्तःप्रेरणा

धट्ट्याकट्ट्या मुलाला आपण स्वस्थ बसण्यास सांगितलें खरें, पण त्याचे स्नायु व मज्जातंतु चांगले पोसले आहेत, पुष्ट झाले आहेत, त्यांच्या ठिकाणीं एक सुप्त सामर्थ्य निर्माण झालेलें आहे, आणि तें सामर्थ्य प्रकट होण्याची संधि पदोपदीं पाहत आहे, अशा स्थितींत आपण त्यास स्वस्थ बसण्याची आज्ञा केली; पण त्याचे स्नायु त्यास सांगत असतात, आम्हाला हालचाल पाहिजे, काम पाहिजे, आमच्या सामर्थ्याला प्रकटीकरण पाहिजे, आम्हाला त्यांना आता कोंडून ठेवता येणार नाहीं. स्नायूंचे हे संदेश मुलाच्या मेंदूला पोचताच मुलाला वाटतें, येथें बसणें बरें नाहीं. बाहेर जाऊन खेळलें पाहिजे. आपलें गुप्त सामर्थ्य प्रकट होण्याची इच्छा करीत आहे, त्याचाच दुष्परिणाम म्हणजे येथून बाहेर पडण्याची इच्छा. इतका कार्यकारणसंबंध त्या मुलालाही कळत नाहीं व आज्ञाभंगाबद्दल त्याच्यावर रागावणाऱ्या आपणालाही समजत नाहीं. आपणाला खेळावेसें वाटतें, एके ठिकाणीं

बसणें कंटाळवाणें वाटतें, एवढेंच फार झालें तर तो मुलगा सांगू शकेल. परंतु आपले स्नायु स्फुरत आहेत, त्यांचे संदेश मेंदूकडे जात आहेत आणि या सामर्थ्यप्रकटीकरणसंदेशाचें थोडेसें विकृत स्वरूप करून मेंदु आपणास खेळावयास जावयाची प्रेरणा देत आहे. इतक्या गोष्टी या व्यापाराचे बुडाशीं आहेत ही कल्पना त्या मुलाप्रमाणेंच इतरही बऱ्याच जणांना नसते. आतां त्या मुलाला जर आपण मोकळीक दिली कीं, तो तत्काळ बाहेर पडेल आणि कोठें लाकडाचा ओंडाच ढकल, नाहीं तर एखादा मोठा दगडच हलवण्याचा प्रयत्न कर असले निरर्थक चाळे करूं लागेल व त्यांतच त्याला मजा वाटेल. आपणाला हे चाळे करण्याची बुद्धि कां होते हें त्या मुलाला सांगता येणार नाहीं आणि आपणहि म्हणूं " काय नसराणी कार्टें आहे पाहा! रिकामा उद्योग करून दांत मोडून घेईल झालं कुठें तरी." शरीराला आपलें सामर्थ्य प्रकट करण्याची हुरहूर लागल्यानें मुलाने ही कृति केली आणि ती करीत असतांना त्याला एका प्रकारें आनंदहि पण झाला! असें कोणतें प्रचंड उपयोगी कार्य केल्यामुळें त्याला आनंद झाला असावा? तें जरी मोठें उपयोगी कार्य नसलें, तरी त्याच्या शरीराचें स्वाभाविक सामर्थ्य प्रकट करण्याची गरज त्या तसल्याहि कार्यानें भागत असल्यानें त्या मुलाला आनंद झाला हाच याचा सरळ सरळ अर्थ!

वरील विवेचनावरून एवढें स्पष्ट होतें कीं, शारीरिक गरजांचे संदेश मेंदूकडे जातात मेंदु कांहींशा विपर्यस्त स्वरूपांत प्रेरणा देतो व ह्या प्रेरणेबरहुकूम कृति घडतेच असें नाहीं, तर तीहि कांहीं वेळां अशी होते कीं, तीमुळें शारीरिक गरज भागली तर ती प्रेरणेनुरूप असतेच असें नाहीं. स्नायूंच्या मूळ संदेशांना संवेदना असें म्हटलें तर प्राण्यांकडून घडणारें कार्य कांहीं वेळा संवेदनेशीं व प्रेरणेशीं विसंगत असतें, अगर सुसंगत असेंच कार्य प्राण्यांच्या हातून घडतें असें नाहीं. या मानसिक भागाचा विचार आतां या ठिकाणीं एवढ्याचसाठीं केला आहे कीं,

कांहीं किरकोळ स्वरूपांतील कृतींचें पर्यवसान मोठ्या मतभेदांत होऊन संसार नीरस होत असतो. याचा विचार पुढें करावयाचा आहे. त्यासाठीं व मनुष्यांच्या कार्यकारणपरंपरेचा दुवा लक्षांत येण्यासाठीं आवश्यक अशी भूमिका आताच स्पष्ट करून ठेवावीं या दृष्टीनेंच हा विचार आवश्यक आहे.

## शरीर संवेदनेचा विपर्यस्त परिणाम

वर निवेदिलेल्या व्यापाराचे सूक्ष्म संबंध लक्षांत घेतल्यानें पुढचे प्रश्न बरेचसे सोपे होणार आहेत. कांहीं वेळां माणसांच्या हातून अशा कृति घडत असतात कीं, त्यांचें समर्थन अगर त्यांतील हेतु त्यांचा त्यांनाच स्पष्ट करतां येत नाहीं. 'मला बरें वाटलें म्हणून केलें, यापलीकडे ते अधिक खुलासा करूं शकत नाहींत. शरीरसंवेदनेच्या विपर्यस्त परिणामाची ही कृति आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. कोणी तरी एक अज्ञात शक्ति आपणास हें करण्यास लावीत आहे असें त्यांना वाटतें. ही अदृश्य शक्ति म्हणजेच त्यांना मिळणारी विपर्यस्त प्रेरणा होय! शरीर संवेदना, मेंदूची प्रेरणा व कृति यांची एकवाक्यता फारच थोड्या ठिकाणीं समजून सांगतां येते. इंद्रियांचा उपयोग करण्याची इच्छा निर्माण होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. फक्त तो सदुपयोग कसा होईल हें पाहणें आवश्यक आहे. उंदरांना आमचे कपडे फाडावेत अगर आम्ही झोपेंत असतांना आमचे पाय कुरतडावेत अशी इच्छा होण्यास आमचें कांहीं त्यांच्याशीं वैर नसतें. परंतु त्यांचे दांत व त्यांच्या बुडाशीं असलेली मज्जातंतूंची रचना कोठें त्यांना स्वस्थ बसूं देते?

शारीरिक विभागांच्या तृष्णेमुळें निर्माण झालेली संवेदना बहुश: विपर्यस्त स्थितींतच कृतींत उतरलेली दिसते. आपल्या कित्येक उत्साहपूर्ण धडाडीच्या कृतीच्या बुडाशीं ही विपर्यस्त संवेदनाच असते. एखादा मनुष्य चांगला लढवय्या होईल का चित्रकार होईल का कारागीर होईल

हें त्याच्या शरीराच्या रचनेवरून सांगण्याचें शास्त्र निघालें आहे तें वर विवेचन केलेल्या तत्त्वावरच बऱ्याच अंशीं उभारण्यांत आलेलें आहे. बांध्याची, हातापायांची व बोटांची ठेवण परीक्षणांत घेतली म्हणजे स्वाभाविक हे अवयव आपल्या कुवतीनुरूप कोणती संवेदना देतील व तिचा काय परिणाम होईल याचा अंदाज घेऊन हा मनुष्य पुढें काय करू शकेल अगर काय होईल हें सांगणें फारसें कठिण जाणार नाहीं. आतां हेंच शास्त्र विचारांत घेऊन स्त्रीकडे पाहू ! स्त्रियांची एकंदर शरीररचना लक्षांत घेतली तर त्यांचें कार्य लक्षांत येण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं. स्त्रियांच्या प्रमुख इंद्रियांकडून मिळणारी संवेदना स्वाभाविक प्रतिसुख व अपत्यसुख मिळविण्यासंबंधीची असते. परंतु हीं सुखें मिळविण्यासाठीं अस्वस्थ झालेल्या शरीराकडून जीवनास अत्यंत आवश्यक असें हें कार्य घडविले न जातां, तिच्या मेंदूवर जो विपर्यस्त कल्पनांचा पगडा इतरांकडून व परिस्थितीकडून बसविला जातो त्यामुळें भलत्याच कार्यांत तें व्यग्र होतें. या ठिकाणीं प्रचलित काळांत ऐकूं येणारा व एका इंग्लिश समाजशास्त्रवेत्त्यानें दिलेला एक सर्वसामान्य संवाद येथें देण्यास हरकत नाहीं.

## एक संवाद

मी—कुमारी अमुक काय करते. हल्लीं ठीक आहे ना तिचें ?

सभ्य—झकास चाललें आहे तिचें आतां !

मी—सध्यां करते काय ती ? लग्न वगैरे झालंय वाटतें ?

सभ्य—नाहीं, अद्याप तसं कांहीं नाहीं.

मी—मग कांहीं योगबीग तसा ?

सभ्य—आपल्याला कांहीं माहीत नाहीं, बुवा !

मी—सध्यां ती असते तरी कोठें ?

सभ्य—ती कॉलेजांत आहे. अर्थशास्त्राचा अभ्यास करते म्हणे तेथें.

मी—अर्थशास्त्राचा ? आणि तें काय म्हणून, बुवा ?

मा प्र

सभ्य—फार हुशार आहे तशी ती! आणि शिवाय तिला वरील विषयाची आवडहि पण आहे.

मी—अऽस्सें. आतां तिचें वय काय आहे बरें?

सभ्य—असेल सरासरी तेवीस—चोवीस इतकें.

मी—छान. मग तिला तिथें खूप नवे नवे तरुण भेटतील आणि मग खरें काय पाहिजे तें मिळेल तिला तेथें.

सभ्य—तुमची तिच्यासंबंधीची कल्पना चुकीची आहे. ती कांहीं अशी मुलगी नाहीं. ती खरोखरच या विषयाची चहाती आहे.

मी—मला पण तसें वाटत नाहीं. तिला आपण अर्थशास्त्राचा अभ्यास कां करीत आहोंत हेंच कळत नाहीं आणि म्हणून तिनें कल्पना करून घेतली आहे कीं, आपणाला ते विषय आवडतात! ती तिथे कां जाते हें मला चांगलें माहीत आहे. तिला तिचें जीवन तेथें पाठवितें, कॉलेजांत अर्थशास्त्राखेरीज आणखीही कोणते विषय शिकविण्यांत आले असते तरी ती तेथें गेलीच असती. ज्या वेळीं तिच्या जीवनशक्तीला कळलें कीं, आपली वासनातृप्ति योग्य मार्गानें होत नाहीं तेव्हां तिनें आपणास गुंतविण्याचा कांहीं तरी दुसरा मार्ग काढला एवढेंच!

सभ्य—छेः, स्त्रियांना पुरुषांशिवाय दुसरें कांहीं दिसतच नाहीं, असें तुम्हास नेहमीच वाटतें.

मी—मी कांही तसे म्हटलें नाही.

सभ्य—पण तुमच्या म्हणण्याचा मथितार्थ तोच ना?

मी—माझ्या म्हणण्याचा मथितार्थही पण तसा नाहीं.

सभ्य—नाहीं कसा?

मी—मला एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, कुमारी अमुक हिला निसर्गसंवेदनेची खरी कल्पना न आल्यामुळें व तिचा विपर्यास केला गेल्यामुळें तिच्या हातून अशी विसंगत व निरुपयोगी क्रिया घडली गेली,

## विद्याप्रेमाची खरी भूमिका

स्त्रियांच्या प्रत्येक कृतीचें समर्थन जर आपण त्यांच्याकडून घेतलें तर त्यांत कांहीं फारसा अर्थ नसतो असें आपणास दिसून येईल. याचा अर्थ त्या खोटें बोलतात असा नाहीं. परंतु शरीरसंवेदनेच्या विपर्यस्त प्रेरणेमुळें त्यांच्या बऱ्याचशा कृति घडत असल्यामुळें असले प्रसंग त्यांच्यावर ओढवतात. वरील कुमारीच्या स्वभावाचें थोडेंफार पृथक्करण या ठिकाणीं करण्यास हरकत नाहीं. ती एक सर्वसाधारण आरोग्यसंपन्न मुलगी आहे, असें गृहीत धरूं. तिचें वक्षस्थल, पोटऱ्या इत्यादि अवयव चांगले पुष्ट व मांसल आहेत. वयाच्या चौदाव्या वर्षापासून तिला नियमितपणें मासिक स्राव होत आहे. तिची अंतर्गत इंद्रियरचना या वेळीं काय करीत असेल बरें? तीं सर्व कार्यतत्पर असलेलीं इंद्रियें मेंदूला आपल्या गरजांचे संदेश वारंवार पाठवीत असतात, आणि हें काम वर्षानुवर्ष चालतें. "आम्ही अतृप्त आहोंत, निष्क्रिय आहोंत, निष्क्रियतेमुळें आम्हास यातना होत आहेत." अशी त्यांची सारखी ओरड सुरू असते. मेंदु या सर्वांचा विपर्यास करून प्रेरणा देतो. "काय कंटाळवाणें आयुष्य आहे तरी हें बाई! कांहीं मजेशीर योगायोग नाहीं का येणार? आपल्या माहितींतले हे पुरुष करतात तरी काय? त्यांचें माझ्याकडे कां लक्ष जात नाहीं बरें? माझ्यावर ते कां प्रेम करीत नाहींत?' कुमारी जसजशी वयानें वाढूं लागेल तसतसे हे संदेश अधिकाधिक निकडीनें येऊं लागतात व मेंदु फिरून प्रेरणा करूं लागतो. 'काय कंटाळवाणें घर आहे हें! आई तरी किती निष्काळजी. आपल्या पुरतं पाहते. उगीच घरीं बसून का दिवस काढावयाचे? जावें कोठें तरी, शिकावें इ. इ. वाढलेल्या कुमारिकांच्या विद्याप्रेमाची व घरासंबंधीच्या औदासिन्याची खरी भूमिका ही आहे. परंतु पालकांना वाटतें, आपल्या मुलीला शिकण्याची, स्वतंत्रपणें वावरण्याची, हौस आहे. मुलींच्या या कृतींचा, वागण्याचा अगदीं साध्या भाषेंत अर्थ सांगावयाचा म्हणजे

'माझ्या सध्याच्या परिस्थितींत माझ्या जीवनाच्या प्राथमिक गरजा भागत नाहींत व त्यामुळें तें कांहींना कांहीं कार्यांत व्यग्र होण्याचा आग्रह धरतें.'

एखादें इंद्रिय उपयोगांत आणण्याची इच्छा आपणास ज्या वेळीं होते त्या वेळीं तरी संवेदना मूलत: त्या इंद्रियाकडूनच मिळत असते. सर्वसाधारण आरोग्याच्या पुरुष–स्त्रियांमध्यें ही गोष्ट विशेष उत्कटत्वानें दिसून येते. संवेदना बहुशः दोन मार्गांनीं मिळत असते. एक आनुवंशिक स्वभावधर्म आणि दुसरी इंद्रियजन्य संवेदना. परंतु याच्यापुढें जाण्यापूर्वीं, स्वभावधर्म म्हणजे काय हें आधीं पाहूं.

## धंदेवाईक जातिरचना

संवेदना आणि इच्छा यांचे परस्पर संबंध काय आहेत तें पाहूं गेलें असतां आपणास एवढेंच म्हणतां येईल कीं, इच्छेचें प्रथम स्वरूप म्हणजेच संवेदना. संवेदना अशा प्रकारें मिळत असते कीं, तींतून निर्माण होणारी इच्छा व नंतर घडणारी क्रिया, यासंबंधीं अगर तिच्या परिणामासंबंधीं, मानव आपल्या प्रथमावस्थेमध्यें अज्ञानच असतो. नुकत्याच जन्मलेल्या मुलाला, दुधाचा, अन्न या दृष्टीनें अनुभव असतो असें नाहीं. शरीराशीं त्याचा काय संबंध असतो याचें ज्ञान त्यास असतें असेंहि नाहीं. परंतु मातेचा स्तन मिळतांच चोखणें एवढें ज्ञान त्याला उपजतच कसें मिळालेलें असतें पहा! या मुलांच्या संवयीमुळें आपण एखादी कृत्रिम वस्तु देऊनहि त्यांची फसवणूक करूं शकतों. प्रथम कांहीं महिन्यांत तीं भुकेनें ओरडूं लागतात, स्तन तोंडाला लागल्यानें भुकेची अंतर्गत व्यथा कमी होते एवढेंच ज्ञान त्यांना असल्यानें तीं कृत्रिम स्तनानेंही पटकन गप्प होतात; पण अपेक्षित परिणाम दिसून न आल्यास तीं फिरून रडूं लागतात. हें ज्ञान त्यांस उपजतांच कोठून मिळालें? हें आनुवंशिक संवेदनेनें अर्थात् स्वभावधर्मानें त्यांना प्राप्त झालें. पूर्वजांनीं जें केलें तें स्वभावतःच पुढील व्यक्तीच्या हातूंन घडतें. हाडामासांत

पूर्वजांचे गुणधर्म भिनले असल्यामुळें क्रिया आपोआपच त्याप्रमाणें घडत असतात. त्याकरितां निराळे परिश्रम करावे लागत नाहींत.

धंदेवार जातिरचना याच तत्त्वावर उभारण्यांत आली आहे. आपल्या पूर्वजांनीं ज्या एका विशिष्ट पद्धतीनें आचारविचार केलेला असतो त्याचे अस्पष्ट कां होईनात पण प्रतिध्वनि आपोआपच आपल्या अंत:करणांत उमटत असतात. उदाहरणार्थ आपण नेहमी पहावें, कुत्री बसतांना एकदा सभोंवार फिरून हुंगून मगच खालीं बसतात. कुत्रा मूळचा रानटी प्राणी असल्यानें गवताळ प्रदेशांत झाडींत राहात असे. स्वाभाविकच रानटी पशूप्रमाणें आसपास कांहीं नाहीं असें पाहून व दबा धरून सावधानतेनें बसण्याची त्याला संवय. पण आतां कुत्रे माणसाळलेलें, घरांत सुरक्षित जागीं राहूं लागलें तरी पण वरील स्वभावधर्म मात्र त्याचा अद्याप सुटूं शकला नाहीं. खुद्द मनुष्य-प्राण्याचे बाबतींतहि अशा कित्येक गोष्टी दाखवितां येतील.

आपणांस जी अनेक इंद्रियें परमेश्वरानें दिली आहेत, त्यांचा उपयोग व्हावा अशीच परमेश्वराची योजना असते. तो उपयोग आम्ही करून घ्यावा म्हणून त्याच इंद्रियांकडून आपणास वारंवार संदेश मिळत असतात! हीं इंद्रियें धारण करणाऱ्या व्यक्तीला अगर प्राण्याला त्यांचा उपयोग केला गेल्याशिवाय चैनच पडत नाहीं. उगाच दुशा मारणारे बैल अगर एडके विनाकारण उकराउकर करणारे मुंगुस-घुशीसारखे प्राणी, हीं त्यांचीं उत्तम उदाहरणें आहेत. या प्राण्यांच्या सर्व हालचाली त्यांच्या इंद्रिय-संवेदनेमुळेंच घडत असतात. यालाच इंद्रियात्मक संवेदना असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सं........ ग्रं........
ता........

# ४. आदर्श स्त्रीजीवन म्हणजे गृहस्वामित्व

आता इच्छा म्हणजे काय हें पाहूं. संवेदनेची पुढची पायरी म्हणजेच इच्छा! प्राणिमात्राकडून घडणारी क्रिया मग ती कांहीं काल घडणारी असो अगर सर्व काळ घडणारी असो, या शक्तीमुळेंच त्यांच्या हातून घडते. संवेदनेचें रूपांतर इच्छेंत होऊन मगच क्रिया घडते असा हा क्रम आहे. आनुवंशिकतेमुळें अगर स्वाभाविक इंद्रियरचनेमुळें निर्माण होणारी संवेदना व इच्छा यांचा दृढ संबंध आहे. अर्थात् संवेदना ज्या तऱ्हेची व जशी जोरदार असेल त्या तऱ्हेची व त्याच प्रमाणांत कमी-अधिक जोरदार इच्छा प्राण्याच्या मनांत निर्माण होणार व तिला अनुरूप कृति त्यांच्या हातून घडणार ही गोष्ट निर्विवाद आहे. मनुष्यप्राण्याच्या ठिकाणीं असणाऱ्या संवेदनेचे तीन विभाग पडतात. १. स्वरक्षणात्मक, २. स्वजातिवर्धनात्मक व ३. समाजात्मक. मनुष्याच्या इंद्रिय रचनेनुरूप या तीनहि संवेदना त्यांचे ठिकाणीं कमीअधिक प्रमाणांत मूलतः वसत असतात, व या संवेदनाच्या कार्यामुळें व्यक्तीचा स्वभाव वनत असतो आणि स्वभावानुरूप आयुष्याला वळण लागत असतें. स्वसंरक्षणात्मक संवेदना ज्या व्यक्तीचे ठिकाणीं पुढील दोन संवेदनांपेक्षां अधिक प्रमाणांत असते, अशा व्यक्ति समाज व स्त्रिया यांना लाथाडून आपली कातडी बचावल्याशिवाय व स्वार्थ साधल्याशिवाय राहात नाहींत. ज्या व्यक्तींचे ठायीं स्वजातिवर्धनाची संवेदना अधिक प्रमाणांत असते त्या व्यक्ति स्वतःस प्रिय असलेल्या स्त्रीसाठीं आपला व समाजाचा होम करण्यास सदैव तयार असतात. मार्क अँटनीसारख्या व्यक्ति या सदरांत घालण्यास हरकत नाहीं. समाजात्मक संवेदना ज्यांचे ठिकाणीं विशेष प्रमाणांत दिसून येते अशीं माणसें स्वतःचें जीवित व स्त्रीसौख्य यांची क्षिति वाळगीत नाहींत. शिवाजी, नेपोलियन, टिळक आणि महात्मा गांधी यांसारखे बहुतेक देशभक्त या कोटींत येतात. स्त्रियांसाठीं राजकारण खोळंबवून ठेवणाऱ्या वावालोकांना येथें जागा नाहीं. व्यक्तीची इच्छा अर्थात

तिच्या आयुष्यक्रमाला मार्गदर्शक शक्ति, ही तिच्या ठिकाणीं वसणाऱ्या संवेदनेची परिणतावस्था होय. स्पेन्स, निच्छे, इ. पाश्चात्य व विवेकानंद रामदास यांसारख्या पौर्वात्य महात्म्यांचे ठिकाणीं समाजात्मक संवेदनेचा एवढा मोठा जोर होता कीं, तिनें बाकीच्या दोन संवेदनांचा केव्हांच नाश करून टाकला व त्यामुळें ते स्त्रीद्वेष्टे बनले. त्यांनीं स्वतःच्या जीवनावरहि समाजहितासाठींच प्रेम केलें. वर सांगितलेल्या तीन संवेदना पुरुषाचे ठिकाणीं कमीअधिक प्रमाणांत असतात. त्यांपैकीं जी प्रबल ठरेल तीप्रमाणें त्याच्या आयुष्याला वळण लागेल. हा सर्वसामान्य सिद्धांत फक्त पुरुषवर्गापुरताच मर्यादित आहे. स्त्रियांच्या बाबतींत ही परिस्थिति थोडी निराळी आहे. कशी तें आतां पाहूं.

## स्त्रियांच्या संवेदना

स्त्रियांच्या ठिकाणीं वरील तिहींपैकीं कोणत्या संवेदनेचें प्राबल्य अधिक असतें? स्त्रियांच्या इच्छा कोणत्या संवेदनेकडून निश्चित केल्या जातात? हें ठरवितांना अर्थातच त्यांची आनुवंशिकता, इंद्रियरचना या गोष्टी विचारांत घेणें प्राप्त आहे.

स्त्रियांचीं इंद्रियें व स्त्रीजन्माची सार्थकता ठरविणारें त्यांचें कार्य, त्या कार्याच्या दृष्टीनें त्यांच्या ठिकाणीं दिसून येणारी वासना, त्या वासनेमुळें आज अनंत कालपर्यंत एकाच चाकोरींतून गेलेल्या अनेक स्त्रियांचे स्वभावधर्म व अर्थात् पुढील स्त्रियांत निर्माण होणारी आनुवंशिकता या सर्वांचा विचार केला तर त्यांचे ठिकाणीं स्वजातिवर्धनात्मक संवेदनाच अधिक प्रमाणांत असावी ही गोष्ट उघड दिसून येणारी आहे.

जननकार्याला आवश्यक अशी फार मोठी इंद्रियरचना घेऊन जन्माला आलेली स्त्री, त्या इंद्रियांना कार्यप्रवण केल्यावाचून समाधानानें काळ कंठूं शकणार नाहीं ही गोष्ट उघड आहे. जननावश्यक इंद्रियें आपल्या पूर्ण वाढीनंतर आपल्या उपयोगाची संवेदना स्त्रियांना दिल्यावांचून राहणार नाहींत. अर्थातच स्त्रियांची इच्छा व क्रिया संवेदनांना अनुसरून शक्य

तों राहणार यांत शंका नाहीं. स्त्रिया या स्वभावतःच समाज कार्यहितेच्छु अगर देशकार्यहितेच्छु नसतात. त्यांचा दृष्टिकोन बराचसा वैयक्तिक असतो. त्या स्वार्थत्याग करतात; त्यांच्या स्वार्थत्यागाची मजल कित्येक वेळां प्राणत्यागापर्यंतहि जाते. परंतु त्यांचा हा स्वार्थत्याग बहुशः अपत्य-प्रेमानें अगर पतिप्रेमानें झालेला असतो आणि यावरून त्यांचे ठिकाणीं स्वजातिवर्धनाची संवेदनाच अधिक प्रमाणांत वास करीत असते हें उघड आहे.

## पुरुषांची वासनातृप्ति

वरीलप्रमाणें पुरुषांच्या स्वभावाचेंहि पृथक्करण कां करूं नये अशीहि कोणी शंका काढील, परंतु पुरुष व स्त्री यांमध्यें निसर्गतः जो इंद्रिय-रचनाभेद आहे त्यामुळें वरील विवेचन पुरुषास कितपत लागू पडेल याची थोडी शंका आहे. पुरुष व स्त्रिया यांच्या इंद्रियरचनेंतील पहिला व मोठा भेद म्हणजे स्वजातिवर्धनाला पोषक अशी फारशी जबाबदारी पुरुषावर नसल्यानें तदनुषंगिक त्यांचीं इंद्रियें हीं त्याच्या शरीरावर परिणाम करणारीं प्रमुख इंद्रियें म्हणून गणली जात नाहींत; परंतु स्त्रियांच्यावर मात्र जीवनिर्मितीची, संवर्धनाची जवळ जवळ सर्व जबाबदारी असल्यानें, तिचें शरीर म्हणजे वरील गोष्टीला अनुकूल अशा सर्व इंद्रियांना आधारभूत व संरक्षक असा एक पिंजराच म्हणावयाचा. अर्थात् जननव्यापाराला उपयुक्त अशा इंद्रियांच्या व्यापारामुळेंच स्त्रियांच्या इच्छेला वळण लागतें. पुरुषांच्या बाबतींत ही स्थिति नाहीं. त्यांची वासना कोठेंहि व कशाहि तऱ्हेनें तृप्त झाली म्हणजे झालें. निसर्गतः तिच्या पुढील परिणामाची कांहींच जबाबदारी त्यांच्याकडे येत नसल्यानें पुढें ते इतर कार्यांत व्यग्र होण्याला पूर्ण मोकळे आहेत. आणि त्यामुळें त्यांची संवेदन–इच्छा व क्रिया जननेंद्रियाकडून फारशी घडविली जात नाहीं. पराक्रम, धाडस, लोकसेवा इत्यादि कार्यांत पुरुष जास्त कार्यक्षम ठरतात. त्याचें कारण हेंच होय. परंतु स्त्रियांची कामवासनातृप्ति ही फक्त त्यांच्या

पुढील जबाबदारीची पहिली पायरी आहे. येथून तिच्या कार्याला खरा आरंभ होतो, आणि अपत्य अंगावर पिऊं लागल्यानंतर या कार्याची पूर्ति होते. अर्थात् इतक्या कार्याला उपयुक्त अशी तिची इंद्रियरचना असल्यानें त्यांतील एकाच इंद्रियाची तृप्ति होऊन स्त्री संतुष्ट होऊं शकत नाहीं, यांतील प्रत्येक इंद्रियाला तृप्त करतांना स्वाभाविक तिला स्वजातिवर्धनात्मक संवेदनेच्या आहारीं जावें लागतें व त्यामुळें बाकीच्या दोन संवेदना त्यांच्या बाबतींत फारशा पुढें येऊं शकत नाहींत.

## स्त्री–जन्माचें सार्थक

स्त्रियांच्या स्वाभाविक इंद्रियरचनेंमुळें त्यांना मिळणारी संवेदना व त्यामुळें निर्माण होणारी इच्छा जर तृप्त झाली नाहीं, तर बेताबेतानें त्यांची स्वजातिसंवर्धनाची संवेदना मागें पडून इतर संवेदनांचा उदय होतो व त्यामुळें त्यांच्या कृति कांहींशा पुरुषी थाटाच्या दिसूं लागतात. आणि पुरुषांच्या कार्यक्षेत्रांत वावरण्याची इच्छा करणाऱ्या स्त्रिया बहुशः कुमारिका आणि बालविधवा अशाच असतात. यावरून माझ्या वरील विधानाला पुष्टी येते. स्वाभाविक इंद्रियव्यापार मारून विकृतकृतींत गुंतण्यांत आपण बऱ्याच सुखांना आंचवतों ही गोष्ट उघड आहे. अर्थात् स्त्रियांची स्वजातिवर्धनाची संवेदना जर कांहींना कांहीं कारणानें मारली गेली तर त्या सुखी होणार नाहींत व त्यांच्या जन्माचें सार्थकहि पण होणार नाहीं.

## स्त्रियांना कोणता पुरुष आवडतो

स्त्री आणि पुरुष यांचेमध्यें एक स्वाभाविक आकर्षण विधात्यानें निर्माण केलें असल्यामुळें, ज्या वेळीं एखादा उमदा तरुण तशाच एखाद्या उमद्या व आरोग्यसंपन्न कुमारिकेच्या सांनिध्यांत येतो त्या वेळीं तीं परस्परासंबंधी प्रथमदर्शनीं कोणता विचार करीत असतील याचा अंदाज प्रत्येकास आहेच. या सुदृढ तरुणाचें शील कोणत्या दर्जाचें आहे व याचें समाजांतील स्थान कोणतें आहे, याची आर्थिक परिस्थिति

कोणत्या प्रकारची आहे इत्यादि गोष्टींचा विचार प्रथमदर्शनीं करीत न बसतां तो पुरुष या दृष्टीनें कसा दिसत आहे, त्याचें सौंदर्य व एकंदर आविर्भाव यावरून तो आपणांस हवासा वाटतो किंवा नाहीं एवढा एकच विचार प्रथम तरुणीचे मनांत येत असतो आणि पहिल्या दहापांच पळांतच तिची ही परीक्षा पूर्ण होते व नंतर या तरुणासंबंधी आपण विशेष आस्था बाळगावी कां न बाळगावी याचा विचार तिच्या मनांत निर्माण होऊन तिचा दृष्टिकोन थोडा बदलतो. त्याची राहणी, बुद्धिमत्ता, त्याच्या भोंवतालची एकंदर परिस्थिति यांचा ती क्रमाक्रमानें विचार करूं लागते. पुरुषासंबंधी हा विचार करीत असतांना एक विशिष्ट भावना मनांत ठेवून प्रत्येक कुमारी वावरत असते. ही भावना म्हणजेच आपलें सर्वस्व ज्याच्या स्वाधीन आपण बिनधोकपणानें करूं शकूं असा जोडीदार हुडकून काढण्याचीच भावना होय !

आपण आपलें सर्वस्व कोणातरी पुरुषाच्या स्वाधीन करणार आहोंत, त्या दृष्टीनें हा पुरुष योग्य आहे किंवा नाहीं हें पाहण्याची त्यांची दृष्टि असते. स्त्रियांमध्यें स्वजातिसंवर्धनाची संवेदना अधिक प्रमाणांत असल्यानें ती संवेदना ज्याचे कडून अधिकांत अधिक तृप्त होऊं शकेल अशाच पुरुषाचे स्वाधीन आपलें जीवित करण्यास स्त्रिया उत्सुक असतात. विशाल बुद्धिमत्तेचा परंतु दिसावयास किरकोळ, दुबळा असा मनुष्य सहसा स्त्रियांच्या आदरास पात्र होत नाहीं. परंतु झकपक पोशाख करून चार लोकांत विशेष उठावदारपणें वावरणारा, मधून मिष्ठास भाषण करणारा, पुढे पुढे करणारा, शिष्टाचाराचें फाजील प्रदर्शन करणारा पुरुष स्त्रियांचें नजरेंतून क्वचितच सुटतो. आणि ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे. कारण विशाल बुद्धिमत्तेचीं माणसें बहुधा समाजात्मक संवेदनेच्या आहारीं गेलेलीं असतात. कुटुंबाच्या मर्यादेपलीकडे त्यांची दृष्टि जात असल्यानें आपलें सर्वस्व कुटुंबासच वाहून टाकण्यांत त्यांना पुरुषार्थ वाटत नाहीं, व यामुळें स्वसंरक्षणात्मक, अगर स्वजातिसंवर्धनात्मक

संवेदनांचा त्यांच्या ठिकाणीं प्रादुर्भाव अत्यंत अल्प प्रमाणांतच दिसून येतो. ही गोष्ट स्त्रीसौख्याला तितकीशी पोषक नसल्यामुळें अशा मनुष्याचे स्वाधीन आपलें सर्वस्व करण्याची इच्छा स्त्रियांना क्वचितच होते.

ज्यावेळीं एखादी तरुणी अमूक एका तरुणावर माझें प्रेम आहे! तो माझें सारसर्वस्व आहे!! तो माझ्या जीविताचा आधार आहे!!! इत्यादि रसाळ वाक्यें बोलूं लागते, त्या वेळीं त्या क्षणीं तिच्या तारुण्यानें मुसमुसणाऱ्या इंद्रियांकडून तिला स्वजातिसंवर्धनात्मक संवेदना मिळत आहे व योग्य तें समाधान मिळाल्याखेरीज तिचा उपशम होणार नाहीं असें निश्चित समजण्यास हरकत नाहीं. इंद्रियजन्य अशी ही संवेदना स्त्रियांच्या मनाची जी चलबिचल करून सोडते त्यामुळें होणारा स्वास्थ्य-भंग तरुणपणीं जाचक होत असतो आणि या जाचांतून मुक्त होण्यासाठीं असाहाय्यपणें ज्यावेळीं तरुण स्त्री सभोंवार पाहात असते त्यावेळीं प्रथम तिच्या कक्षेंत येणारा तरुण तिला साहाय्यक म्हणून प्रिय वाटूं लागतो, आणि या प्रीतीचा कमीपणा झांकून टाकण्यासाठीं कलेचे गोडवे अगर नसलेल्या गुणांचे गोडवे गाण्याचा त्यांच्यावर प्रसंग येतो. खरे कलावंत हे कलेला सर्वस्व वाहाण्यातच धन्यता मानीत असल्यानें विधात्याच्या या चक्रव्यूहापासून ते बहुधा चार हात दूरच रहातात. व सिहाचें कातडें पांघरणारे जंबूकच कलेच्या नांवावर विषयवासनेला रंगसफेती करीत बसतात.

## आधुनिक स्त्रियांतील फरक

अलीकडे अलीकडे मात्र पुरुषांच्या आधिभौतिक संपत्तीला तुच्छ लेखून, तिरस्कारून, त्यांच्या दैवी गुणांचीच पूजा करण्याचा, त्यावर अनुरक्त होण्याचा नवीन प्रकार स्त्रियांनीं फार झपाट्यानें पुरस्कारला आहे. कोणी चित्रकलेवर भाळत आहेत तर कोणी काव्यशक्तीवर कोणी लघुकथांनीं वेडावत आहेत तर कोणी वक्तृत्वावर बेहोष होत आहेत! गुणासंबंधी दिसून येणारा हा आदर हा आधुनिक स्त्रीचा विशेष आहे,

पण यालाहि एक कारण आहे. सध्याचे बरेचसे तरुण आणि तरुणी एकाच विशिष्ट बौद्धिक वातावरणांत वाढत असल्यानें त्यांच्या मनाला स्वाभाविकच त्याच वातावरणांत कांहीं तरी विशेष करामत करून दाखविणाराची पूजा करण्याचे वेड लागलें आहे, आणि या बुद्धिवादाच्या वाढत्या वेडानें होणारे कित्येक विवाह स्त्रियांच्या दुःखाला कारणीभूत झाले आहेत. बुद्धिमत्ता आणि स्त्रीसौख्याला आवश्यक अशा इतर गोष्टी एके ठिकाणीं असूंच शकत नाहींत असा आमच्या म्हणण्याचा उद्देश नाहीं; परंतु कल्पनासृष्टींत वावरण्याची व नुसत्या बुद्धिमत्तेमुळें मिळणाऱ्या मानसिक आनंदांतच रममाण होण्याची एखाद्या स्थितप्रज्ञाला शोभेशी वृत्ति धारण करून चालू युगांत संसारांत पदार्पण करणाऱ्या बऱ्याच स्त्रियांच्या वांट्याला दुःखाचे कांटेच आले आहेत. ज्या मुलींची मनें अशा बुद्धिवादानें भारून गेलेलीं असतात अशा मुली एखाद्या हुशार म्हणून समजल्या जाणाऱ्या परंतु त्यांच्या अंतर्गत तळमळीचें समाधान करण्यास असमर्थ अगर अनुत्सुक अशा पुरुषाच्या आहारीं जाऊन अंतीं दुःखी होतात. प्रत्यक्ष संसारांत, भावी अपत्यांची व इतर प्रापंचिक नडीअडचणींची जबाबदारी स्वीकारण्यास समर्थ असाच सौंगडी जास्त आवश्यक ठरतो. त्याच्या बुद्धिविलासापेक्षां त्याच्या शरीरसौष्ठवांत व प्रेमळ आलिंगनांतच मातब्बरी अधिक आहे हें स्त्रियांना प्रत्यक्ष संसारांत पडल्यावर मगच कळून चुकतें. आमच्या पाहण्यामध्यें असें एक उदाहरण आहे कीं, एका चांगल्या सुशिक्षित कुमारिकेनें या बुद्धिवादाच्या नादाला लागून एका वक्त्याशीं लग्न केलें. सदर मनुष्याची बोलण्याची माधुरी त्यामध्यें दिसून येणारी त्याच्या बुद्धीची चमक, त्याचा खोल अभ्यास या गोष्टी कोणासहि नाकबूल करून चालणार नाहींत; परंतु एक व्यक्ति म्हणून मात्र त्याच्या समागमामध्यें कोणालाच सौख्य वाटण्याजोगी परिस्थिति नाहीं. सदर मुलीनें व्यक्ति या दृष्टीनें त्याचा विचार न करतां त्याच्या गुणावर लुब्ध होऊन त्याच्याशीं विवाह केला, परंतु नंतर मात्र

तिला आपली चूक कळून आली ज्यावेळीं या वक्त्याच्या आलिंगनापासून तिला सौख्य होण्याऐवजीं गुदमरण्याचा प्रसंग आला त्यावेळीं तिला आपली चूक कळून आली. त्याच्या बुद्धिवैभवाचें सुख तिला वाटेना. त्याच्याशीं संसार करण्यांत आपणांस आनंदाचा काडीमात्र ठेवा लाभूं शकत नाहीं एवढी मात्र हाय तिच्या मनानें खाल्ली. तिच्या नवऱ्याचा वाढता सामाजिक उत्कर्ष तिला समाधान देऊं शकला नाहीं व ती कायमचीच दुःखी झाली.

स्त्री आणि पुरुष यांच्या वैषयिक सुखकल्पना अगदीं भिन्न असतात. जातिसंवर्धनाच्या कल्पना अगर तद्विषयक इंद्रियें यांचा ताबा स्त्रियांच्या मनावर असल्यानें वैषयिक सुख व तदनुषंगिक इतर घडामोडी यांमध्येंच स्त्रियांचें सुख–सर्वस्व सांठविलें जातें; परंतु विषयसुखामध्यें मात्र पुरुषसुखाचें सारर्वस्व नाहीं. स्त्रियांना पूरक होण्यासाठीं योग्य तो करभार देऊन मोकळें होतांच त्यांची जबाबदारी संपते; परंतु हा करभार स्वीकारल्यानंतर स्त्रियांच्या खऱ्या कार्याला सुरुवात होते. या कार्याच्या सुसूत्रपणावर स्त्रीसौख्याची सारी इमारत उभी आहे आणि यामुळें जीवनाचें सारसर्वस्व ज्या ठिकाणीं एकवटलें आहे अशा या एकमेव सुखामध्यें व्यत्यय येतांच स्त्रीजीवनाची माधुरी नष्ट होते. बाह्य जड सृष्टींतील इतर सुखें या वरील मूलभूत सुखाला पोषक म्हणून राहतात परंतु त्या सुखांच्या अभावींहि स्त्रियांवरील एकाच सुखावर समाधान मानून राहूं शकतात ! याच्या उलट बाकीचीं इतर सुखें त्यांच्यापुढें हात जोडीत उभीं राहिलीं, परंतु विषयसुख व त्यानंतरच्या एकंदर घडामोडी-मुळें तिच्या इंद्रियांना मिळणारी तृप्ति यांमध्यें वैगुण्य राहिलें तर त्या असमाधानीच राहतात. सध्याचें बुद्धिवादाचें व प्रेमाचें वाढतें प्रस्थ याच कारणानें स्त्रियांना जितकें बाधक होत आहे, तितकें तें पुरुषांना होत नाहीं असें दिसतें आहे.

## निसर्गाची ओढ

प्रेमकल्पनांच्या बुडाशीं जी एक विशिष्ट कारणपरंपरा आहे ती निरखून पाहिली असतां प्रचलित स्त्रीवर्गांत पसरलेल्या औदासीन्याचा थोडाफार उलगडा होणार आहे. कुमारी राहण्याची वाढती प्रवृत्ति व विवाह झालाच तर विवाहोत्तर दिसून येणारें औदासीन्य व निरुत्साहित्व या सर्व गोष्टी एकाच कारणपरंपरेच्या द्योतक आहेत. आणि म्हणून याचा थोडा अधिक विचार करणें अवश्य आहे. मध्यम अगर सुशिक्षित म्हणून पुढारलेला समजल्या जाणाऱ्या वर्गांतील मुलामुलींची आज बरीच कुचंबणा होत आहे निसर्गसिद्ध आरोग्यानें परिपूर्ण अशी सतरा वर्षांची मुलगी ज्या वेळीं या जगामध्यें नटत-मुरडत पदार्पण करते त्या वेळीं तिच्या अंतःकरणांत नुकतीच जागृत झालेली निसर्गाची ओढ तिला " जगांत आपणास कोणी सौंगडी भेटेल काय ? " या दृष्टीनेंच प्रथम जगाकडे पाहावयास लागते. यौवनानें बहरलेल्या आपल्या या शरीराला व निसर्गसिद्ध इंद्रियांच्या वासनांना तृप्तीचा लाभ करून देईल अशा एका तरुणाची मार्गप्रतीक्षा करीत राहण्यांस तिला एक विशेष उत्सुकता व आनंद वाटत असतो. तिला तिचे आईबाप सोन्यामोत्याचें अलंकार करून देतील, सुंदर सुंदर वस्त्रें परिधान करण्यास देतील, पण यामुळें तिच्या अंतरंगांतील ओढ काडीमात्र कमी होणार नाहीं. अशा रीतीनें मार्गप्रतीक्षा करण्यांत जर तिचें एकोणिसावें, विसावें वर्ष कांहींही विशेष न होतां निघून गेलें तर तिच्या जीवनाची अपूर्णता तिला अत्यंत तीव्रपणानें जाणवूं लागते. आपलें धन असें व्यर्थ पाडून टाकण्यापेक्षां कोणा तरी कां होईना पण तरुणाच्या हवालीं करून टाकण्याच्या कल्पना मनांत डोकावूं लागतात आणि या आत्यंतिक वासनेच्या भरांत आपलें सर्वस्व झटकन कोणाच्या तरी स्वाधीन करून त्या मोकळ्या होतात.

## आंधळें प्रेम

या वासनांचा प्रवाह इतका वलवत्तर ठरतो कीं, या तरुण कुमारिकांकडून आपल्या प्रियकरांचा कोणत्याहि परिस्थितीचा नीट विचार केला जात नाहीं, आणि म्हणूनच प्रेम आंधळें आहे, असें या लंगडया व्यवहाराचें समर्थन करणें भाग पडतें. आत्यंतिक वासनांची तृप्ति होतांच या तरुणी मदनाच्या सृष्टींतून या जड सृष्टींत पदार्पण करतात आणि नंतर मग आपल्या कृतीचा पश्चात्ताप करण्याची पाळी त्यांच्यावर येते. अर्थात् वासनांच्या आहारीं जाण्यापूर्वी सारासार विचार करण्याची कला, तारुण्यसुलभ उच्छृंखलपणामुळें त्यांच्या ठिकाणीं असूं शकत नाहीं. या मोहमय परिस्थितीला बगल देऊनहि ज्या मुली वयाची पंचविशी गांठतात त्यांच्या ठिकाणच्या नैसर्गिक वासना हळूहळू मृतप्राय होऊं लागतात. तृप्तीसाठीं धडपडणारीं इंद्रियें अनैसर्गिक साधनांचा मारा होतांच हळूहळू चेतनाहीन बनूं लागतात आणि वसंतपरित्यक्त उपवनाप्रमाणें अतृप्त स्त्रीचें यौवन व सौंदर्य रुक्ष होऊं लागतें. वासनाक्षयाबरोबरच निरुत्साहाचा पगडा मनावर बसूं लागून पूर्वीच्या यौवनसंपन्न व तेजस्वी कुमारिकेंतूनच दुर्मुखलेली, दुबळी, क्षीण, कांतिहीन अशी ही प्रौढ कुमारी निर्माण होते. तिला झोंप लागत नाहीं, अन्न गोड लागत नाहीं, पदोपदीं शीण वाटतो. तिच्यावर ओढवलेल्या या आपत्तींची जाणीव तिला पूर्ण असते.

## पुरुषद्वेष्ट्या कुमारिका

आपल्या अवयवांवर पसरलेली वार्धक्याची छाया अकालीं आली आहे याची कल्पना तिला असते. अज्ञानानें पण जाणूनबुजून पत्करलेली अगर कांहीं कारणांनीं तिच्यावर लादली गेलेली ही अतृप्ति तिच्या उत्साही जीवनाचा सर्वनाश करून टाकते, व पूर्वीच्या उत्साहाची जागा पोकळ अभिमानानें घेतली गेल्याकारणानें सौभाग्य या शब्दांत गुलामगिरी आहे आणि कुमारीमध्येंच स्त्रीस्वातंत्र्याची खरी शोभा आहे अशा तऱ्हेचीं पोकळ विधानें करून मेलेल्या वासनांना स्मरून मोठ्या कष्टानें

अंतर्गत व्यथेला दाबण्याचा शक्य तो प्रयत्न त्या करीत असतात. त्यांच्या अतृप्तीस सर्वस्वी पुरुषच कारणीभूत झाले असल्यामुळें त्या कट्टया पुरुषद्वेष्ट्या बनतात. अशा प्रौढ कुमारिकांकडून व अतृप्त स्त्रियांकडूनच सहसा पुरुषद्वेषाचीं विधानें केलीं जातात; आणि त्याच्या बुडाशीं तत्त्व नसून मानव्यसुलभ सूडबुद्धिच असते. आपला एवढा सुंदर देह व इंद्रिय-रचना ओस पाडून आपलें जीवित निरानंद व निराशामय करून टाकणाऱ्या पुरुषजातीवर तोंडसुख घेण्यापलीकडे त्यांच्या हातीं कोणतीच गोष्ट नाहीं. आपण वयाच्या एकोणिस—विसाव्या वर्षीं निसर्गानें दिलेल्या अनेक मोहमय अलंकारांनीं नटूनथटून उभ्या असतां आपणांकडे दुर्लक्ष करणाऱ्या पुरुषासंबंधीं त्यांच्या मनांत कां अढी राहूं नये ? यौवनभरामध्यें उत्साहानें, आशेनें जीवाला कवटाळण्यासाठीं आपले हात पसरणारी तरुण स्त्री हातांमध्यें योग्य तें वरदान घेतल्याशिवाय हात मागें घेऊं शकत नाहीं. तिच्या जीवनाला कायम चैतन्य प्राप्त करून देणारी शक्ति या प्रसंगीं तिच्या हातांत प्रसादरूपानें पडली नाहीं तर निराशेचा दारुण आघात एखाद्या कोमल वेलीवर झालेल्या वज्राघाताप्रमाणें चूर्णविचूर्ण केल्याशिवाय राहणार नाहीं. हाच प्रकार कांहीं अंशीं पुरुषाच्या बाब-तींतहि असतो. ज्यावेळीं एखादा तरुण, आपण अमूक अमूक तरुणीच्या प्रेमपाशांत सांपडलों आहोंत अशी कबुली देऊन आपल्या प्रेमाचें समर्थन करीत असतो त्यावेळीं या प्रेमव्यवहारावर ओढूनताणून आणलेल्या उच्च तत्त्वांचा झिरझिरीत पडदा दूर सारतांच त्याच्या खालीं विषयवासनाच तीव्र स्वरूपांत असल्याचें आढळून येईल.

## विवाहसंस्था व कुटुंबसंस्था

जीवनाचा विकास आणि द्विगुणीकरण करीत असतां समाजांतील प्रत्येक घटक मग ती स्त्री असो, अगर पुरुष असो कांहीं विशेष बंधनांनीं व जबाबदारीनें बांधला गेलेला असतो. उत्साहपूर्ण व आरोग्यसंपन्न असा पुरुष आपल्या रोजच्या कार्यक्रमांत किंचितहि व्यत्यय येऊं न देतां एका

वर्षांत सुमारें शंभरं स्त्रियांच्या ठिकाणीं प्रजोत्पत्ती करूं शकतो, परंतु लगेच पुढील वर्षी शंभर अपत्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी तो घेऊं शकेल काय? एखाद्या लक्षाधीशाच्या बाबतींत ही गोष्ट शक्य होऊं शकेल; पण सर्वच माणसें कांहीं लक्षाधीश नाहींत, आणि म्हणूनच वासनातृप्तीसाठीं एकत्र येणाऱ्या स्त्री-पुरुषांवर सामाजिक व राजकीय दृष्ट्या निर्बंध घालावे लागतात. नैसर्गिक व्यवहारामुळें सरसहा निर्माण होणाऱ्या प्रजेचें नियंत्रण करण्यासाठीं म्हणून लोकसंख्येस, आरोग्यास, मानव्याच्या विकासास अडथळा न आणतील असे निर्बंध व्यक्तिमात्रावर घालणें अवश्य आहे. हे निर्बंध म्हणजेच विवाह संस्था व तज्जन्य कुटुंबसंस्था होय! वैवाहिक निर्बंध व त्यामुळें अस्तित्वांत येणारीं जोडपीं ही आपल्या संततीला जबाबदार धरली गेली असल्यामुळें, समाजांत सुस्थितींत नांदू शकतात. तेच वैवाहिक बंधनाखेरीज लैंगिक आचार सुरू ठेविला तर रक्ताची भेसळ व बेवारशी प्रजा यांचा बुजबुजाट सुरू होऊन योग्य संरक्षणाचे अभावीं एक तिचा नाश तरी होईल अगर सरकारला यांत लक्ष घालावें लागेल व अशा प्रजेला योग्य तें संरक्षण द्यावें लागेल. परंतु अशी जबाबदारी सरकार या संस्थेवर पडणें औचित्यास धरून होणार नाहीं. यासाठीं लग्न व कुटुंबसंस्थेचें स्थैर्य भावी पिढ्यांच्या स्वास्थ्यासाठीं कायम राखणें आवश्यक आहे.

## भावी पिढ्यांची घडण

अंतर्गत ओढीने एकत्र येणारें स्त्री—पुरुष मग ते लग्नाच्या राजरोस मार्गानें येवोत किंवा अन्य कोण्या मार्गानें येवोत, अपत्यांना जन्म दिल्याशिवाय राहात नाहींत, आणि म्हणून त्यांच्या एकत्रित येण्याच्या घटनेला त्या क्षणापुरतें महत्त्व नसून भावी परिणामाच्या दृष्टीनें त्याला एक विशेष कायम स्वरूपाचें महत्त्व आहे. समाजस्वास्थ्याला जर जपावयाचें असेल तर या एकत्रित येण्याला विवाहसंस्थेकडून शिक्कामोर्तब करून घेणें अवश्य आहे. या जोडीला पांच मिनिटें नव्हे, तर जन्माचें

एकत्रित आणणें जरूर आहे. लग्न ही वैयक्तिक बाब हीं गोष्ट खोटी आहे. समाजस्थैर्याच्या दृष्टीनें केला जाणारा तो एक करार आहे. हल्ली लग्न ही खासगी बाब असून त्यांत समाजाचाच काय पण खुद आई-बापांचाहि कांहीं संबंध नाहीं अशी एक घातक समजूत फार झपाट्यानें पुढें येत आहे; परंतु ती चुकीची आहे. वैवाहिक संबंधांतूनच भावी पिढ्यांची घडण होत असते. मनुष्याचे गुणधर्म त्याच्या ठिकाणीं त्याच्या मातापित्यांच्या रक्तांतून उतरत असतात. या दृष्टीनें गुणधर्म साधर्म्याची जोडपीं अस्तित्वांत येणें अत्यंत आवश्यक आहे. कसलेल्या शेतकऱ्याच्या मुलानें आपल्या घराण्याची आनुवंशिकता व स्वास्थ्य कायम ठेवण्यासाठीं समानधर्मी कुटुंबांतील कुमारी आपली सहधर्मचारिणी म्हणून स्वीकारण्यांत स्वास्थ्य आहे. अशा संबंधापासून घराण्यामध्यें चालत आलेली परंपरा भावी पिढ्याच्या रक्तांत पुरेपूर उतरून समाजास अवश्य असणारे घटक अधिकाधिक उत्क्रांत होऊन समाजास वारंवार मिळून राहतात. हल्लीच्या या वाढत्या प्रेमवेडानें विधर्मी गुणधर्मांचें स्त्रीपुरुष एकत्र येण्याचा फार संभव असतो, आणि विवाह ही खासगी बाब समजण्याची वृत्ति असल्यानें समाजबंधनेहि झुगारून देण्यांत येतात. त्यामुळें पिढ्यांतील अनुवंशिक गुणसमुच्चय नष्ट होत जाऊन अर्धवट व निरुपयोगी अशी प्रजा जन्मास येते. व आईबापांच्या कृतीचा परिणाम भोगण्याची पाळी या निरपराध जीवावर येते. वैषयिक सुखाचा संबंध जितका व्यक्तीशीं आहे त्याच्या हजारों पटींनी अधिक तो समाजाशीं आहे. आणि म्हणून समाजसुस्थिति व कायदा यांनीं नियंत्रित केलेलें विषयसुख हीच मानव्यांची खरी कल्पना! केवळ वासनातृप्तीसाठीं केव्हांहि एकत्र येऊं व विभक्त होऊं म्हणणारीं माणसें नसून पशूच होत!

लग्नसंस्था ही भावी पिढ्यांना संरक्षण देणारी एक अत्यंत पवित्र संस्था आहे, आणि या संस्थेच्या बाहेर राहून वासना तृप्त करणारे लोक भावी पिढ्यांवर फार मोठा आघात करीत असतात. मातापित्यांच्या संगोपनाला

आंचवणारी प्रजा जन्म एकीपासून, तर दूध दुसरीचें अशा स्थितींत सर्रास वाढू लागल्यास, मनुष्यानें आपल्या ठिकाणीं विकसित केलेल्या गुणधर्मास आंचवून ती नाश पावल्याशिवाय राहणार नाहीं.

## स्त्रियांच्या आनंदाचा ठेवा

लैंगिक आचार हा एखाद्या यंत्राची क्रिया चालू करणाऱ्या कळीप्रमाणें स्त्रियांच्या उपयोगीं पडत असतो. स्त्रीशरीररूपी यंत्रकार्यप्रवण करण्याची शक्ति लैंगिक आचारामध्यें आहे. त्यामुळें स्त्रीचा लैंगिक आचार ही तिच्या क्षणिक सुखाची बाब नसून तिच्या जीवनावर कायम परिणाम करणारी शक्ति आहे. स्त्रीच्या शरीरयंत्राकडून होणारें कार्य म्हणजे गर्भ-धारणा-अपत्यजन्म व नंतर त्यांचें संगोपन हें होय! यामुळें अपत्यासंबंधीं स्त्रीला जितकी आस्था वाटते ? तितकी पुरुषांना वाटत नाहीं. मुलांच्या संगोपनांत सुद्धां स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक आनंदाचा ठेवा असल्यानें मुलांना अंगावर पाजणारी माता निव्वळ कर्तव्याच्या जाणीवेनेंच हें करतें असें नाहीं तर त्यांत तिलाहि एका अननुभूत आनंदाचा लाभ घडतो! मुलांच्या बाबतींत पुरुषांकडून घेतली जाणारी काळजी मात्र केवळ कर्तव्यस्वरूपाची असल्यानें त्यांत कित्येक वेळा कठोरपणा असतो, आणि त्यामुळें मातापित्यांतील प्रेमाचा फरक लगेच मुलांना जाणवतो. अपत्यांची जबाबदारी पुरुषांच्या सुज्ञपणावर अवलंबून राहते; पण स्त्री मात्र यांत हयगय करू शकत नाहीं. यामुळें मातेच्या शिक्षेचा प्रभाव जितका मुलांच्या जीवनावर घडतो तितका पित्याच्या शिक्षेचा घडत नाहीं. परंतु मातेच्या जीवनांतील स्थैर्य विवाहसंस्था मोडून नष्ट करण्यांत आलें तर मात्र अपत्य संगोपनाची व त्याजबरोबर भावी पिढ्यास वळण लावण्याची जबाबदारी तिच्या हातून कितपत पार पडेल याची शंका आहे. आणि म्हणून प्रेम अर्थात् वासना तृप्त करीत असतांना या संबंधाला जास्तींत जास्त स्थैर्य कसें आणता येईल याचा प्रत्येकानें विचार केला पाहिजे. कौटुंबिक जबाबदारी लक्षांत घेऊन श्रमविभाग

करणें, अर्थात् स्त्रीला माता व गृहस्वामिनी करून तिच्या स्वास्थ्याची काळजी हें प्रथम कर्तव्य आहे. कारण भावी पिढीचे व मानव वंशाचे देवदूत निर्माण करण्याची जबाबदारी तिजवर आहे. स्त्री-पुरुषाच्या परस्पर संबंधाचा आणि कौटुंबिक व सामाजिक जबाबदारीचा विचार करतां विवाह ही संस्था अगदींच अनवश्यक आहे असें म्हणतां येणार नाहीं. तिचें स्वरूप कसें असावें याबद्दल फार तर मतभेद होऊं शकेल.

परंतु हा मतभेद सुद्धां अस्तित्वांत आणतांना एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, या संस्थेमध्यें शिथिलता निर्माण करण्यांत येईल व वैवाहिक बंधनांतून सहजासहजी मुक्त होतां येऊं शकेल, इतक्या लवचिक स्वरूपाची ही संस्था ठरेल तर फिरून मानव आपल्या मूळ रानटी अवस्थेकडे लोटला गेल्याशिवाय राहाणार नाहीं. बायकांसाठीं होणारी डोकेफोड, सोडचिठ्ठया, या घराची आजची स्वामिनी तर उद्यां त्या घराची रखेली, असले प्रकार खालच्या समाजांत पदोपदीं व घरोघरीं दिसतात. हा कशाचा परिणाम आहे याचा विचार समाजशास्त्रवेत्त्यांनीं जरूर करावा. मानव हा समाजशील प्राणी आहे व मानवांच्या नैसर्गिक आचारांत, लैंगिक आचार हा एक प्रधान आचार आहे. लैंगिक आचार व समाजधारणा यांचा अन्योन्य संबंध असल्यानें समाजमंदिराचा कुटुंब हा पाया आहे. लैंगिक आचारानें एकमेकांशीं कायम स्वरूपांत बद्ध झालेले स्त्रीपुरुष हे त्या पायाचे चिरे आहेत. लैंगिक आचाराला जर स्थैर्य नसेल, कांहीं विशिष्ट बंधनांनीं तो जर मर्यादित केला गेला नसेल तर स्त्रीपुरुष क्षणाक्षणाला विस्कळीत होऊन कुटुंबाचा व पर्यायानें समाजाचा नाश झाल्याविना राहणार नाहीं.

# ५. पाश्चात्य जीवनाकडे ओझरती नजर

गेल्या लेखांकांत वैवाहिक बंधनांची आवश्यकता आम्ही प्रतिपादन केली. पुरुषांना जरी हीं बंधनें रुचत नसलीं तरी स्त्रीस्वास्थ्याच्या दृष्टीनें तीं आवश्यकच आहेत. कोणतीच जबाबदारी नसल्यानें पुरुषांना मधुकरवृत्ति स्वीकारण्यांतच आनंद वाटेल हें स्वाभाविक आहे, पण त्या वृत्तीमुळें स्त्रीजीवन सुसह्य होणार नाहीं. योग्य काळीं क्रमानें संतती प्राप्त होणें हाच स्त्रीसौख्याचा खरा ठेवा आहे. अर्थात् या संततीला व स्त्रीला योग्य संरक्षण हें मिळालेंच पाहिजे. स्वैराचारांत हें स्वास्थ्य स्त्रीला लाभण्याचा संभव कमी, म्हणूनच बंधनांची आवश्यकता मनुष्याला भासते. परंतु इतकीं बंधनें असूनहि स्वैराचार कांहीं प्रमाणांत कां होईना पण समाजांत दृष्टीला पडतोच. तो कां याची आतां छाननी करण्यास हरकत नाहीं.

स्त्रीच्या तिच्या इंद्रियांची तृप्ति वारंवार होणें ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे आणि हें समाधान तिला मिळवून देणारा तिचा पती तिला या दृष्टीनें आदरणीय आहे. या आदराला जास्त भडक व आदर्श असें स्वरूप आपण आपल्या नीतिनियमांनीं देतों. संततीची अपेक्षा स्त्रियांच्या मनांत इतकी तीव्रतर असते कीं, यापुढें बाकीच्या इतर गोष्टींची त्यांना फारशी फिकीर वाटत नाहीं. प्राणिसृष्टींतील सर्वच स्त्रियांमध्यें ही ओढ दिसून येते. त्यांच्या या ओढीलाच कोणी " निसर्गाची हाक असें म्हणतात. शॉपेनहार यालाच " वुइल ऑफ दि स्पीसीज् " म्हणतो. ( will of the species–wille der gattung ) ( निसर्ग स्त्रियांच्या अंतःकरणांत मूर्तिमंत उभा असतो. ) सृष्टीचें कार्य निर्वेध व अप्रतिहत रीतीनें चालू राहाण्यास स्त्रियांच्या ठिकाणीं अपत्यप्राप्तीसंबंधी आत्यंतिक वासना असणें अवश्य आहे. स्त्रियांना संततीची मातब्बरी अधिक आहे.

पतीला त्यांच्या अंतःकरणांत, संतती प्राप्त करून घेण्याचें साधन या दृष्टीनें दुय्यम स्थान आहे.

## स्त्री-जीवनांतील सौख्याचा सांठा

'It is a means to an end and no end in itself.' अशी पुरुषाची स्थिति आहे. स्त्रीचें मुख्य सौख्य मातृत्वांत! आणि स्त्रिया मातृत्वाला आवश्यक म्हणूनच त्या पतीची उपासना करतात. प्रेमाची रसभरीत वर्णनें आणि प्रेमासाठीं व्याकूळ होणारे जीव ही आपली मखलाशी आहे. निसर्ग हा वर नमूद केल्याप्रमाणें आहे. काव्यालंकारांशीं याचा परिचय नाहीं. वारंवार क्रमाक्रमानें संतती प्राप्त करून घेणारी सशक्त, सुदृढ स्त्री दुसऱ्या प्रेमाच्या फंदांत सांपडूं शकत नाहीं असा पाश्चात्यांचा अनुभव आहे. तिचा पति सुशिक्षित नसेल, विद्वान नसेल, फार काय कांहीसा दुर्गुणीही पण असेल. तरीहि तो स्त्रियांना अप्रिय होऊं शकत नाहीं. तिला संतती आणि संरक्षण मिळालें म्हणजे बस्स! तिला येथें कोणत्याच सुखाची कमतरता वाटत नाहीं. इंग्लंडमध्यें ही गोष्ट आंकडेशास्त्राच्या आधारें सिद्ध करण्यांत आली आहे. अधिक संतती असलेल्या स्त्रिपुरुषांमध्यें सहसा घटस्फोट होत नाहींत. आणि म्हणूनच मुलें हीं विवाहाची गांठ दृढतर करणारे देवदूत आहेत असें तिकडे म्हणण्यांत येतें. याचा अर्थ हाच कीं, तिकडे असलेली वैवाहिक बंधनांची शिथिलता अपत्यामुळें दूर होते. उठल्यासुटल्या घटस्फोट मागण्याची बुद्धि भरपूर संतती असलेल्या मातांना होत नाही, उलट पुरुषच यांतून सुटण्यास मार्ग पाहात असतात. कारण त्यांना जबाबदारी नको असते. मुलांच्या आगमनामुळें मतभेदाला जागा राहात नाहीं किंवा त्यामुळें पतिपत्नींतील प्रेम वाढीला लागतें असा याचा अर्थ नाहीं. स्त्रीजीवनांतील सौख्याचा सांठा स्त्रियांना मिळाल्यामुळें इतर क्षुल्लक गोष्टींची पर्वा करीत बसण्याची जरूर त्यांना वाटत नाहीं. कांहीं लोकांचा अशीहि कल्पना आहे कीं, अपत्यजन्मामुळें स्त्री-पुरुषांचें प्रेम

या नवीन बालकांच्या ठिकाणीं एकवटल्यामुळें व्यक्तिशः त्यांच्या परस्परांतील आकर्षणास जरी ओहोटी लागली तरी अपत्यप्रेमास्तव ते सहसा विभक्त होऊं शकत नाहींत. 'Married life, and I believe you will find that if there are children, it keeps the home together, and they both work together.'

Lord Salvesen, Judge of Court Sessions, Scotland.

तरुण माता आपल्या नूतन अपत्याच्या सरबराईत इतकी गुंग होऊन जाते कीं, बाकी इतर कोणत्याच गोष्टीकडे तिचें लक्ष जात नाहीं. तिच्या ठिकाणीं निर्माण झालेली ही एकतानता तिच्या खऱ्या स्त्रीत्वाची निदर्शक आहे, आणि यामुळें तिच्या पतीला कित्येक वेळां, आपल्या पत्नीच्या अंतःकरणांत या नूतन प्रेमाच्या उद्भवामुळें आपलें स्थान दुय्यम झालें आहे हें कळून चुकतें. प्रथम तिला सुमधुर वाटणाऱ्या त्याच्या प्रेमगोष्टी ती आतां तितक्याशा उत्सुकतेनें ऐकण्यास तयार नसते. या नवबालकाचें बोबडे शब्दच तिला अधिक आकर्षक वाटतात. सर्वसाधारण पिता हाहि आपल्या अपत्यावर आपल्या प्रेमाचा वर्षाव करीत असतो व पत्नीप्रेमांत झालेली उणीव या प्रेमानें भरून काढीत असतो.

मागें स्त्रीला मूर्तीमंत जीवन म्हणून संबोधण्यांत आलें आहे. जीवसंवर्धनाची स्त्री अंतःकरणांत असलेली ओढ अर्थात् 'वुइल ऑफ दि स्पीसीज' सृष्टींत मानवांचें अस्तित्व कायम टिकवून धरीत असते. यासाठीं स्त्री–अंतःकरणांत चाललेली धडपड व व्याकुळता ही निव्वळ त्यांच्या जीवनाची नसून, जीवनाच्या द्विगुणीकरणाची असते. स्त्रीजीवन अर्थात् जीवसृष्टिनिर्मिति असाच अर्थ आहे. स्त्रियांचीं इंद्रियरचना निष्क्रिय राहण्याने जीव सृष्टीला व्यत्यय येतो, ही वस्तुस्थिति आहे. आपल्या ठिकाणीं संतती निर्माण करून घेण्याची इच्छा प्राणिसृष्टींतील प्रत्येक स्त्रीच्या ठिकाणीं असल्यानें जीवनाचा विकास होतो व प्राणिसृष्टी कायम रहाते. प्राणि-सृष्टींतील सर्वच स्त्रियांच्या ठिकाणीं ही भावना

निसर्गतःच असल्याने योग्य कालीं संतती प्राप्त झाली नाहीं तर त्या अस्वस्थ होतात, तृप्तीच्या अभावीं ही अस्वस्थता जर वाढतच राहिली तर तिचा परिणाम मानसिक व शारीरिक व्यथा जडण्याकडे होतो. जीवनाचें वर्धीकरण हा स्त्री-स्वभाव, स्त्री-धर्म असल्यानें स्त्रियांची प्रत्येक कृति हें ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीनें घडत असतें. वैयक्तिक इच्छापूर्ति व वैयक्तिक सुखलाभ या पलीकडे निसर्ग पुढे, पुढे तिला दुसरा विचार करूच देत नाही, आणि या गोष्टी प्राप्त होतांच निसर्गाचें कार्य साध्य होऊन जीवसंवर्धन होते. अपत्यधारणेच्या दृष्टीने स्त्रियांच्या हातून घडणाऱ्या कृति या त्यांच्या हातून कांहींशा न कळत घडत असतात. त्यावेळीं परिणामाचें ज्ञान इतकेसें नसतें, कार्यकारणभाव कळत नसतो आणि निसर्गप्रेरणेचा हाच विशेष आहे. हा सर्व 'विपर्यस्त संवेदनेचा' परिणाम असतो.

(So far from being conscious of the will to the multiplication of life, it frequently happens that women do all that is required in order to achieve fertilization and yet protest that they don't wish to have children, or that they do not care for children.)

## स्त्रियांचे प्रमाद

वर वर्णन केलेल्या या स्वभावविशेषामुळें स्त्रियांच्या हातून शास्त्रकारांनीं पाप म्हणून ठरविलेल्या कित्येक गोष्टी नाईलाजानें घडत असतात. पतीच्या अपरोक्ष क्वचित प्रसंगी त्यांच्या हातून घडणारी आगळीक ही त्यांच्या स्वभाववैशिष्ट्याची द्योतक आहे. लांबच्या प्रवासावर असलेले, मृत झालेले, अगर अशा अनेक कारणांनी स्वस्त्रियांच्या ठिकाणीं बसणाऱ्या या नैसर्गिक ओढीची तृप्ति करूं न शकणारे पती, त्यांना अन्यमार्गाचा अवलंब करावयास भाग पाडतात. जीवशक्तीच्या प्रचंड ओढीपुढें नीतिबंधनें कित्येक वेळा टिकाव धरीनाशी होतात व स्त्रियांच्या हातून

प्रमाद घडतात. पतीची गैरहजेरी तिच्या उत्पादक इंद्रियांना निष्क्रीय ठेवते व स्त्रियांना पतीपेक्षांहि जीवनशक्तीशीं अधिक विश्वासपणें वागावें लागत असल्यानें पतीला दूर सारून समाजबंधनांना झिडकारून जीवनाच्या हाकेला ओ देण्याचा मोह त्यांना आवरता येत नाहीं. जीवनशक्तीच्या प्रवाहापुढें सर्व कायदे, नीतिनियम फिके पडतात. स्त्रियांच्या या उच्छृंखलतेचा विचार मनू या हिंदुधर्मशास्त्रकारानें केला होता हें उघड दिसतें. त्याने या बाबतींत योग्य तें सौजन्य प्रकट केलें आहे. विशिष्ट कारणपरंपरेनें स्त्रीला पतीपासून संतति लाभ घडूं शकला नाहीं तर अन्य मार्गानें प्रजोत्पत्ति करून घ्यावी अशी मुभा शास्त्रकारांनींहि ठेविली आहे; पण या अपवादात्मक गोष्टी आहेत हें विसरून भागणार नाहीं.

## निसर्गाचे कायदे व मनुष्याचे कायदे

अपत्यहीन स्त्रीला स्वर्ग मिळत नाहीं अशी हिंदु समाजांतील एक कल्पना आहे तिच्या बुडाशींहि पण हीच गोष्ट आहे. स्त्रियांचें सुखसर्वस्व अपत्यांत असल्यानें त्यांना आंचवणारी स्त्री या स्वर्गीय सुखाला मुकतेच नाही का? गेल्या महायुद्धांत, इंग्लंडमध्यें एक चमत्कार दिसून आला. वस्तुतः तो चमत्कार नव्हता, पण त्यामुळें अज्ञ आणि धार्मिक समजुतीच्या लोकाबरोबरच अनुभवशील अशा कसलेल्या समाजशास्त्रज्ञांना व न्यायाधिशांनाहि धक्का बसला. इंग्लंडमधील लाखों तरूण देशासाठीं आणि राजासाठीं शौर्यानें लढून प्राणार्पण करीत होते त्याचवेळीं त्यांच्या लाखो स्त्रिया जारिणी बनून प्रजोत्पत्ति करून घेण्याच्या नादांत होत्या! लग्नांत घेतलेल्या शपथेला, ध्येयाला आणि नीतिमत्तेला झुगारून देऊन त्यांनीं पत्करलेला हा मार्ग त्यांच्या ठिकाणीं वसणाऱ्या प्रबळ इंद्रियजन्य वासनांचा निदर्शक नाहीं का? पिढ्यान् पिढया चालत आलेला स्त्रीधर्म त्यांची एकंदर शरीर-इंद्रियरचना, त्या इंद्रियरचेमुळें त्यांच्या ठिकाणीं निर्माण होणारी प्रबळ संततीची इच्छा या सर्वांपुढें ध्येयाच्या

आणि नीतिमत्तेच्या कल्पना टिकाव धरून किती धरणार? जीवनाला नैसर्गिक असे कांहीं कायदे लागू असतात कीं जे आपणांस बदलतां येत नाहींत अगर ज्यांचें उल्लंघन विशिष्ट मर्यादेपलीकडे करतां येऊं शकत नाहीं. या नैसर्गिक कायद्यांना अनुसरून मनुष्यानें आपले कायदे करून घ्यावयाचे असतात.

[stamp]

## पुरुषांची चूक

इंग्लंड आणि वेल्स यामधील स्त्रियांच्या हातून युद्धकाळीं घडलेला प्रकार पुरुषवर्गाला केवढाहि मोठा धक्का देणारा असला तरी स्त्रियांच्या मूलभूत गरजांवर व स्वभावधर्मावर त्यानें चांगलाच प्रकाश पाडला. उत्तम आरोग्यसंपन्न स्त्री पतीपेक्षा निसर्गाशींच अधिक इमानी राहू शकते, जीवनाशींच तिचा अधिक निकट संबंध असतो आणि तिच्या जीवनाची पूर्ति, सांगता जर शास्त्रोक्त पद्धतीनें तिच्याशीं विवाहित झालेल्या पतीकडून झाली नाहीं तर जीवनाशीं समरस झालेली स्त्री अन्य उपायांची योजना करण्यास प्रवृत्त केली जाते. स्त्रियांच्या हातून घडणाऱ्या या कृतीचा दोष त्यांच्याकडे नसून स्त्रियांविषयीं भलत्याच अपेक्षा करणाऱ्या पुरुषवर्गाचा असतो. स्त्रियांच्या मनोव्यापाराचें यथार्थ ज्ञान नसल्यानें त्यांची अशी कल्पना असते कीं एकदा आपणाशीं विवाहबद्ध झालेली स्त्री, आपल्याकडून तिच्या जीवनविकासाची आणि पूर्तीची कोणतीच तरतूद झाली नाहीं तरी ती आपणांहून अन्य पुरुषाकडे पाहणारच नाहीं! परंतु ही कल्पना बरीचशी चुकीची आहे. स्त्री आपले गुणधर्म सहसा बदलूं शकत नाहीं. आत्मिक उन्नतीचा परिणाम तिच्या मनावर होत नाहीं. ज्याला आपण वर "वुइल ऑफ दि स्पिसीज् म्हटलें' ती त्यांना स्वस्थ बसूं देत नाहीं. कित्येक वेळां विवाहित स्त्रिया जेव्हां परपुरुषाची अपेक्षा करतांना दृष्टीला पडतात त्यावेळीं, या परकीय मूर्खांची अशी कल्पना असते कीं, त्यांच्या पतीपेक्षा आपले ठिकाणीं

कांहीं तरी विशेष गुणसमुच्चय असल्यानें त्या आपणावर अनुरक्त होत आहेत. परंतु ही त्यांची कल्पना चुकीची आहे.

स्त्रियांना पुरुषांच्या इतर गुणसमुच्चयापेक्षा व शरीरसौष्ठवापेक्षा वासनातृप्तीची अधिक गरज असते. आणि म्हणूनच त्यांच्या हातून वरीलसारखे वर्तन क्वचित् प्रसंगीं घडतें. ज्या वेळीं एखादी स्त्री आपल्या पतीला फसविते असें आपण म्हणतों, त्या वेळीं ती स्त्री पुरुषाला फसवीत नसून एक पुरुष दुसऱ्या पुरुषाला फसवीत असतो हेंच खरें! स्त्रीला तिच्या पतीच्या अपरोक्ष साहाय्य होणारा इसमच अधिक दोषास्पद होय. परंतु हीं उदाहरणें अपवादात्मक असल्यानें त्यांची विशेष चर्चा करण्याचें कारण नाहीं, यामुळें शाबित होणारा स्त्रियांचा मनोधर्म तेवढाच लक्षांत घ्यावयाचा. या त्यांच्या स्वभावधर्मामुळें कित्येक प्रसंगीं त्यांना अत्यंत बिकट परिस्थितींत सांपडावें लागते, म्हणून हा स्वभावधर्म अनर्थकारी आहे असा मात्र याचा अर्थ नाहीं. उलट समाजधारणेला हा पोषकच आहे. मनूनें अगर प्राचीन शास्त्रकारांनीं अपत्यहीन स्त्रियांसाठीं कांहीं सवलती, मुद्दाम, हा स्वभावविशेष लक्षांत घेऊनच ठेविल्या आहेत; परंतु आज रूढीमुळें त्यांचा नाश झाला आहे.

समाजाचें जर सूक्ष्म परीक्षण केलें तर व्यभिचाराच्या पुष्कळशा गोष्टी संतती नसण्यामुळें घडून येतात असें दिसून येणार आहे. इंग्लंडमध्यें घटस्फोटाची मागणी विशेषतः अशाच स्त्रियांचेकडून होते. आर्थिक अगर आणखी कांहीं परिस्थितिमुळे संततिनियमनासारखीं साधनें वापरून स्त्रियांवर वंध्यत्व लादलें जात असेल तर त्यांची फार कुचंबणा होते. त्यांना सांसारिक जीवन असूनहि तें नसल्यासारखेंच वाटते. या बाबतींत एका अमेरिकन स्त्रीनें निवेदिलेला अनुभव विचार करण्यासारखा आहे. ती विवाहित असून ३।४ वर्षें कांही कारणानें तिनें संततिनियमनाचा अवलंब केला. पण तिला जीवनांत स्वारस्य वाटेना, म्हणून आतां तो मार्ग तिनें सोडून "संतान" प्राप्त करून घेतलें आहे व आपल्या

सौख्यास पारावार नाही असें ती म्हणते, ( फिजिकल कल्चर ). तिनें दिलेली ही स्पष्ट कबुली प्रत्येक स्त्री देऊं शकेल. संततीपुढें आर्थिक परिस्थितीचा बाऊ त्यांना कांहींच वाटत नाही.

## ‘ अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ’

इंग्लंडमध्यें व्यभिचाराच्या मनोवृत्तीचें आज करण्यांत आलेलें पृथक्करण हिंदुधर्मशास्त्रकारांनीं यापूर्वींच कित्येक शतकें करून ठेविलें आहे. या रोगाचा फैलाव समाजांत होऊन सामुदायिक आरोग्याला धक्का बसूं नये म्हणून हिंदुधर्मशास्त्रकारांनी नीतिमत्तेचीं अनेक बंधनें स्त्रीपुरुषांवर लादलीं व त्याला योग्य ते अपवादहि पण ठेविले. परस्त्रीगमनास इतकें निषिद्ध ठरविण्यांत आलें कीं, समाज व राजसंस्थांकडून असे अपराधी दंडित केले जात. ‘ अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ’ हा आशिर्वाद नुसता पोकळ नाहीं; त्यांत फार मोठी मार्मिकता साठविली आहे. आठ अपत्यें असणें ही परम भाग्याची गोष्ट आहे असें सांगण्यांत स्त्रियांच्या स्वाभाविक सुखाची व मनोधर्माची पूर्ण कल्पना आपणास आहे हें नमूद करण्यासारखेंच आहे. कमींत कमी आठ अपत्यें हें स्त्रीचें ध्येय आहे व तें पूर्ण होतांच स्त्री आणखी कशाची अपेक्षा करणार ? हा आशीर्वाद तयार करणाऱ्या व्यक्तीला या परिस्थितीची पूर्ण जाणीव होती हें उघड आहे. स्त्रीला जर भरपूर अपत्यें असतील तर तिच्या हातून व्यभिचार घडत नाहीं, एवढेंच काय पण तशी सवलत ज्या देशांत कायदेशीरपणें मिळणें शक्य आहे तेथेंहि संतति असणाऱ्या स्त्रिया या मार्गाला जात नाहींत असें आढळून आलें आहे. संतति असलेल्या पतिपत्नींना विभक्त होण्याचा प्रसंग पुरुषांच्या मागणीमुळें विशेषतः येतो हें आतां आंकडेवारीनें सिद्ध झालें आहे. अपत्यें असलेल्या स्त्रिया सहसा घटस्फोटाच्या नादाला लागत नाहींत; पण तेच अशा परिस्थितींत पुरुष मात्र कांहीं तरी निमित्त काढून सुटका करून घेण्याच्या तयारींत असतात हें पुढील तक्त्यावरून दिसून येणार आहे.

| | १९१० | १९११ | १९१२ | १९१३ | १९१४ |
|---|---|---|---|---|---|
| अपत्यांची संख्या | अनुक्रमें अर्जसंख्या | ... | ... | ... | ... |
| | पति पत्नी | पति पत्नी | पति पत्नी | पति पत्नी | पति पत्नी |
| घटस्फोटांच्या अर्जांची सं. | ४१२ ३४३ | ४६६ ३९३ | ५१४ ४०६ | ५४८ ५५० | ६०७ ४६८ |
| अपत्य नसलेले घटस्फोट | ४१२ | ४०८ | ४४४ | ४९२ | ४९६ |
| एक अपत्यानंतर घटस्फोट | २२२ | २८१ | ३४७ | ३७२ | ३६६ |
| दोन अपत्यानंतर घटस्फोट | १४६ | २०१ | १९३ | १९४ | २४१ |
| ३ ते६ अपत्यानंतर घटस्फोट | ११९ | १७० | १६० | १९२ | २२८ |
| ६ अपत्यांचे पुढे घटस्फोट | ९ | १२ | १० | १२ | १७ |

| | १९१५ | १९१६ | १९१७ | १९१८ | १९१९ |
|---|---|---|---|---|---|
| अपत्यांची संख्या | अनुक्रमें अर्जसंख्या | ... | ... | ... | ४०७६ १००९ |
| | पति पत्नी | पति पत्नी | पति पत्नी | पति पत्नी | पति पत्नी |
| घटस्फोटांच्या अर्जांची सं. | ६८२ ४६१ | ७८१ ३८२ | १०४४ ३७९ | १८०७ ५१६ | ४०७६ १००९ |
| अपत्य नसलेले घटस्फोट | ४९१ | ५६३ | ६६० | १०४३ | २३३८ |
| एक अपत्यानंतर घटस्फोट | ३७९ | ३८२ | ४३३ | ७०७ | १६२७ |
| दोन अपत्यानंतर घटस्फोट | २४८ | २३१ | ३०७ | ४८८ | ९३० |
| ३ते६ अपत्यानंतर घटस्फोट | २३१ | २०० | २८५ | ४२३ | ८३१ |
| ६ अपत्यांचे पुढे घटस्फोट | १७ | १६ | १९ | २७ | ३६ |

१९०९ पूर्वी सहा अपत्यानंतर घटस्फोट अजीबात नाही. १९०० सालीं फक्त १,१९०९ सालीं ३ व १९०८ सालीं फक्त २ याप्रमाणें घटस्फोटांची संख्या आहे.

## संतति नियमन

वर दिलेल्या तक्त्यावरून घटस्फोटाच्या बुडाशीं असलेल्या एका विशेष महत्वाच्या मनोवृत्तीचा उलगडा होण्यास हरकत नाहीं. याच्या जोडीलाच घटस्फोट कमिटीचें अध्यक्ष लॉर्ड साल्हसेन यांचाहि पुरावा विचारांत घेण्याजोगा आहे. त्यांनी आपल्या निवेदनांत असें दाखवून दिलें आहे कीं, स्कॉटलंडमध्यें झालेल्या घटस्फोटांत बहुतेक सर्व घटस्फोट

अपत्यहीन जोडप्यांतच होतें. घटस्फोटाचा मानसिक आणि शारीरशास्त्र-दृष्ट्या विचार करतां एक गोष्ट निश्चितपणें ठरविण्यास हरकत नाहीं कीं, अपत्यजन्मानें स्त्रीपुरुषांतील प्रेमाची वृद्धि होते असें नाहीं, तर अपत्य हें स्त्रियांच्या सुखसाफल्याचें दृश्य फल असल्यानें त्यांना अन्य मार्गानें सुखपूर्ति करण्याची गरजच राहात नाहीं, व स्वाभाविकपणेंच यांच्यांतील विवाहबंधनाना स्थिरता येते. त्याचप्रमाणें एक किंवा दोनच अपत्यांची मर्यादा आपल्या वैवाहिक जीवनाला घालूं पहाणाऱ्या पुरुषांनी वरील तक्त्यावरून योग्य तो बोध घ्यावयास पाहिजे. जर संतति-नियमनासारखीं साधनें वापरून त्यांनीं आपल्या स्त्रियांना फक्त एक किंवा दोनच अपत्यांचीं सवलत दिली तर त्यांच्या स्त्रिया घटस्फोटादि अन्य मार्गाच्या आहारीं जाण्याची भीति असते.

## घटस्फोटाचें धंदेवारीनें प्रमाण दाखविणारा तक्ता

| सन | शेती | खणकाम | कारखाने | खलाशी कोळी | वाहतूक अंतर्गत व्यापार | व्यापार-उद्दीम | फुटकळी चाकरी | पांढरपेशा नोकर वर्ग | अनिश्चित उद्योगधंदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०८ | २६ | १७ | १६८ | १४ | ४२ | ३४५ | १३ | २९८ | ८७ |
| १९०९ | १९ | २१ | १७२ | २५ | २९ | २५३ | १० | २१४ | ११० |
| १९१० | २२ | ११ | ११८ | १८ | ३८ | ३४४ | १२ | २६७ | ७८ |
| १९११ | २१ | ९ | १९४ | २४ | ३० | ३६६ | १२ | ३२० | ९७ |
| १९१२ | २४ | १७ | २११ | ३८ | २१ | ३४७ | २४ | ३७९ | ८७ |
| १९१५ | ३७ | २६ | ३६२ | ३१ | ८४ | ३८१ | ११ | ६६१ | ७९ |
| १९१६ | २८ | २४ | ३१० | ४३ | ६० | ३९७ | २७ | ४४४ | १ |
| १९१७ | ४४ | ४८ | ४१९ | ३३ | ७९ | ४४६ | १८ | ५४५ | ७३ |
| १९१८ | ६१ | ९५ | ७४४ | ६३ | २०४ | ५९१ | ३४ | ८२६ | ७९ |
| १९१९ | १३३ | १९२ | १५८१ | ७८ | ४६८ | ११७४ | ६४ | ११०३ | १६९ |

१९१३–१४ सालचे आंकडे मिळत नाहींत.

इंग्लंडमधील निरनिराळ्या उद्योगधंद्यांत गुंतलेल्या स्त्रीपुरुषांच्या घटस्फोटाचें वर दिलेलें परिणामपत्रक पाहिलें तर त्यांतहि असें दिसून येतें कीं पांढरपेशा वर्गांतच घटस्फोटाचें प्रमाण अधिक आहे. कारण मोलमजुरी करणाऱ्या वर्गापेक्षा या वर्गांतच संतति नियमनासारख्या साधनांचा प्रसार अधिक प्रमाणांत झालेला दिसून येतो आणि त्याचाच दृश्य परिणाम म्हणजे घटस्फोटाचें वाढतें प्रमाण. गरीबी श्रीमंतीपेक्षां, स्त्रिया अपत्यासंबंधींच अधिक जागरूक असतात हेंहि यावरून दिसून येतें.

विवाहित स्त्रियांना अपत्यें नसल्यानें अगर असून तीं कमी असल्यानें जर वरीलसारखे प्रसंग उद्भवतात तर मग प्रौढ कुमारिकांची अवस्था काय होत असेल, व त्यांचें जीवन किती नीरस होत असेल हें कांहीं निराळें सांगण्याचें कारण नाहीं. प्रौढ कुमारिका अनैसर्गिक असा आयुष्यक्रम कंठित असल्यानें स्वाभाविकच त्यांची रुचि व स्वभाव अनैसार्गिक असाच बनत जातो असें नाइलाजानें म्हणावें लागतें. परंतु सत्यसंशोधनार्थ थोडासा कठोरपणा पत्करूनहि या गोष्टीचा विचार शक्य तों खुलासेवार करणें प्राप्त आहे. दिवसेंदिवस वाढणारी प्रौढ कुमारिकांची संख्या ही स्त्रीजीवनांतील मोठी उणीव आहे. या कुमारिकांनीं मुद्रेवर कितीहि हास्य आणून आपली अंतर्गत व्यथा लपविण्याचा प्रयत्न केला तरी ही सर्व लपवाछपवी त्यांना सदैव जाचकच होते. अलीकडे समाजामध्यें किती तरी चांगल्या चांगल्या कुटुंबांतील मुली विवाहाची शक्यता असूनहि भाकड ध्येयवादानें व हटवादीपणानें कुमारिका राहिल्याचें आढळून येतें, परंतु याचा सर्व परिणाम पुढील आयुष्यांत त्या कुमारिकांना व पर्यायानें समाजाला भोगावा लागल्याशिवाय राहात नाहीं. त्यांनीं स्वीकारलेल्या स्त्रीस्वभावविरोधी आयुष्यक्रमामुळें त्यांच्या इंद्रियवासना अतृप्त राहातात आणि या अतृप्तीचा परिणाम त्यांना मानसिक व शारीरिक यातनांचे रूपानें सहन करावा लागतो. आयुष्याच्या

प्रथमावस्थेंत उत्साही व आरोग्यसंपन्न असलेल्या कुमारिकांना तर ही गोष्ट विशेषच जाचक होते. तिनें कोणत्याहि कार्यांत स्वतःला व्यग्र करून घेतलें तरी ज्या एका विशिष्ट सुखाची स्त्रीला अपेक्षा असते, त्या सुखाच्या अभावीं तिला प्रत्येक ठिकाणीं आपली फसवणूक होत आहे असें वाटतें. जीवनप्रवाहाच्या बाहेर ती खेचली गेली असल्याकारणानें पाण्यावांचून तडफडणाऱ्या माशाप्रमाणें तिची अवस्था होते. तिच्यामध्यें एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होऊन तिला निरनिराळ्या संवयी व व्यथा जडतात. कित्येक वेळां या कुमारिकांच्या मनाचा कमकुवतपणा इतका वाढतो कीं, वारंवार घेऱ्या येणें, वेड लागणें, किंवा खुनशी प्रवृत्ति निर्माण होणें येथपर्यंतहि त्यांची मजल जाते असें कित्येक मानसशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे.

## कुमारिकांचा शिक्षणव्यवसाय

अशा कुमारिका बहुतकरून शिक्षणव्यवसायांत पडलेल्या दिसतात. परंतु डॉ. ई. जोन्स यांच्यामतें मानसशास्त्रदृष्ट्या ही एक मोठी चूक आहे. कारण या कुमारिका शिक्षक या नात्यानें लहान लहान मुलांच्या संगतींत येतांच आपला दर्जा व कर्तव्य विसरून, त्या मुलांच्यावर आपल्या प्रेमाचा वर्षाव करतात. त्यांना गोंजारणें, त्यांचीं चुंबनें घेणें येथपर्यंतहि कित्येकींची मजल जाते. अर्थात् हा मोठा दोष आहे अशां-तला भाग नाहीं. परंतु हृदयांतील गोड हुरहुरीचा भलत्याच ठिकाणीं उपयोग करण्यांत आल्यानें मुलांच्या मनावर व शिक्षणावर घातक परिणाम होतो असें त्यांचें म्हणणें आहे. (पेपर्स ऑन सायको-अॅन-लिसिस) इंग्लंडमध्यें सार्वजनिक कार्यांत बऱ्याचशा कुमारिका विशेष कसोशीनें लक्ष घालीत असल्याचें दिसून आलें आहे. अनाथालयें, दवाखानें अशा संस्थांमधून कुमारिकांची नेहमींच गर्दी दिसून येते. प्रौढ कुमारिकांनी सार्वजनिक कार्यांत घातलेलें हें लक्ष कोणीहि स्तुत्य म्हणोत; मानसशास्त्रज्ञ याच्या बुडाशीं तिसरेंच पाहतात. योग्य मार्गानें आकांक्षा

तृप्त न झाल्यानें आपल्या या सर्व भावनांना कांहीं तरी वाट फोडून द्यावयास पाहिजे म्हणून त्या अशा कांहीं तरी उसाबरींत विशेष उत्साहानें भाग घेत असतात. निदान तसा आव तरी त्या आणीत असतात.

सार्वजनिक कार्यांत दिसून येणारी ही कुमारिकांची गर्दी दिवसेंदिवस वाढूं लागल्यानें हा एक समाजावरील मोठा कलंकच आहे, म्हणून सरकारनें इतर सर्व गोष्टींबरोबरच या कुमारिकांच्यावरहि लक्ष ठेवून त्यांची योग्य कालांत लग्नें करून देण्याची खटपट करावी अशी विचारसरणी पुढें येत आहे व कित्येक राष्ट्रें तिचा अवलंबहि करीत आहेत. मातापित्यांनी मुलीला कोणत्या शाळेंत अगर कॉलेजांत घालावयाचें याचा प्रथम विचार करावयाचा नसून मुलीला कोणत्या घरांत घालावें याचा विचार करावयाचा आहे. शिक्षण, उद्योगधंदे, टंकलेखन, कायदेकानू इत्यादि कार्यक्षेत्रांत वावरणाऱ्या कुमारिकांना ती कार्यक्षेत्रें कायद्यानें बंद करावींत व त्यांचीं लग्ने शक्य तों लवकर करून देण्यांत यावींत अशी विचारसरणी कित्येक पाश्चात्य राष्ट्रांत प्रकट केली जात आहे व कांहीं दरवाजे स्त्रियांना बंदहि पण करण्यांत येत आहेत. हिंदुस्थानांत या गोष्टी अद्याप या थराला आलेल्या नाहींत. परंतु पाश्चात्यांच्या अंधानुकरणानें ही वेळ आणखी दहापांच वर्षांत येणें अगदीं शक्य आहे. म्हणूनच पाश्चात्यांच्याप्रमाणें पुढें जाऊन मागें येण्याचा प्रयत्न करीत बसण्यापेक्षां त्यांच्या उदाहरणानें आज या घटकेलाच सावध होणें अधिक श्रेयस्कर नाहीं काय?

## ६. स्त्री गुण–दोष चर्चा.

### स्त्रियांचे दुर्गुण

स्त्रियांच्या संबंधानें कठोर विधानें करण्यांत हिंदुस्थानानें फक्त एकट्यानेच पुढाकार घेतला आहे असें नाही. प्रचारांत असलेल्या म्हणी, दंतकथा, आणि पुराणांतरीं आढळून येणारे दाखले यांचा विचार केला तर, कोणत्याहि देशांतील मर्मज्ञ लेखक स्त्रियांच्या बाबतींत एकाच प्रकारचीं विधानें करतांना आढळून येतात. अविश्वासूपणा, अप्रामाणिकपणा, वृथा डौल, अज्ञान इत्यादि सर्व दोषांचें माहेरघर म्हणूनच बहुतेक लोक स्त्रियांचा उल्लेख करतांना आढळून येतात. भूतेंखेतें, चेटकें इत्यादि निंद्य प्रकारांशीं स्त्रियांचा संबंध फार प्राचीन कालापासूनहि प्रत्येक देशांत स्त्रियांशीं जितका जोडण्यांत येतो तितका तो पुरुषांशीं येत नाहीं पँडोरा. आणि ईव्ह या स्त्री जातीच्या आद्य प्रतीकांनी पृथ्वीवर पाप व आपत्ति यांचा घाला आणला. पृथ्वीवर अनंत यातनांचा प्रसार होण्यास त्यांची कृति कारणीभूत झाली. स्त्रिया आणि दुष्ट कृति यांचा संबंध जो प्रत्येक देशांत एकमेकांशीं परिचय नसलेल्या कालापासूनहि जोडण्यांत आला, तो कांही निव्वळ योगायोग म्हणून खास नव्हे. मनूनें स्त्रियांच्यावर केलेले आरोप व स्त्रीस्वातंत्र्यावर आणलेली गदा, यांचाच जवळ जवळ अनुवाद सर्वच देशांतील तत्त्वज्ञान्यांनीं करावा यांत योगायोगापेक्षा स्त्रियांच्या अंगीं अगदीं ठळकपणानें दिसून येणारे सर्वसाधारण दोषच अधिक कारणीभूत आहेत.

"लोंब्यरसो" आणि "फरो" या दोन तत्त्वज्ञान्यांनीं तर स्त्रिया म्हणजे मूर्तिमंत फसवेगिरीच असे उद्‌गार काढले. फसवेगिरी तर त्यांच्या हाडींमासींच खिळलेली आहे असें तो म्हणतो. आणि गेल्या महायुद्धानें याचें चांगलेंच प्रत्यंतर आणून दिलें आहे. हेर खात्यांत राहून बायकांनी

केलेली शिपाईगड्यांना फसविण्याची कामगिरी जग कधीच विसरणार नाहीं. कित्येक मानसशास्त्रज्ञ स्त्रियांच्या पिढयानुपिढयांचें संशोधन करून “अनृतं, साहसं, माया” हे दोष त्यांच्यावर लादतात. शेक्सपियरनें “स्त्रिया म्हणजे मूर्तिमंत मत्सर!” असे उद्गार काढले आहेत. स्त्रियांच्यावर आजपर्यंत करण्यांत आलेले आरोप, या सुधारलेल्या काळांत (?) जरा मागें पडले आहेत. या लोकसत्तेच्या युगांत स्त्रियांना एकप्रकारें मानाचें (?) असें स्थान प्राप्त करून देण्याची खटपट उदारमतवादी पुरुष करीत आहेत. आजपर्यंत स्त्रियांच्यावर करण्यांत आलेले आरोप हे निष्कारण आहेत, त्यांच्या ठिकाणीं कांहीं दोष नसून त्या गुणसंपन्न देवता आहेत. अशी उदार विचारसरणी आज पुढें येत आहे, आज स्त्रीपुरुषांच्या मतानें उच्च म्हणून समजले जाणारे आजचे स्त्रीचे समाजांतील स्थान तिला प्राप्त करून देण्याचा प्रथम प्रयत्न, जॉन स्टुअर्ट मिल या पंडितानें केला. मिल आपल्या ‘स्त्रियांची गुलामगिरी’ या पुस्तकांत म्हणतो कीं, पुरुषांच्यावर अवलंबून असणाऱ्या स्त्रियांच्या ठिकाणीं त्यांच्या निसर्गसिद्ध गुणांचा नाश होऊन पुरुषांनी त्यांच्यावर लादलेल्या गुलामगिरीमुळें त्यांच्या ठिकाणीं अनेक दुर्गुणांचा प्रादुर्भाव झाला. मिलच्या या म्हणण्याचा उद्देश असा आहे कीं, मुळची स्त्री निसर्गतः सुस्वभावी व सद्गुणी असून अलीकडे तिच्या ठिकाणीं दिसून येणारे दुर्गुण हे तिच्यावर पुरुषांनी लादलेल्या गुलामगिरीचा परिणाम म्हणून आहेत, म्हणजे स्त्रियांच्या ठिकाणीं वर उल्लेखिलेले दुर्गुण आहेत हीं गोष्ट मिलहि कबूल करतो. वादाचा प्रश्न फक्त त्यांच्या कारणपरंपरेत आहे. परंतु या ठिकाणीं मिलला असेंहि विचारतां येईल कीं, पिढ्यानुपिढ्या स्त्रिया पुरुषांच्या दास्यांत तरी कां राहिल्या? हे दास्य आहे किंवा नाहीं हा प्रश्न निराळा. पण आहे असें गृहीत धरल्यास या दास्यत्वाला असें चिरस्थायी स्वरूप कां प्राप्त झालें?

## स्त्रियांची गुलामगिरी

आज स्त्रियांनाहि थोडीफार दिसणारी स्वतंत्रता ही, त्यांच्या कर्तबगारीचें फळ म्हणून नसून त्यांतहि पुरुषांचीच खटपट आहे हें कोणाहि स्त्रीला नाकबूल करतां येणार नाही. स्त्रियांची दुर्बलताच याला कारण नाहीं कां ? मिलच्या विधानाला दुसराहि एक असा प्रश्न विचारतां येईल कीं, मूळची निसर्गसिद्ध स्त्री कशी होती ? कोठें होती ? कोणत्या कालमर्यादेंत होती ? व पुरुषांच्या जुलमी हातांकडून तिच्या सद्‌गुणांचा केव्हां नाश केला गेला ? यासंबंधीं कांहीं निश्चित पुरावा पुढें आणतां येईल काय ? कोणत्या शास्त्रशुद्ध संशोधन पद्धतीवर स्त्रीहितवाद्यांनीं या गुणवती स्त्रियांची माहिती गोळा केली ? आम्हाला स्त्री आज ज्या स्वरूपांत दृष्टीला पडते, त्याच स्वरूपांत ती ऐतिहासिक कालांत, इतिहासपूर्वकालांत पौराणिककालांतहि पण दिसते. मग एकट्या मिलनें व त्यांच्या अनुयायांनी या आदर्श महिला कोणत्या काळांतून पैदा केल्या ? कां हें निव्वळ त्यांच्या कल्पनादेवीचेंच अपत्य आहे ? वस्तुस्थिति अशीं आहे कीं, स्त्रियांना त्यांच्या आजपर्यंतच्या इतिहासांत एकच कार्यक्षेत्र प्रामुख्यानें वाट्याला आलें आणि तें म्हणजे मातृत्व ! आणि त्यामुळें घरच्या मर्यादित क्षेत्रांत वावरणें त्यांच्या उत्क्रांतीच्या आड आलें असें म्हणतां येत नाहीं. निसर्गानें मर्यादित केलेल्या आयुष्यक्रमांतच प्राणी उत्क्रांत अगर अपक्रांत होत असतात, परंतु उत्क्रांति अगर अपक्रांति यांचें निश्चित मोजमाप आज तरी कोठें ठरलें आहे ? आज चाललेल्या आधिभौतिक घडामोडी व स्त्रीजीवन यांचा काडीमात्र संबंध नाहीं. यामुळें या उत्क्रांतीचें मोजमाप स्त्रीजीवनाला लावून उपयोग नाहीं. स्त्रियांचें वरील मातृत्व जोंपर्यंत नष्ट होऊ शकत नाहीं, तोंपर्यंत त्यांना पत्करावें लागणारें मर्यादित कार्यक्षेत्र हा त्यांच्यावर जुल्म आहे, पुरुषांकडून त्यांच्यावर लादली गेलेली ही गुलामगिरी आहे हें म्हणण्यांत फारसें तात्पर्य नाही.

## पुरुषांचा दोष नाहीं.

मिल आणि त्याचे अनुयायी यांना आजपर्यंतच्या मानवी जीवनाच्या इतिहासांत पुरुषांकडून स्त्रियांवर लादलीं गेलेलीं बंधनें दिसतात, बौद्धिक कार्यक्षेत्र, सामाजिक जबाबदाऱ्या यांपासून पुरुषांनी स्त्रियांना नेहमींच वंचित केलेलें दिसतें; परंतु या विधानांत फारशी सत्यता नाहीं. हिंदुस्थानच्या बाबतींत ही गोष्ट थोडीफार खरी मानली, तरी तो दोष कोणाकडेच नाहीं, कारण निसर्गाने आखून दिलेल्या कार्यक्षेत्राप्रमाणेच प्रथम कार्याला सुरुवात होते व मग रूढींनी त्याच्या मर्यादा कायमच्या निश्चित केल्या जातात. पण ज्या देशांत वरीलप्रमाणे निर्बंध नाहींत व नव्हते अशा फ्रान्स आणि इंग्लंड या दोन देशांतील स्त्रियांनीं तरी मातृत्वापलीकडे आपल्या जीवनाचा असा कोणता विशेष विकास करून दाखविला आहे? कोणताच नाहीं. मातृपदाची इच्छा व तृप्ति यापलीकडे स्त्री फारशी ढवळाढवळ करूं शकत नाहीं. एलिझाबेथच्या कारकीर्दींत व तत्पूर्वीहि स्त्रियांच्या कार्यक्षेत्रासंबंधीं कांहीं निर्बंध तेथें होते असा भाग नाहीं. आणि इतके असूनहि त्यांच्या हितवाद्यांनी त्यांच्यावर लादलेल्या काल्पनीक गुणांचा काडीमात्र विचार न करता फिरून 'ये रे माझ्या मागल्या' या म्हणीप्रमाणें स्त्रिया आपल्या स्वभावधर्मानुसार स्वतःस पोषक अशी गुलामगिरी पत्करण्यांतच धन्यता मानतात. आजच्या युरोपियन स्त्रीला पूर्ण स्वातंत्र्य असूनहि इतिहासांत नमूद करण्याजोगी कामगिरी तिच्या हातून घडलेली दिसत नाहीं. त्यांच्या प्राचीन भगिनीपेक्षा त्यांनी कांहीं विशेष कर्तबगारी करून आपलें नांव अजरामर केलें आहे अशांतलाही प्रकार नाही. स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रियांचे हक्क असल्या भ्रामक, पोकळ बडबडीपेक्षां त्यांना कांहीच साधतां आलें नाही. एखादी शिकलेली किंवा थोडी धडपड करणारी स्त्री बाकीच्या ठराविक चाकोरींतून जाणाऱ्या बहुजन स्त्रीसमाजाकडून ग्रासली गेली, पाण्यावरील बुडबुड्यानें ज्याप्रमाणे आपलें स्वतंत्र अस्तित्व पटविण्याचा प्रयत्न करावा, पण शेवटीं

पाण्याशींच एकरूप व्हावें त्याप्रमाणेंच हा प्रकार आहे आणि यामुळेंच आज पाश्चात्यच काय पण कोणताच स्त्रीसमाज पूर्वीच्या स्त्रीसमाजाहून कांही विशेष करून दाखवीत आहे असें म्हणतां येत नाही. पुरुषांनी स्त्रीला मातृत्व प्राप्त करून दिलें येथेंच त्यांचीं जबाबदारी संपली. परन्तु या मातेला आणि आपल्याला योग्य संरक्षण देण्याची जबाबदारी नीतिनियमांनीं त्यांच्यावर लादली गेली व ती त्यांनी पाळली. यांत कोणतें क्रौर्य त्यांनी दाखविलें? स्त्रियांना आवश्य अशीच ही गोष्ट आहे. स्त्रीला गृहांत योग्य तें संरक्षण देऊन तिच्या व तिच्या अपत्यांच्या जीवन-विकासाची आणि सौख्याची सर्व सोय करून देणारा पुरुष म्हणजे स्त्रीला गुलाम करणारा नरराक्षस हें केंव्हाहि सयुक्तिक दिसणार नाही.

## स्त्रियांची कर्तबगारी

स्त्री आणि पुरुष यांच्या कर्तबगारींतहि अंतर निसर्गानें ठेविलें आहे. यामुळें विविध कार्यक्षेत्रांत दिसून येणारी पुरुषांची प्रगति स्त्रीला कधींच आत्मसात करतां येणार नाहीं. आजपर्यंत स्त्रियांचीं म्हणून समजलीं जाणारीं कित्येक खातीं जगाच्या आरंभापासून स्त्रियांच्या हातीं आहेत. सर्व कालांत व सर्व देशांत स्त्रियांचें जें विशिष्ट कार्यक्षेत्र ठरविण्यांत आलें आहे. त्या कार्यक्षेत्रांत निदान पुरुषांना आव्हान देण्याइतकी प्रगति त्यांनीं करून दाखवावयास हवी होती, परंतु तेंसुद्धां त्यांना शक्य झालें नाहीं. स्वयंपाक, शिवणटिपण, शिशुसंगोपन हे खास स्त्रीविभाग आज कित्येक दिवस स्त्रियांच्या हातीं असून, शास्त्रशुद्ध पायावर त्यांची प्रगति करण्याचें कार्य त्यांच्या हातून झालें नाहीं. तें पुरुषांनाच करावें लागलें. स्वयंपाकाची शास्त्रशुद्धता त्यांतील पदार्थांचे गुणदोष यासंबंधींचीं सर्व अनुमानें पुरुषांचेकडून करण्यांत येतात. पाश्चात्य राष्ट्रांत आहार व स्वयंपाक या शास्त्रांत तज्ज्ञ असणारे सारे पुरुषच असून त्यांजकडून संशोधनानुरूप सर्व गोष्टी चालतात. जगाच्या आरंभापासून अपत्यास जन्म देण्याची कामगिरी स्त्रियाच करीत आहेत. परंतु आपल्या इतक्या

दिवसांच्या अनुभवावरून ती अपत्यसंगोपनाचें एखादें शास्त्र तयार करूं शकली नाहीं. तर त्यांतहि पुरुषांनींच ढवळाढवळ केली.

पाश्चात्य राष्ट्रांत कित्येक दिवस शिवणटिपणाचा मक्ता स्त्रियांकडे असून तेथें रोज निघणारी स्त्रीची अगर पुरुषाची प्रत्येक फॅशन हुडकून काढणारे सर्व पुरुषच! आज मिल हयात नाहीं, परंतु तो जर असता तर त्याला कोणतेही निर्बंध नसणारी स्त्री, प्रत्येक बाबींत पुरुषांच्या आहारीं जात असलेली पाहून आपल्या विधानांची असत्यता तात्काळ कळून चुकली असती. स्वयंपाकाचें खातें हातीं असून प्रसंगाला इकडे आचारी तिकडे बबर्जी! तीच गोष्ट कपड्यालत्त्यांची. फॅशनचें वेड पसरवून पैसे लुटणारे सर्व पुरुष! शिशुसंगोपन, बाळंतपण या संबंधींचें अद्ययावत ज्ञान पाहिजे असेल, सल्ला अगर शिक्षण घ्यावयाचें असेल तर पुरुष! ही स्थिति कां असावी? याचें कारण एकच कीं, स्त्रियांच्या बुद्धीचा प्रभाव विशिष्ट मर्यादेपलीकडे जाऊच शकत नाहीं. आद्य स्त्रीपासून तो आजतागायत स्त्रियांच्या बुद्धीची उंची एका विशिष्ट पातळींतच राहिली आहे, हा दोष पुरुषांचा नाहीं अगर स्त्रीचाहि पण नाहीं. कार्लाइलच्या 'फ्रेंच क्रांती'च्या हस्तलिखिताला अग्न्यर्पण करणारी दासी आणि तुकारामाला 'काय खरतुड्या' म्हणणारी त्याची पत्नी या कांहीं अपवादात्मक नाहींत अशी हमी आजच्या कित्येक कवींच्या व हळव्या लेखकांच्याकडून देण्यांत येईल; स्त्रियांची महत्वमापनाची दृष्टि अगदीं भिन्न आहे. पुरुष स्वभाव हा गतिप्रधान व स्थित्यंतरप्रवण आहे तर स्त्रीस्वभाव स्थिर आहे. स्त्रियांचें जीवन हें घड्याळाप्रमाणें ठरीव साच्यानें चालणारे आहे, कारण त्यांच्या जीवनाला चैतन्य देणारी शक्ति सदैव एकाच नमुन्याची आहे, आणि यामुळें सर्व ठिकाणीं स्त्री स्वभावांत व कर्तव्यांत एकवाक्यता दिसून येते. स्त्रियांना कार्यप्रवण करणारी ही शक्ति म्हणजेच जीवसृष्टीचा आपल्या ठिकाणीं उद्भव करून घेण्याची तीव्र वासना होय.

## मूर्तिमंत निसर्ग

मूर्तिमंत निसर्ग स्त्रियांच्या रूपानें कार्य करीत असल्यानें, निसर्गाप्रमाणेंच स्त्रियाहि एकमार्गी राहतात. स्त्रियांचे गुणधर्म म्हणजेच निसर्गाचे गुणधर्म होत. आणि म्हणूनच स्त्रियांच्या ठिकाणीं अगदीं खोल खोल रुजलेले स्वभावधर्म परिस्थितीच्या दडपणानें उसळून येताच आपण त्यांना अनीतिमान ठरवितों. कारण नीति म्हणजे निसर्गाचे नियमन करण्यासाठीं मनुष्यानें निर्माण केलेले अतएव अनैसर्गिक (कांहींसे) बंध होत. आणि स्त्रीहि मूर्तिमंत निसर्ग असल्यानें तिच्या कृति या अनैसर्गिक कसोटीवर अनीतिमान ठरल्या तर त्यांत आश्चर्य नाहीं. जीवनाच्या आत्यंतिक गरजांची सोय करून घेऊन जीवनज्योत कायम प्रज्वलित ठेवणें एवढें एकच कार्य स्त्रिया जाणतात, आणि निसर्गहि पण तेवढेंच जाणतो. आणि यामुळें आपण ठरविलेल्या नीतिनियमांशीं स्त्रिया आपल्या कृतीनें फार मोठा विरोध दाखवितांना दृष्टीला पडतात. परंतु स्त्रियांकडून आपल्या नैतिक कल्पनांचा केला जाणारा हा अपमान दोषास्पद नसून, स्त्रियांनीं कशासहि न जुमानतां त्यांना प्रेरित करणाऱ्या निसर्गशक्तीला विरोधण्याचें पातक त्यांनीं केलें नाहीं हाच त्याचा अर्थ! योग्य कालांत स्त्रीला तिच्या आकांक्षाप्रमाणें योग्य तें सुख व कार्य मिळण्याची सोय समाजरचनेंत होतांच स्त्रिया सुसूत्रपणें कार्य करीत असतात व त्यांच्याकडून विघटनेचें कोणतेंच कार्य होत नाहीं.

जीवनविकास व द्विगुणीकरण यांच्या आड येणारीं कोणतींही बंधनें स्त्रियांना जाचक झाल्याशिवाय राहात नाहींत. तिच्यावरील मूलस्वभावाशीं विसंगत अशी कोणतीही जबाबदारी पत्करून तीं पार पाडण्याचा आटोकाट प्रयत्न स्त्रिया करतील पण एक नियम या साऱ्या खटाटोपांचा चक्काचूर उडवून तिचें जीवन तिला आपल्या हाकेकडे कान देण्यास भाग पाडील. वरील द्वयीशीं एकरूप होण्यासाठीं तिला धांव घेणें भाग पडेल. जीवनशक्तीच्या आहारीं गेलेल्या या स्त्रीला आपण बंडखोर ठरवूं,

अनीतिमान ठरवूं; पण तिची खरी अनीति, तिची खरी बंडखोरी, जीवनाशीं तिनें विरोध करून इतर कार्यक्षेत्रांत मग्न होण्याचा जो प्रयत्न केला ती होय. या अनीतीला आधीं आळा घालण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

स्त्रियांना विश्वासघातकी, खोट्या इत्यादि अनेक विशेषणें प्रत्येक देशांत बहाल करण्यांत येतात. परंतु हीं विशेषणें त्यांचे दुर्गुण दर्शवीत नसून गुणच दर्शवितात. युद्धावर देशासाठी बलिदान करावयास गेलेल्या शिपायाची तरुण पत्नी त्याच्याशीं बेइमान होऊन व्याभिचार करण्यास प्रवृत्त झाली, तर आपण तिच्यावर अनीतीचा आरोप करण्यास उद्युक्त होतो, परंतु असें करीत असतांना पतीपेक्षां स्त्रिया निसर्गशक्तीशींच अधिक इमानी राहूं शकतात, हे आपण विसरतो. त्यांची उत्पादक इंद्रियें निष्क्रियतेमुळें ज्यावेळीं बंडाळी करून उठतात, त्यावेळीं त्यांना शरण गेल्याखेरीज स्त्रियांना गत्यंतर उरत नाही, तरुण उमदा पति मिळावा म्हणून वय चोरून खोटे सांगणाऱ्या इंग्लडातील कुमारिका, मानसिक दौर्बल्यामुळे खोटे बोलतात असें नाहीं; तर त्यांचें अपरोक्ष मन त्यांना तसें सांगण्यास उद्युक्त करीत असतें. कारण जास्तींत जास्त विषयसुख व त्यामुळे घडणारा अपत्यलाभ इकडे त्यांची दृष्टि विशेष असते. स्त्रियांना दोष देताना त्यांच्या खऱ्या मनःस्थितीचा जरूर विचार व्हावयास पाहिज. स्त्रियांचा बेइमानीपणा हा त्यांचा दुर्गुण नसून मानवांचें अस्तित्व सृष्टीवर कायम राखण्यास कारणीभूत झालेला एक सद्गुण आहे. प्राणिसृष्टींतसुद्धा या एकाच गोष्टीमुळे निरनिराळ्या प्राण्यांची संख्या आज तागायत सृष्टीवर स्थिर राहिलेली दिसते. स्त्रियांना प्रामाणिक आणि खऱ्या बनविण्याचा प्रत्येक प्रयत्न म्हणजे महत्वाच्या अशा या त्यांच्या मूलभूत स्वभावावर आघातच होय.

## स्त्रिया व संततिनियमन

स्त्रियांची स्वतःच्या ठिकाणीं उत्पति करून घेण्याची इच्छा, ही सव जीवनसृष्टींत सारख्याच प्रमाणांत आत्यंतिक असते. या बाबतींत स्त्रीजात

ही इतकी उत्सुक असते कीं, मानवनिर्मित नीतीनिर्बंधाचें उल्लंघन सहजासहजीं करून टाकण्यास त्यांना कांहींच दिक्कत वाटत नाहीं. आपल्या जीविताचें उद्दिष्ट साध्य करून घेण्यास त्या आत्यंतिक धडपड करीत राहातात. वरील एका गोष्टीची जर यथासांग पूर्ति होईल तरच आयुष्यांतील इतर बाबींना स्त्रिया जबाबदार राहू शकतात. नाहीं तर त्यांच्या बेजबाबदारीला मर्यादा घालणें अगर राहणें कठीण असतें. ही योग्य व प्रतिष्ठित मार्गानें साध्य न झाल्यास निसर्ग त्यांना कोणताहि अन्य मार्ग स्वीकारण्याची प्रेरणा दिल्याशिवाय राहात नाहीं. आणि त्यामुळें त्यांच्या हातून स्वैराचार घडतो. जीवसृष्टि निर्माण करणें व ती सतत कायम राखणें हें निसर्गाचें कार्य असल्यानें, अशा तऱ्हेच्या इच्छा प्राण्यांच्या ठिकाणीं फार तीव्र स्वरूपांत निर्माण केल्या गेल्या आहेत, निसर्ग प्रेरणेनें निर्माण होणाऱ्या संततीच्या उदरंभरणाची कितपत सोय आहे, हें पाहून प्राण्यांच्या ठिकाणीं त्या प्रमाणांत आसक्ति निर्माण करणें हें निसर्गाला माहीत नाहीं. पिकांची नासाडी होऊन गुरें, माणसें मरतील म्हणून टोळांची मादी योग्य तीं अंडीं घालण्याचे कमी करणार नाहीं. अगर आवर्षणाचें साल आहे म्हणून गाई म्हशी मेंढ्या कुत्री संतती-नियमन करणार नाहींत. समुद्रांत राहावयास जागा मिळणार नाहीं म्हणून मत्स्यारी जलचर आपल्या संततीवर बुद्धयाच कोणतेंहि नियंत्रण घालू शकणार नाहींत. कारण निसर्गाची तशी योजना नाहीं. मानव प्राण्यांत सुद्धां निसर्गशक्ति याच स्वरूपांत कार्य करींत असते. आणि निसर्गाच्या या शक्तीमुळेंच मानवस्त्रीतहि इतर प्राणिसृष्टींतील सर्व स्त्रियांचे गुणदोष दृष्टीला पडतात. आज सृष्टीवर जीवसृष्टि शाबूत राहण्यास स्त्रियांचे खालील मुख्य गुण विशेषेंकरून कारणीभूत झाले आहेत.

## स्त्रियांवरील आरोप

१. निसर्गाच्या हाकेला कोणत्याहि निर्बंधास विशेष न जुमानतां ओ देण्याची तत्परता, २. जीवनांत, त्यांच्या संवर्धनांत व विकासांत त्यांना

वाटणारा अवीट आनंद ३. आपल्या संबंधानें दिसून येणारे आत्यंतिक प्रेम व त्याच्या संरक्षणार्थ कोणताहि स्वार्थत्याग करावयास लागणारी धडाडी, यांच्या जोरावर स्त्रियांनीं अत्यंत उच्च असें एक स्थान स्वतःला प्राप्त करून घेतलें आहे. जीवसंरक्षणार्थ त्यांनीं केलेल्या खटपटी-लटपटी त्यांचे दोष दाखवीत नाहींत तर उलट गुणच दाखवितात. हक्सले म्हणाले, " Women's virtue was man's most poetic fiction." ) म्हणजे स्त्रियांच्या ठिकाणीं सद्गुणांची कल्पना करणें हें निव्वळ काव्यमयच आहे. असें म्हणण्यात हक्सलेचा उद्देश स्पष्ट दिसत आहे. परंतु स्त्रियांचे ठिकाणीं असणारे दोष हे पुरुषी दृष्टीनें दोष असले तरी स्त्रियांचे दृष्टीनें ते आवश्यक असे सद्‌गुणच आहेत, हें सूक्ष्म परीक्षणाअंतीं दिसून येणार आहे. स्त्रियांचे ठळक असे दोष पुढीलप्रमाणें सांगण्यांत येतात. १. सच्चेपणाचा अभाव, २. क्षुद्रवासना, ३. क्षुद्र अधिकाराची हाव, पोकळ डौल, ४. गलिच्छ वस्तूबद्दलहि प्रेम. या दुर्गुणांचा आरोप स्त्रियांचेवर सर्वकाळीं सर्व देशांत करण्यांत आलेला आहे; म्हणून यांचा थोडा अधिक विचार करण्यास हरकत नाहीं,

स्त्रियांचे ठिकाणीं दिसून येणाऱ्या सच्चेपणाच्या अभावामुळें पतीच्या माघारी निसर्गप्रेरणेनें परपुरुषाची अपेक्षा करणारी स्त्री बेइमान, कां तिच्याशीं संबंध ठेवणारा पुरुष अधिक बेइमान याचा विचार सूज्ञांनीं करावा. स्त्रियांना गलिच्छ वस्तूबद्दलहि प्रेम असतें, अगर असतांना दिसतें. किंवा त्यांना योग्य निवड करतां येत नाहीं. असाहि दोष त्यांना देण्यांत येतो. मनुष्याचा अधःपात व दुष्कृतीचा फैलाव पृथ्वीवर करण्यास स्त्रिया कारणीभूत झाल्या; हा त्यांच्यावर करण्यांत आलेला आरोप बहुतेक सर्व देशांच्या पुराणांत आढळतो; स्त्रियांनीं फक्त चांगल्यावर प्रेम करण्याची वृत्ति ठेवली असती तर, जग चाललें नसतें. कारण स्वतःचें अपत्य कितीहि वाईट स्थितींत असेना अगर कितीहि कुरूप असेना त्यांच्यावरील अनन्य प्रेम स्त्रियांवरील एका दोषामुळें अगर गुणामुळेंच करूं

शकतात. सुंदर तेवढेच पूज्य अशी भावना स्त्रियांनीं ठेविली असती तर जगावर अनवस्था प्रसंग ओढवला असता. क्षुद्र कां होईना पण अधिकार गाजविण्याची वृत्ति ही सुद्धां आवश्यक अशीच आहे. या वृत्तीमुळें स्त्रिया आपल्या धडधाकट अपत्यापेक्षां दीनवाण्या अपत्याकडे अधिक लक्ष देतात. स्त्रियांनी पाळलेल्या पशूंत सुद्धां त्यांची हीच वृत्ति दिसून येते. त्या कुत्र्यापेक्षां मांजर अधिक पसंत करतात व कुत्रा बाळगलाच तर एकादा वाघ्या शोभणारा न बाळगतां पायांत गोंडा घोळीत हिंडणारें कुत्रें बाळगात.

## स्त्रियांना पुरुषाची किंमत

अधिकार चालविण्याची इच्छा जास्तींत जास्त जेथें सफल होईल अशाच गोष्टीकडे अधिक लक्ष देण्याची त्यांची इच्छा असल्यानें घरातील दुबळ्या माणसाला संरक्षण मिळतें. स्त्रियांच्या ठिकाणीं दिसून येणारी पोकळ डौल व मोठेपणाची हांव यांच्या बुडाशींहि एक विशिष्ट मानसशास्त्र आहे. स्त्रियांच्या विनयाबरोबरच या गोष्टीहि त्यांच्या ठिकाणीं असतात. आपल्या पतीच्या किताबाबरोबरच आपला इतमाम वाढावा, यासंबंधीं त्या उत्सुक असतात. डामडौल करण्याच्या त्यांच्या हौशीमुळें त्या आपल्या जोडीदार पतीला एक प्रकारें उत्तेजित करीत असतात. पतीची कार्यक्षमता वाढून तो अधिक सुखसाधनें कशीं निर्माण करील व आपल्या संततीला योग्य संरक्षण कसें देईल इतका सारासारविचार या भावनेचे बुडाशीं असतोच असें जरी निश्चितपणें म्हणतां आलें नाहीं, तरी पण या वृत्तीमुळें स्वाभाविकच पतीला कार्यप्रवण करण्याचें कार्य पडतें व त्याचा योग्य तो परिणामहि पण होतो. पुरुषांचेकडून स्त्रीला मिळणाऱ्या सुखासमाधानावर स्त्रिया पुरुषांची किंमत करीत असतात. आणि त्यामुळें समाजांत मान्यता पावलेला परंतु स्वस्त्रीकडे दुर्लक्ष करणारा पुरुष त्यांच्या दृष्टीनें नालायक ठरतो, तेंच समाजांत कंटक म्हणून

वावरणारा पण स्वस्त्रीच्या सुखांत किंचितहि कमी पडूं न देणारा असा पुरुष स्त्रियांना अधिक मौल्यवान वाटतो. हा वृत्तीचा हीनपणा नाहीं तर यांतहि एक प्रकारचें वैशिष्टय आहे.

## पाश्चिमात्य कुमारिका

नेपोलियन संबंधानें मादाम दसतेलने काढलेले उद्गार या दृष्टीने नेपोलियनची योग्यता ठरविण्यास निरुपयोगी आहेत. कारण नेपोलियनची किंमत त्यानें स्त्रियांशीं केलेल्या वर्तनावरूनच फक्त ठरविण्याचा या स्त्रीनें प्रयत्न केला आहे व ते तिच्या वृत्तीनुसारच आहे, ( A nation given over to the worship of women has not even the energy which would enable it to grasp that there are patriots in the world. " Napoleon ) स्त्रियांच्या ठिकाणीं पुरुषांच्या गुणावगुणांचा विचार करीत न बसण्याचा जो एक अविवेक आहे तो केव्हाहि दोषार्ह म्हणता येणार नाहीं, फुलपांखरांची मादी अगर मधमाशांची राणी ज्याप्रमाणें आपलीं अंडी घालतांना त्या अंडयांतून बाहेर पडणाऱ्या भावी कीटकांना भरपूर अन्न मिळेल व स्वतःच्या पायावर उभे रहाण्याची ताकद येईपर्यंत त्यांना अन्नाची ददात पडणार नाही अशाच ठिकाणीं घालण्याची खबरदारी घेतात, त्याचप्रमाणें स्त्रियाहि भावी अपत्याच्या जबाबदारीच्या दृष्टीनें गुणापेक्षां सुरक्षिततेलाच अधिक महत्व देतात व असें आज कित्येक दिवस चालत आल्यानें तो त्यांचा जन्मस्वभाव होऊन बसला आहे. वराची निवड करतांना त्यांचा सांपत्तिक दर्जा विचारांत घेणारे लोक आजच्या नवमतवाद्यांच्या दृष्टीनें कदाचित मूर्खांत निघत असतील परंतु ज्या ठिकाणीं पतीची निवड करण्याचा हक्क कुमारिकांना प्राप्त झाला आहे, अशा देशांत कलावंतांच्या कलेवर किंवा शास्त्रज्ञांच्या बुद्धिमत्तेवर भाळून त्यांच्याशी विवाहबद्ध होण्यापेक्षां कुमारिका संपत्तीचाच अधिक विचार करून, एखाद्या लक्ष्मीपुत्रालाच माळ घालण्यांत धन्यता मानतात, असें आढळून आलें आहे. फार काय असे लक्ष्मीपुत्र आपल्या

जाळ्यांत सापडावे म्हणून पाश्चात्य कुमारिका नाना खटपटी आणि लटपटी करण्यांत गुंग असतात.

## स्त्री ही धोंड आहे

योग्य कालांत त्यांना हें साध्य झालें नाहीं व निसर्गाला विरोधण्याचें सामर्थ्य संपूष्टांत येऊं लागलें कीं, मग त्या बटलरच्याहि आहारी जातील. पण स्त्रियांचा जन्मजात स्वभाव हा असा आहे व तो प्राणिसृष्टीतील सर्वत्र स्त्रियांचा आहे. आपल्या ठिकाणीं निर्माण होणाऱ्या संततीचें व आपलें स्वास्थ स्त्रियांना प्रथम विचारांत घेणें भाग आहे व निसर्ग प्रेरणाहि पण तशीच आहे. आणि त्यामुळें स्वाभाविकच पैशावर पुरुषांच्या योग्यतेचें माप स्त्रियांकडून केलें जातें. कित्येक कलावंतांचा असा अनुभव आहे कीं, ते दारिद्यावस्थेंत असतांना स्त्रिया त्याजकडे ढुंकूनहि पहात नसत. पण पैसा व कीर्ति यांची जोड मिळताच लहानमोठ्या स्त्रियांची दारांत नुसती झिम्मड उडे अगस्टे रॅडिन या विख्यात कारागिराला तो दरिद्री असतांना कोणतीहि स्त्री चुकूनसुद्धां विचारीत नसे परंतु तेच वर्षाकाठीं त्याला पंधरा-वीस हजार पौंड मिळूं लागतांच कुमारिकांचे कळपच्या कळप त्याचा संग्रह पहाण्याच्या निमित्तानें अगर त्याच्या हाताखालीं शिक्षण घेण्याच्या निमित्तानें तेथें जमूं लागले. आत्मविकासावर लक्ष न देतां अधिभौतिक सुखसाधनावरच विशेष लक्ष देण्याच्या या बहुजन स्त्री-समाजाच्या वृत्तीमुळेंच हिंदुधर्मशास्त्रकारांनीं तिला आत्मिक उन्नतीच्या मार्गातील धोंड म्हणून संबोधिलें आहे. तर कित्येक दुसऱ्या धर्मांनी तिला आत्माच नाहीं असें विधान केलें आहे. हिंदुसमाजरचनाकारांनीं गरीब लोकांचें स्वास्थ्य बिघडूं नये, याच दृष्टीनें स्त्रियांच्यावर निर्बंध लादून व नीतिनियमांचे कठोर निर्बंध निर्माण करून स्त्रियांना जखडलें. नाहीतर स्त्रियांच्या वरील वृत्तीमुळें त्या एकजात लक्ष्मीपुत्रांचे आहारी गेल्या असत्या व समाजाचा घात झाला असता.

हिंदुसमाजानें स्त्रियांच्यावर लादलेले हे निर्बंध पाश्चात्य राष्ट्रांत नसल्यानें मोलकरणीची राणी व राणीची मोलकरीण रोज होते. संपत्तीमान, तरुणांचा मोह स्त्रियांनीं टाकणें अशक्य असल्यानें एकच श्रीमान तरुण कित्येक कुमारिकांना आपल्या विषयपूर्तीसाठीं झुलवीत असतो, कमरेला विळखा घालून रोल्सराईसमध्यें आपल्या प्रेयसीला फेकणारा श्रीमान बच्च्या रोज कित्येक कुमारिकांना आपल्या श्रीमंतीवर झुलवीत आणि फसवीत असतो. पतीची सांपत्तिक स्थिति खलावताच त्यांच्याशीं फटकून वागणाऱ्या स्त्रियांचीं असंख्य उदाहरणें पाश्चात्य राष्ट्रांत दृष्टीला पडतात. गरीब बापाला बाप न म्हणता व त्याची काडीमात्र पर्वा न करतां कोणी-तरी भणंगाचा हात धरून जाणाऱ्या कुमारिकाहि तेथें कमी नाहींत आणि या सर्वांमुळें व्यभिचार, क्रौर्य, बेपर्वाई इत्यादि अनेक दुर्गुणांचे माहेरघर पाश्चात्य राष्ट्रें होऊन बसलीं आहेत. कडक समाजबंधनांनी नियंत्रित न केली गेलेली स्त्री नैसर्गिक भावनांच्या जशीच्या तशींच आहरीं जाऊन आधिभौतिक सुखवादाच्या इतकी मागें लागली आहे कीं, तिला आतां कशाचीच पर्वा उरलेली नाहीं. तेंच हिंदुसमाजांत स्त्रियांच्या भावनांना समाजबंधनांनी योग्य वळण लावलें असल्यानें स्त्रिया उत्तान बनून समाजसुस्थितीला धोका आणतील इतक्या बेताल होऊं शकत नाहींत.

सर्वसाधारण दृष्टीला दिसणारे स्त्रियांचे दुर्गुण हे जरी त्यांच्या कर्तव्य-भूमिकेच्या दृष्टीनें सद्गुणच ठरत असले, तरी त्यांचें नियमन हें मानववंशाच्या हिताच्या दृष्टीनें आवश्यकच आहे. आणि आपली समाजरचना इतक्या विचारपूर्वक पारखताच कितपत सदोष ठरेल याची शंकाच आहे. आम्हाला रानटी लोकांत जमा करणारे पाश्चात्य व त्यांचे हिंदी अनुयायी हे आपल्यावरील जबाबदारीचा विचार न करतां विधानें करीत असतात. दूषित ग्रहापलीकडे, हिंदु स्त्रीला तिच्या समाजरचनेंत मिळणारें स्थान त्याज्य आहे असें म्हणण्यास त्याच्यापाशीं सार्थ पुरावा नाहीं. स्त्रियांवर शास्त्रकारांकडून घालण्यांत आलेल्या निर्बंधामुळें हिंदु

स्त्रिया दुःखी आहेत असें म्हणणाऱ्यांनी स्वैर, अनिर्बंध अशा पाश्चात्य स्त्रिया हिंदु स्त्रीपेक्षां अधिक सुखी आहेत असें सशास्त्र व सप्रमाण सिद्ध करण्याचा प्रयत्न केल्यास यशाची वानवाच पडेल. हिंदु समाजरचनाकारांनीं साधलेलें समाजस्थैर्य त्यांना लाभलेलें दिसून येणार नाही. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' म्हणणारा मनु स्त्रियांच्या मानसशास्त्रांत जितका पारंगत होता तितका आजचा हॅवलॉक, एलिस अगर मिल्ल हे खास नाहींत. लोकप्रियता मिळविण्याच्या दृष्टीनें कितीही काव्यमय गुणांचा साज स्त्रियांच्या अंगावर चढविला, तरी निसर्गतः स्त्रीला मिळालेलें स्वरूप बदलूं शकणार नाहीं, तत्त्वज्ञान आणि शास्त्र यांनीं हिंदुस्थानांतच काय पण सर्व जगांतच स्त्रियांच्यावर जो एक कठोर हल्ला चढविला आहे, त्यांतील अतिशयोक्ति काढली तरी त्यांतील सत्य हें कधींहि न विसरतां येण्याजोगेंच आहे.

## स्त्रिया व राजकारण

स्त्रियांच्या बुद्धिजडतेनें त्या इतर कार्यक्षेत्रांत अयशस्वी ठरतात व म्हणूनच त्यांना गृहाच्या कार्यक्षेत्रांत राहणें भाग पडतें. हें बुद्धिमांद्य त्यांना नसतें तर मर्यादित क्षेत्रांत वावरण्याची त्यांना गरज भासली नसती व स्वाभाविकच त्यांच्या नैसर्गिक जबाबदारींत शैथिल्य निर्माण झालें असतें. स्त्रियांच्या गुणधर्माशीं विरोध असलेल्या कोणत्याहि कार्य-क्षेत्रांत त्यांना गोवण्याचा प्रयत्न करणें म्हणजे त्यांचाच अधःपात करणें नव्हे तर अखिल मानवजातीला धोका आणणें होय. आतांपर्यंतच्या विवेचनांत स्त्री-पुरुषांचे संबंध शक्य तितके स्पष्ट करण्यांत आले आहेत. चालू लोकशाहीच्या काळांत स्त्रियांना राजकीय क्षेत्रांतहि ढकलण्याचा प्रयत्न सुरू आहे; परंतु यामुळें राजकीय क्षेत्रांत आश्चर्य करण्याजोगी कोणतीच उत्क्रांति अद्याप घडून आलेली दिसत नाहीं. उलट राष्ट्राच्या सामाजिक जीवनावर मात्र आघात झाला आहे. आणि म्हणूनच युरोपांतील कित्येक राष्ट्रें आज राजकारणाचे दरवाजे स्त्रियांना बंद करीत आहेत. हिंदुस्थानांत या गोष्टीचा विचार करण्याची वेळ आली आहे. बैल गेल्या-

नंतर झोपा करण्यांत हशील नाहीं. विषप्राशन झाल्यानंतर रिकाम्या बाटलीवर विषारी अशी तांबडी चिठी मारण्यांत काय हशील? सध्याचा स्त्री-हितवाद हा कर्त्रींना कादंबरीकारांना, वर्तमानपत्रकर्त्यांना आपल्या मालाची उठावणी करण्यास कदाचित् उपयोगीं पडत असेल, परंतु शरीर आणि मानसशास्त्र यांच्या कसोटीवर हीं त्यांचीं गोड गोड तत्त्वें कधींहि टिकाव धरूं शकणार नाहींत. इंग्लंड अद्यापहि स्त्रियांच्या समाजांतील स्थानासंबंधानें साशंक आहे, आणि म्हणूनच एका विचारवंतानें त्याला खालील खडखडीत सल्ला दिला आहे---

"The chances are, then that, before another century dawns, we shall see women as judges, women in holy orders and women as cabinet ministers. But by the time this comes about, if it should come about, it is to be hoped that the influence of Anglo-Saxon and Teutonic countries will have sufficiently declined in the world; for their example to be no more than a sign-board, a warning and a danger signal, to inform other countries of the fatal result of following in their wake."

आमचा असा दृढ समज आहे कीं स्त्रियांच्या परिस्थितीचें योग्य ज्ञान करून न घेतां, स्त्रियांना पाश्चात्य राष्ट्रांत दुर्दैवानें जें वळण लागलें आहे तेंच येथें लावण्याचा प्रयत्न करून कांहीं लोक स्त्रियांना भलत्याच संकटांत लोटीत आहेत. स्त्रियांना प्रामाणिक खऱ्या करण्याच्या धकाधकीच्या मामल्यांत त्या अधिक कर्तबगार ठराव्या म्हणून त्यांना सुशिक्षित करण्याचा किंवा मनु आदि श्रुतिस्मृतिकारांनीं त्यांच्यावर केलेल्या एकंदर आरोपांचा निरास करण्याचा प्रत्येक प्रयत्न हा त्यांना त्यांच्या मूळ स्वभावापासून दूर नेण्यास कारणीभूत होतो. निसर्ग आणि स्त्री यांची फारकत करावयाची नसून स्त्रीला निसर्गाच्या स्वाधीन ठेवूनच कार्यक्षम व उच्च आचारविचारांचा परिपोष करण्यांत तत्पर अशी करावयाची आहे. आणि या दृष्टीनेंच हिंदु समाजामध्यें स्त्रियांचें स्थान व दर्जा ठरविण्यांत आलेला आहे, असें आम्हांस वाटतें.

# ७. तुझे आहे तुजपाशीं.

आतांपर्यंतच्या लेखांमध्यें स्त्रियांची शरीररचना, त्यामुळें निर्माण होणाऱ्या त्यांच्या आकांक्षा, त्यामुळें त्यांचा बनणारा स्वभाव इत्यादि अनेक गोष्टींचा शरीर व मानसशास्त्रदृष्ट्या विचार करण्यांत आला. स्त्रियांच्या स्वभावधर्माची व शारीरिक गरजांची निश्चित कल्पना आल्यानंतर आतां यापुढें करावयाचा विचार म्हणजे प्राचीन हिंदुपरंपरेनें स्त्रियांना दिलेलें समाजरचनेंतील स्थान स्त्रीस्वभावाला व सौख्याला जास्तींत जास्त पोषक होतें का विघातक होतें हा होय. प्राचीन परंपरेनें स्त्रियांवर फार मोठा जुलूम केला; त्यांना अज्ञानांधकारांत डांबून ठेवलें; त्यांना गुलाम केलें; अशीं अनेक विधानें आजपर्यंत करण्यांत आलीं आणि अद्याप येतातहि. तेव्हां ही गोष्ट खरी आहे काय? अगर हीं विधानें सर्वस्वीं बेलूट व बेजबाबदार अशींच आहेत काय याचाहि पर्यायानें उलगडा होणार आहे.

आतां आपणांस एका गोष्टीचा निश्चित उलगडा झाला आहे. ती गोष्ट म्हणजे स्त्री ही मानवाचें अस्तित्व कायम राखणारी एक शक्ति आहे व ती शक्ति एका विशिष्ट दिशेनेंच कार्य करीत राहिल्यास मानवाला कल्याणप्रद ठरते. या शक्तीला जननानुषंगिक क्रियेखेरीज इतर कार्यांत खेचण्यानें तिचा ऱ्हास होतो. हा ऱ्हास व त्याचे इतर दुष्परिणाम टाळावयाचे असतील तर या शक्तीला योग्य तें वळण व कार्य देण्यांतच समाजरचनेचें स्थैर्य आहे. एवढा पाया दृढ धरल्यानंतर वरील इमारतीचा आता विचार करण्यास हरकत नाहीं.

स्त्रियांच्या नैसर्गिक गरजांची तृप्ति यथाक्रम व योग्य मार्गानें होण्याची सोय समाजरचनेंत होऊनच नुसतें भागणार नाहीं तर त्याबरोबरच मानववंशाला धक्का न लागतां आणि त्यांचा शारीरिक व मानसिक ऱ्हास न होतां ही गोष्ट कशी साध्य करतां येईल, हेंहि त्याबरोबर पाहिलें

पाहिजे. नीति अनीति अगर चांगलें किंवा वाईट याची व्याख्या ठरवितांना मागें आपण एक नियम तयार केला. मानववंशाला हितकारी अशा सर्वच गोष्टींचा समावेश त्या नियमाप्रमाणें चांगल्यांत करण्यांत आला आहे. अर्थात् समाजाचे जे नीतिनियम ठरविण्यांत येतील ते मानवसमाजाचें हित साधणारे असतील तर ते चांगले या सदरांत पडण्यास कोणतीच हरकत दिसत नाहीं. या दृष्टीनेंच हिंदु स्त्रीवर लादण्यांत आलेल्या समाजबंधनांचा व तिला देण्यांत येणाऱ्या वागणुकीचा विचार करणें जरूर आहे.

## बालविवाहापासून फायदे

प्राचीन परंपरेप्रमाणें पितृगृहीं स्त्रीचें अस्तित्व जास्तींत जास्त आठ वर्षेपर्यंत असे. मनुष्याच्या आयुष्यांतील पहिली ७–८ वर्षें हीं निव्वळ पोरवय म्हणूनच असल्याने या काळांत कोणतेच संस्कार भावी जबाबदारीच्या दृष्टीने करण्यांत येत नाहींत; परंतु हा काळ संपतांच मुलामध्यें अगर मुलीमध्यें एक ग्रहणशक्ति आलेली असते, त्यांचें शरीर व मन त्यांच्या भावी जबाबदारीच्या दृष्टीनें तयार होऊन राहिलेलें असतें. अशा वेळीं मुलाचा उपनयनसंस्कार करून त्याला गुरुगृहीं विद्यार्जनास पाठविण्यांत येतें व तेथे सुमारें १२ वर्षांचा काळ निरनिराळे धडे घेण्यांत त्याने व्यतीत करावयाचा असतो. या काळांत जमविलेल्या विद्येच्या भांडवलावर आपला संसारिक जीवनक्रम यथासांग पार पाडण्याच्या तयारीनें हा तरूण गुरुगृह सोडून स्वगृहीं येतो. ही मुलाची तयारी झाली; पण आतां त्याच्याशीं सहकार्य करून त्याच्या जोडीनेंच प्रपंचाची धुरा उचलणाऱ्या त्याच्या पत्नीची–गृहीणीची–या प्रापंचिक जबाबदाऱ्या स्वीकारण्याच्या दृष्टीनें काय तयारी व्हावयास पाहिजे व समाजानें याची काय योजना केली आहे याचा उलगडा बालविवाहपद्धतीचा विचार केल्यानेंच होणार आहे. कित्येकांची कल्पना अशी आहे कीं, बाल-विवाहाची प्रथा मुसलमानी अमदानींत अस्तित्वांत आली, परंतु या

कल्पनेला आधार नाहीं. मुसलमानी अमलाच्या पूर्वींच कित्येक दिवस ही विवाहपद्धति हिंदुसमाजांत रूढ होती. अति प्राचीन काळीं, प्रौढ विवाह रूढ होता, पण पुढें तो सोडून बालविवाहाची प्रथा पाडण्यांत आली व विशेषतः ब्राह्मणांनीं यांत पुढाकार घेऊन ही गृहव्यवस्था ठरविली आणि म्हणूनच तिला ब्राह्मण संस्कृति या सदरांत घालण्यांत आलें.

पुरुष व स्त्री यांतील कार्यभिन्नत्व आतां स्पष्ट झालें आहे. या कार्य-भिन्नत्वाला अनुसरून ज्या वेळीं कुमार शिक्षणाच्या मार्गे लागतो त्याच वेळीं कुमारिकेच्या शिक्षणाचीहि व्यवस्था व्हावयास पाहिजे. कुमारिकेचें कार्यक्षेत्र निसर्गसिद्ध असल्यानें तिला त्या कार्यक्षेत्रांत उपयुक्त होईल अशा प्रकारचें शिक्षण मिळण्याची सोय बालविवाहानें होते. ज्या घरांत तिला आपला जन्म काढावयाचा तेथील रीतीभाती, आवडनिवड, त्या घराच्या आनुवंशिक गुणधर्मांशीं परिचय इत्यादि अनेक गोष्टी तिला साध्य करावयाच्या असतात; वयाच्या आठव्या अगर नवव्या वर्षापासून सासर-माहेर म्हणजे तिच्या शाळा व सुट्ट्याच होत. आपली शैक्षणिक जबाबदारी पार पाडून तिचा पति घरचा संसारी पुरुष बनेपर्यंत तिच्या गृहजीवनशास्त्राचा अभ्यास सासूसासऱ्याच्या व मातापित्यांच्या देखरेखी-खालीं पूर्ण होऊन ती पतिनिष्ठ भार्या, प्रेमळ माता, चाणाक्ष आणि सुबुद्ध गृहिणी या नात्यांनीं तिच्यावर येणारी बहुविध जबाबदारी योग्य तऱ्हेनें पार पाडण्यास तत्पर व समर्थ होऊन राहिलेली असते. या कार्यांत तिचा निरक्षरपणा तिच्या आड येत नाहीं. फ्लॉरेन्स नाइटिंगेल यासंबंधीं मोठ्या आदरानें म्हणते.

"In their own (Hindu) house-holds, be it in hut or palace, even though never seen, they hold the most important strong holds of any women on earth. We English women understand very little of the lives and circumstances, the ideas and feelings of these hundred

millions of women of India as if they lived on another planet."

## मानसिक प्रभाव

प्रो. मॅक्समुल्लर यानींहि बालविवाहाच्या चालीचें समर्थन केलें आहे. ते म्हणतात, बालविवाहामुळें स्त्रियांच्या भक्तीचें केंद्रीकरण, त्यांच्या पतीचे ठिकाणीं केलें जातें व त्यामुळें प्रौढ वयांत क्षुल्लक निराशेनें ती भग्न होत नाहींत. आमच्या इकडे श्रेष्ठ म्हणून समजल्या जाणाऱ्या व क्वचित् दृष्टीला पडणाऱ्या आयुष्यक्रमांत असें निष्ठामय प्रेम दिसून येतें व त्याकडे आपण आदरानें पाहतों, मग हिंदुस्थानांत सर्रास दृष्टीला पडणाऱ्या या गोष्टीबद्दल आपण आदर कां व्यक्त करूं नये?" पतिभक्ति व संसार-निष्ठा या दोन गुणांचा परिपोष ज्याप्रमाणें बालविवाहानें जास्तींत जास्त होतो त्याप्रमाणेंच दुसरी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट या पद्धतीनें साध्य होते आणि ती म्हणजे शीलसंवर्धन होय. जननशास्त्रदृष्ट्या स्त्रियांच्या देहाइतकेंच मनाला महत्त्व आहे, ही गोष्ट आतां अनेक दाखल्यांनीं सिद्ध झाली आहे. स्त्रियांना योग्य कालांत पतिसौख्य न मिळाल्यास व प्रौढ कुमारिका म्हणून त्या वावरूं लागल्यास वासनातृप्तीच्या इच्छेनें त्या अनेक पुरुषांकडे पाहतात, त्यांच्या सहवासाची अपेक्षा करतात, त्यावेळीं पुरुषांच्या योग्यायोग्यतेचा काडीमात्र विचार त्यांचे ठिकाणीं संभवत नाहीं, अर्थात् हा निसर्गाचा प्रभाव आहे. यामुळें पुढे योग्य वराशीं विवाहबद्ध होऊनसुद्धा त्यांच्या ठिकाणीं निर्माण होणाऱ्या संततींत, कौमार्यावस्थेंत त्यांच्या मनानें अपेक्षिलेल्या पुरुषांचे गुणावगुण उतरल्या-शिवाय राहात नाहींत व अशा तऱ्हेनें ज्या घराण्याची आनुवंशिकता तिच्या संततींत जोपासली जावयास पाहिजे ती न जातां भिन्न रक्ताची व भिन्नवंशाच्या गुणधर्मांची संतती निर्माण होऊन आनुवंशिक उच्चतेला धक्का बसतो. हा सर्व मानसिक प्रभावाचा परिणाम. मग यापुढें एखादी पायरी गेली असल्यास पाहावयासच नको.

## पुनर्विवाहासंबंधीं निर्बंध

अमेरिकन पतिपत्नीला झालेल्या कृष्णवर्ण अपत्याची शास्त्रीय चिकित्सा करून न्यायमूर्तींनीं असा सिद्धांत काढला कीं, संभोगकाळीं निग्रो मनुष्याच्या फोटोकडे स्त्रीचें मन वेधल्यानें हा प्रकार झाला असावा. वरील उदाहरण कितपत ग्राह्य आहे अगर अग्राह्य आहे हें जरी घटकाभर दूर सारलें तरी स्त्रीच्या मानसिक व्यभिचाराचा परिणाम तिच्या संततीवर होतो हें प्राणिसृष्टींतले कित्येक दाखले घेऊनहि आतां सिद्ध करण्यांत आलें आहे. बालविवाहानें हा अनर्थ सर्वस्वी म्हणण्याची इच्छा नसल्यास बराचसा टळतो असें म्हणण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं. वैषयिक भावना स्त्री-मनांत उत्पन्न होण्यापूर्वीपासून समानधर्मी, समानकुल सर्वस्वी योग्य अशा मुलावर पति म्हणजे आपणांस परमपूज्य व प्रिय अशी वस्तु या दृष्टीनें त्याची भक्ती करीत असल्यानें व योग्य काळीं तिला तृप्त करण्यास तो सज्ज असल्यानें मानसिक अगर शारीरिक व्यभिचारास जागा रहात नाहीं व अर्थात पुढील संततीची आनुवंशिकता शाबूत राखली जाते, ती उत्क्रांत होते, रक्तमिश्रणाच्या दोषानें, संकरानें ती अपक्रांत होण्याची भीति राहात नाहीं. पुनर्विवाहासंबंधीं घालण्यांत आलेल्या निर्बंधाच्या बुडाशीं हेंच तत्त्व आहे. एका पुरुषाशीं पत्नी या नात्यानें संलग्न झालेली स्त्री पुनर्विवाहोत्तरहि मूळ पतीच्या आनुवंशिकतेची संतती निर्माण करते. तारुण्यप्राप्ती झाल्याबरोबरच मनांत उत्पन्न होणाऱ्या विचार विकारांचा विचार केल्यास बालविवाहाच्या चालींत अनिष्ट असें कांहींच दिसणार नाहीं. उलट आनुवंशिकता, व देहपावित्र्य या दृष्टीनें हे विवाह अधिकच हितावह आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुलांच्या मौंजिबंधन संस्कारासारखाच मुलीचा विवाहसंस्कार आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुलीच्या विवाहानंतर तिच्या शिक्षणास सुरुवात होते व योग्य काळीं गृहाची भावी जबाबदारी स्वीकारून ती पार पाडण्यास ती समर्थ होते. बालविवाहांतील आयुष्यक्रमानें मिळणाऱ्या

शिक्षणाचा मानसशास्त्रदृष्ट्या विचार केल्यास आपणांस असेंच आढळून येईल कीं, संसारनिष्ठा, पातिव्रत्यधर्म इत्यादि अनेक सद्‌गुणांचा ठसा तिच्या मनावर उमटविणाच्या दृष्टीनें अत्यंत योग्य अशा कालांतच तिला हें शिक्षण मिळण्याची सोय होते. या एकंदर चालीरीतीमुळें हिंदी स्त्रीच्या पावित्र्याच्या कल्पना इतक्या जोरदार व प्रभावी बनतात कीं, केवळ या एका सामर्थ्यावर त्या आपलें संरक्षण करूं शकतात. यासंबंधी कांहीं बाबतींत मिस मेयोचा भाऊच शोभणारा व हिंदुस्थानांत कांहींच चांगलें न पाहणारा ॲबे डयूबास कबूल करतो,

"Among the Hindus the person of a woman is sacred. A dwelling in which females are to be found, even the hut of the most helpless widow is an inviolable asylum into which the most determine libertine would never dare to penetrate, or should he do it, his audacity would not remain unpunished."

## देहपावित्र्य व नियोगपद्धति

या देहपावित्र्याबरोबरच स्त्रियांच्या निसर्गधर्माचाहि विचार शास्त्रकारांनी केला आहे. अपत्यहीन स्त्रीला स्वाभाविक सुखाचा लाभ मिळत नाहीं, त्यामुळें आपद्धर्म म्हणून नियोगाची परवानगी देण्यांत आली आहे. त्यामुळें वंशहानी टळते. परंतु या ठिकाणीं दिराचीच योजना आली आहे. विधवा व दीर यांच्या संबंधाला पतीपत्नीचें नातें देण्यांत आलेलें नाहीं व संततीची मर्यादा पण एक किंवा दोन या पलीकडे जाऊं देण्यांत आलेली नाहीं. पंडू, त्यांच्या पत्न्यांच्या दृष्टीनें मृतवत् असल्यानें कुंती व माद्री यांनीं देवापासून नियोगानें संतती प्राप्त करून घेतली. याचा अर्थ श्रेष्ठ बीजाचा त्यांनीं आश्रय केला हाच होय व या क्षेत्रज संततीलाहि योग्य तो मान समाजानें दिलाच. म्हणजे नियोग हा गौणपक्ष असला तरी स्त्रीधर्माची व सौख्याची पूर्ति होण्याच्या दृष्टीनें आपद्धर्म म्हणून कां होईना पण आवश्य समजला गेल्यानें समाजानें

अशा संततीसंबंधानें फारसें अनुदार धोरण स्वीकारलेलें दिसत नाहीं. परंतु यांतहि वंश श्रेष्ठता वंशसंरक्षण व पावित्र्य खराब न होईल याची काळजी घेण्यांत आलेली होती, हें दिराच्या अगर देवाच्या योजनेवरूनच दिसून येणार आहे. परंतु अलीकडील नवनीतीचा जसा स्वैराचारास उपयोग होतो त्याच प्रमाणें नियोगाचा स्वैराचारार्थ उपयोग होऊं लागतांच फिरून शास्त्रकारांना नियोग निषिद्ध ठरविण्याची पाळी आली आणि म्हणूनच पुढें मनूनें नवव्या अध्यायांत नियोगाला उचलून धरणाऱ्या वेन राजाला दोष दिला. वंशशुद्धतेच्या दृष्टीनें हा विचार झाल्यानंतर लग्नसंस्थेच्या स्थिरतेचा व स्त्रियांच्या मर्यादित आयुष्यक्रमाचा राष्ट्रीय जीवनावर काय परिणाम होतो हें पाहण्यास हरकत नाहीं.

ग्रीक व रोमन लोकांची संस्कृति ही अत्यंत पुढारलेली म्हणून एके काळीं नांदत होती. त्या वेळीं त्यांची विवाहसंस्था ही हिंदु विवाह संस्थेप्रमाणेंच होती. पुढें सॉक्रेटिसाचे कालांत स्त्री-स्वातंत्र्याची कल्पना पुढें आली, त्यामुळें लग्न व त्यावर अवलंबून असणारा कौटुंबिक आयुष्यक्रम यांचा हळूहळू नाश झाला. या नाशाबरोबरच मानसिक इष्ट गुणधर्मी प्रजेची निपज कमी होऊ लागून, या संस्कृतीचा नायनाट झाला. हीच भीति सध्यां इंग्लंडमध्येंहि प्रकट केली जात आहे हें मी मागें सांगितलेंच आहे. रोमन संस्कृतीकडे व समाजाकडे पाहिले तरी हाच अनिष्ट चमत्कार आढळतो. समान हक्क व व्यक्तिस्वातंत्र्य या द्वयाचा विकास व जोपासना करण्याचा चंग रोमन समाजानें बांधतांच रोम शहर विषयविलास व चैन यांचे माहेरघर बनलें. वैवाहिक आयुष्यक्रमांत स्वेच्छाचाराचा शिरकाव झाला आणि यामुळें हीनप्रजा जन्माला येऊन रोमन संस्कृति नामशेष झाली. रोमन स्त्रियांच्या या स्वेच्छाचारासंबंधीं सेनेका म्हणतो--

"The ladies do not reckon the year by the number of the consuls but by the number of their husbands."

वरील उद्‌गारांचें रहस्य ज्या वेळीं रोमन स्त्री-पुरुषांना कळेनासें झालें त्या वेळींच त्यांचा, त्यांच्या संस्कृतीचा व वैभवाचा पार नाश झाला. प्राचीन इतिहासाचे हे धडे आज विसरून चालणार नाहीं. समाजाच्या संस्कृतीच्या व बेजबाबदार जीवनक्रमांत असल्याची दिसतात. संस्कृतीच्या उभारणीच्या दृष्टीनें हिंदु समाज आज पृथ्वीवरील कोणत्याहि समाजापेक्षां जुना आहे. आजपर्यंत कित्येक समाज आले आणि गेले. त्यांना जी स्थिरता मिळूं शकली नाहीं, ती हिंदु समाजाला मिळूं शकली. कारण हिंदु समाजानें आंखलेला आचारधर्म स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक गरजा लक्षांत घेऊनच आखला व कोणत्याहि भ्रामक कल्पनांच्या मागें लागून या आचारधर्मापासून तो च्युत झाला नाहीं. आणि म्हणूनच हजारों वर्षें टक्केटोणपे खाऊनहि तो तसाच मानवाला आदर्शभूत म्हणून जिवंत राहिला. या समाजावर अनेक पंथोपपंथांनी हल्ले केले. जैन, बौद्ध, असुर, लोकायत वगैरे सांप्रदायांनीं आपापल्या प्रयत्नांची शिकस्त केली. परंतु हिंदु समाजानें आपल्या अखंड परंपरेचा भंग होऊं दिला नाहीं व शेवटीं या सर्वांनाच त्यानें आत्मसात् करून टाकिले. सुप्रसिद्ध गुणविकासवादी चार्लस डार्विन याच्या म्हणण्याप्रमाणेंसुद्धां देहपावित्र्य व गुणविकास यांचा अन्योन्य संबंध आहे. तो म्हणतो----

## नैतिक व बौद्धिक सामर्थ्यांची आवश्यकता

'The struggle between the races depended on intellectual and moral qualities' म्हणजे जीवनाचा झगडा यशस्वी होण्यास नैतिक व बौद्धिक सामर्थ्यांची आवश्यकता असते ही गोष्ट उघड आहे. आणि संततींत सामर्थ्य निर्माण होण्यास मातापित्यांच्या विशेषतः मातेच्या, शारीरिक व मानसिक शुद्धतेची आवश्यकता आहे. स्त्रियांचें अनिर्बंध स्वातंत्र्य त्यांना या पावित्र्यापासून वंचित करते व याचा परिणाम शेवटीं समाज व संस्कृति यांचा नाश होण्यांत होतो.

संस्कृतीची हीनावस्था ओढवताच वेश्यावृत्तीसारख्या व स्वैराचारासारख्या अनेक अनैतिक उठाठेवींना ऊत येतो व समाजाचें नियंत्रण करणें अशक्यप्राय होऊन जातें. आज पाश्चात्य राष्ट्रांत वेश्या व्यवसायाला आलेली भरती लज्जास्पद आहे ही गोष्ट तेहि नाकबूल करीत नाहींत. या रोगावर अनेक उपाय सुचविण्यांत येत आहेत; परंतु अद्याप कोणताच म्हणावा तसा यशस्वी झालेला दिसत नाहीं. कोणी परवाने काढतो, कोणी स्वतंत्र वसाहतींची कल्पना काढतो. कोणी आणखी कांहीं सुचवितो, परंतु वेश्याव्यवसायाच्या बुडाशीं असलेल्या स्त्रियांच्या विशेष मनोभूमिकेचा विचार करून मुळावरच आघात करण्याची गोष्ट कोणीच बोलत नाहीं. डॉ. ड्रिस्डेलनें मात्र या बाबतींत जरा व्यापक विचार प्रकट केले आहेत. हिंदु समाजाच्या वैवाहिक कल्पना व नीतिविषयक कल्पना वेश्याव्यवसायाला आळा घालण्यास समर्थ आहेत अशाच स्वरूपाचे विचार त्यानें मांडले आहेत. तो म्हणतो—

"Early marriage, apart from its mere ideal character is the only possibility of reducing and eliminating the evil of prostitution, which evil has defied all other efforts to check."

'The great unmarried.'

वॉल्टर गलीचन यानेंहि याच मताचा पुरस्कार केला आहे. पुरुषांच्या बाहेरख्यालीपणास आळा बसतांच पर्यायानें वेश्याव्यवसायाचेंहि उच्चाटन होणार असल्यानें, तो म्हणतो—

"The truth remains that early wedlock for man is a check upon the commercialised intercourse of the sexes and a safe-guard to the health of the population."

समाजाला नामोहरम करणारे एवढे मोठमोठाले आघात बालविवाहानें टळत असल्यानें प्राचीन हिंदु परंपरेनें याचा आश्रय केला यांत आश्चर्य नाहीं. स्त्रीजीवनशास्त्राचें पूर्ण ज्ञान करून घेऊनच हिंदूंची समाजरचना

व तींतील स्त्रियांचें स्थान ठरविण्यांत आलें आहे. युरोपियन लग्नसंस्थे-संबंधीं प्रो. लुंडबर्ग यांनीं आपला अभिप्राय खालील शब्दांत व्यक्त केला आहे. 'लग्नसंस्थेबाबत असणारे येथील राष्ट्राचे कायदे म्हणजे जीवनशास्त्राच्या अज्ञानाचें मूर्तिमंत प्रदर्शन होय. विवाहशास्त्राची उभारणी सुप्रजाजनन व स्त्रीसौख्यपरिणति यांना अनुसरूनच झाली पाहिजे. नाहीं तर समाजांतील एकाच अंगाची सौख्यपूर्ति करणारें शास्त्र हें शास्त्रच नव्हें !

## आमची स्वाभिमानशून्यता

स्त्रीची अपत्यधारणा बंद होण्याचा काल मागे सांगितलाच आहे. स्त्री ऋतुस्नात झाल्यापासून हा काळ येईपर्यंत सुमारें ३० ते ४० वर्षें जातात. या कालावधींत तिला प्राप्त होणारीं अपत्यें व तिला मिळणारे एकंदर गृहजीवन यामुळें हिंदु स्त्रीला आपल्या सौख्यांत कांहीं उणेपणा आहे असें वाटण्यास मार्गच राहात नाहीं. अर्थात कोटींनी असणाऱ्या समाजांत कांहीं अपवादात्मक उदाहरणें असतील, नाहीं असें नाहीं. पण तेवढ्यामुळें सबंध समाजरचनेवर शस्त्र चालविण्याची भाषा करण्यांत तात्पर्य नाहीं. हिंदु संस्कृतीला व समाजाला लाभलेलें दीर्घायुष्य त्याच-प्रमाणें मानवांच्या सद्वृत्तींत त्यानें घडवून आणलेली उत्क्रांति या गोष्टी डोळ्याआड करून चालणार नाहींत. हिंदुसमाजाचा संस्कृतीचा हा विक्रम म्हणजे तिच्या आद्य उत्पादकांच्या दीर्घ व प्रगाढ ज्ञानाचा विजय आहे. जीवनांतील मानवांच्या आत्यंतिक गरजा, त्यांची इंद्रियरचना, त्यांच्या मनोवृत्ति, त्यांचा निसर्गधर्म यांचा सूक्ष्म अभ्यास करून त्यांनीं मानवांचे नियंत्रण करणारें शास्त्र तयार केलें, या शास्त्रानें मानव बांधला गेला. परंतु तें बंधन निसर्गाशीं विरोधी नसल्यानें त्यानें मानव्याचा विकासच केला, त्यांच्या आधिभौतिक व आध्यात्मिक उत्क्रांतीची सोय या बंधनांनीं करून दिली. या समाजाच्या मागाहून आलेले कित्येक समाज वेड्या कोकराप्रमाणें बंधनें झुगारून उधळले व कालरूपीं व्याघ्राच्या भक्ष्यस्थानीं

पडले, नामशेष झाले. आपल्या हिंदु समाजाच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा प्रकाश तसाच शाबूत राहिला आणि राहील यांत संदेह नाहीं. मानवी जीवनाशीं संबंध येणाऱ्या निसर्गाचे कायदे अनादिसिद्ध आहेत. त्यांना दूर करणें मनुष्याच्या शक्तीबाहेर आहे. मग आपल्या जीवनयात्रेंत मनुष्यानें निसर्गाच्या कायद्यांना धरून आपला मार्ग आखावा हें जास्त शहाणपणाचें होय. आणि हीच दृष्टि प्राचीन शास्त्रकारांनीं ठेवून एकदां समाज व्यवस्था ठरविल्यानंतर त्यांत ढवळाढवळ करण्याची आवश्यकता काय? निसर्गनियम व शक्ति जोंपर्यंत त्याच स्वरूपांत कार्य करीत आहेत तोंपर्यंत तीच समाजव्यवस्था अंगीकारण्यांत तोटा व कमीपणा तो कोणता? आमच्या ज्ञानानें पाश्चात्यांनीं शहाणे होण्याच्या मार्गास लागावें व आम्ही त्या ज्ञानाची खंत करावी यासारखी स्वाभिमानशून्यता ती कोणती?

# ८. भपक्याला भुलूं नका

## पाश्चिमात्य स्त्रियांची भडक चित्रें

हिंदुसमाजरचनेप्रमाणें स्त्रियांना समाजांत मिळालेलें स्थान व संरक्षण आजच्या या बदलत्या काळांत नष्ट होऊ लागल्यामुळें व पाश्चात्य स्त्रियांची भडक चित्रें डोळ्यांपुढें दिसत असल्याकारणानें आजचा हिंदी स्त्रीसमाज आपल्या कुवतीसंबंधानें व स्थानासंबंधानें साशंक झाला आहे. ही परिस्थिति निर्माण होण्यास परकीयांची मुत्सद्देगिरी जितकी कारणीभूत आहे तितकीच स्वकीयांची परधार्जिणी वृत्तीहि आहे ही गोष्ट नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. पाश्चात्यांतील कांहीं विद्वानांनीं (?) स्त्रीपुरुषांतील शारीरिक व मानसिक भेद लक्षांत न घेतां दोन्ही मनुष्य प्राणीच आहेत अर्थात् त्यांच्या आचारधर्मामध्यें व कुवतीमध्यें सारखेपणा राहण्यास हरकत नाहीं असा आभास निर्माण करून आपली फसवणूक तर करून घेतलीच; पण आपणाबरोबर इतरांचीहि केली. पण आतां ही गोष्ट क्रमानें प्रत्येकाच्या लक्षांत येऊं लागली असून पाश्चात्य राष्ट्रांतहि स्त्रियांची कर्तव्यभूमिका पुरुषाहून अत्यंत भिन्न आहे ही गोष्ट स्पष्ट स्वरूपांत प्रतिपादन करण्याची आवश्यकता भासूं लागली आहे.

औद्योगिक क्रांति आणि गेलें महायुद्ध यांनी युरोपच्या जीवनक्रमांत जी क्रांति केली तीमुळें स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या कल्पनेस भर आला. भर आला म्हणण्यापेक्षां आणण्यांत आला असें म्हणणेंच अधिक श्रेयस्कर होईल. तत्पूर्वी मुलांच्या परिश्रमावर कारखानदारांचा भर असे. परंतु हा प्रकार अमानुष वाटल्यानें तो नियंत्रित करण्यांत आला व त्याहूनहि अमानुष असा स्त्रीपरिश्रमाचा प्रघात सुरू करण्यांत आला. कर्तबगार माणसें रणांगणावर, लहान मुलें परिश्रमास अयोग्य अशा स्थितींत यंत्राशीं खेळ खेळण्यास स्त्रियांना उत्तेजित करण्याची

गरज भासे, व म्हणून युरोपांतील भांडवलवाल्यांनीं स्त्रीहितवादाचें ढोंग निर्माण करून आपलें हित साधलें पण पर्यायानें त्यांनीं समाजाचें व स्त्रियांचें अनहितच केलें. इंग्लंडच्या आगमनानें हिंदुस्थानांतील खेडीं नाश पावलीं व तेथील कुटुंबसंस्था मोडकळीस आली, यामुळें स्त्रीहित-वादाचें भूत उठविण्यास योग्य संधि मिळून लवकरच त्यानें लोकांची मनें पछाडलीं गेलीं, व त्यामुळें प्राचीन समाजानें स्त्रीपुरुषांवर जी नैतिक बंधनें घालून त्यांना एकत्रित आणलें होतें तीं बंधनें सैल पडूं लागली, स्त्रीची गृहाशीं घालून देण्यांत आलेली जोड स्त्रीला गुलामगिरी वाटूं लागली आणि सबंध समाजरचनाच मोडून पडते कीं काय अशी भीति आज या घटकेला निर्माण झाली आहे. परंतु आज जुनी समाजरचना मोडून ती पाश्चात्यांच्या सल्ल्यानें त्या स्वरूपांत उभारण्यानें स्त्रिया आपलें कितपत हित साधू शकतील हा मोठा प्रश्न आहे आणि त्याचें उत्तरहि आमच्या अल्पमतीप्रमाणें आम्ही मागील लिखाणांत दिलें आहे. बौद्धिक शिक्षणाच्या बाबतींत आज स्त्रियांकडून होत असलेली धडपड त्यांच्या सौख्याला कितपत पोषक होईल अगर होते याचें दिग्दर्शनहि करण्यांत आलें आहे. इतक्या सर्व गोष्टी सत्यस्वरूपांत स्त्रियांपुढें ढळढळीतपणें उभ्या असतां स्त्रियांनीं कोणता मार्ग स्वीकारावा अगर स्वीकारणें जरूर आहे हें निराळें सांगण्याची आवश्यकता आहे असें वाटत नाहीं. ब्रिटिश साम्राज्यसत्तेनें स्वतःला पोषक असा पांढरपेशा नोकरवर्ग निर्माण करून खेड्यांतील बुद्धिमत्ता शहरांतून एकत्रित केली, व तिला स्वतःचा राज्यशकट ओढावयास लावून, गुलाम करून आपला मार्ग निष्कंटक केला. शहरांत येऊन नोकरीच्या पायीं स्थिर झालेल्या बुद्धिजीवी कुटुंबांवर पाश्चात्य स्त्रीजीवनाच्या भडक रंगाचा परिणाम होऊन त्यांनीं जणूं कांहीं स्वतःच्या करमणुकीखातर या स्त्रीहितवादासारख्या चळवळी सुरू केल्या, आणि या करीत असतां आपल्या दृष्टीपुढें त्यांच्याच दर्जाचा पांढरपेशावर्गच फक्त त्यांनीं ठेविला आणि त्या वर्गावरून

हिंदुस्थानांतील अखिल स्त्रीजातीच्या जीवनविषयक कल्पनांचा अंदाज बांधून त्यांनीं मोठीच चूक केली.

## जीवनोपयोगी कार्याचें मोल

देशांतील कोट्यावधी स्त्रिया हजारों वर्षें जीवनाच्या ज्या एका विशिष्ट चाकोरींतून नांदत आल्या, त्यांच्या त्या जीवनावर या चळवळीचा परिणाम झालाच नाहीं व त्यामुळें बहुजन स्त्रीसमाज विचलित झाला नाहीं. परंतु आतां मात्र त्याला पथभ्रष्ट करण्याची कामगिरी कायद्याच्या जोरावर करण्याची भाषा सुशिक्षित (?) म्हणविणारे स्त्रीपुरुष करूं लागले आहेत, आणि त्यामुळें या पांढरपेशा वर्गाचे हातीं सरकारानें दिलेलें शस्त्र समाजसंरक्षणास कारणीभूत न होतां उलट त्याच्या नाशासच कारण होईल कीं काय अशी भीति पडली आहे. "कौटुंबिक जीवन हा स्त्रियांचा मूलभूत हक्क आहे आणि ते यशस्वी होण्याच्या दृष्टीनें स्त्रियांनीं व पुरुषांनीं जर कोणत्या खटपटी केल्या तर त्या केव्हांहि स्तुतीस पात्रच आहेत, आणि या खटपटी करीत असतांना स्त्रियांच्या स्वाभाविक सुखांना, व आरोग्याला धक्का न बसेल अशी प्रत्येक खबरदारी घेण्यांत आली पाहिजे. जीवनोपयोगी कार्याचें मोल पैशानें मोजण्याची वृत्ति घातुक आहे. गृहकृत्यें त्यामुळें त्याज्य वाटतात व मास्तरकींत गोडी वाटते. आज पांढरपेशा वर्गांतील स्त्रीनें गृहकृत्यांचा त्याग करण्याची वृत्ति पत्करल्यानें, संपूर्ण आरोग्यदायक अशा सात्विक अन्नासहि मुकण्याचा प्रसंग या वर्गावर आला आहे. पैशानें या हानीची भरपाई होणें शक्य नाहीं. राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठीं झगडत असतांना स्त्रिया आपल्या निसर्गसिद्ध गरजांचा व हक्कांचा विचार करीत नाहीं आणि याला कारण म्हणजे जीवनाच्या आणि सौख्याच्या पाश्चात्यांचे संगतीनें बनवून घेतलेल्या भलत्याच कल्पना होत. स्त्रीचा नैसर्गिक हक्क म्हणजे मातृत्व होय. आणि संततीच्या भावी सुखदु:खाची सर्वस्वी मदार तिनें तिला दिलेल्या शिक्षणावर आहे. मानवजातीवर प्रेम करण्याची कला,

अन्यायाचा प्रतिकार करण्याची वृत्ति, धडाडी अशा अनेक सद्गुणांचें बाळकडू सात्विक मातेच्या दुधांतूनच अपत्यांच्या गळीं उतरत असतें. हिंदुस्थानचे भावी नागरिक तयार करण्याची भली मोठी जबाबदारी अंगावर असतांना दुसऱ्या कोणत्या हक्काकरितां भांडण्याची येथील स्त्रियांना गरज आहे ?

हिंदुस्थानच्या गतजीवनक्रमांत कुटुंबांची जोपासना ज्या एका विशिष्ट आर्थिक घटनेमुळें होत होती तोंपर्यंत स्त्री आणि पुरुष यांच्या जीवन-क्रमाची दिशा त्यांच्या त्यांच्या निसर्गधर्मांना अनुरूप अशीच होती. पूर्वींची आपली ग्रामीण संस्कृति दिसावयास जरी साधीच असली, आधिभौतिक सुधारणांचा ( ? ) झगझगाट जरी तिच्यांत नसला तरी मनुष्याच्या चांगुलपणाला व इतर शारीरिक आणि मानसिक वाढीला पोषक असे किती तरी गुण तिच्यांत सांठविले होते. खेड्यांचें स्वावलंबन त्या काळीं पूर्ण स्वरूपांत अस्तित्वांत असल्यानें, स्त्रिया गृहकृत्यें आटोपून, घर बसल्या जीवनांतील इतर गरजांना उपयुक्त असें इतरहि कांहीं कार्य करीत. आणि त्यामुळें आज मध्यम समाजांत स्त्री ही अडचण व श्रीमंत समाजांत शोभा होऊन बसली आहे, तिला एक प्रकारचें परावलंबित्व येऊन, ती पुरुषांच्या मार्गांतील धोंड आहे किंवा नाहीं हें चर्चा करून ठरविण्याची पाळी आली आहे. पूर्वीं अशी परिस्थिति नव्हती. प्रसिद्ध असलेल्या बंगाली जरतारी कापडावरील सर्व नक्षीकाम स्त्रियांच्या हातचें असतें, आणि हिंदी स्त्रियांनीं खेडोपाडीं घरबसल्या केलेलें कापड हें देशी परदेशी, सरदार दरकदार, मोठ्या हौसेनें आणि स्पर्धेनें खरेदी करीत असत. घरगुती औषधांचा मक्ता स्त्रियांकडे असे. त्याचप्रमाणें स्त्रीजीवनांतील नडीअडचणींत उपयोगी पडण्यास वाकबगार असा स्त्रीसमाजहि पण खेडोपाडीं तयार असे. अनुभवाच्या दृढ पायावर त्यांचें ज्ञान उभे असल्यानें आजची साशंक वृत्ति त्यांना कधींच स्पर्श करीत नव्हती. अशा कार्यांत परोपकार बुद्धीला प्राधान्य असल्यानें त्यांचें

मोजमाप कोणी पैशावर करण्याची क्षुद्र बुद्धी दाखवीत नसत. रिकामा वेळ दुसऱ्याच्या ओसरीवर बसून गप्पा छाटीत काढणारा स्त्रीवर्ग त्याकाळीं नसे. कारण त्यांना रिकामा वेळच मिळत नसे. स्वतःचें कुटुंब पूर्ण स्वावलंबी करण्याच्या दृष्टीनें स्त्रियांचे घरगुती उद्योग किती तरी उपयुक्त ठरत, आणि यामुळें उभ्या आयुष्यांत दुसऱ्याच्या तोंडाकडे न पाहतां काटेकोरपणानें संसार करून आपला ऐहिक जीवनक्रम निर्वेधपणानें व सुखासमाधानानें पार पाडणाऱ्या किती तरी स्त्रिया येथें होऊन गेल्या, अद्याप आहेत.

## बालविवाहाची उपयुक्तता

त्यांचे विवाह बाळपणीं होत. त्यांच्यावर प्रचलित शिक्षणाचे, कल्पनांचें आदर्शजीवन क्रमाचे संस्कार झालेले नसत. परंतु इतकें असूनहि आजच्या स्त्रीचें नीरस जीवन त्यांच्या वांट्याला आलें होतें असें म्हणवत नाहीं. बालविवाहाची निंदा करून प्रौढविवाहाला प्राधान्य देणाऱ्या स्त्रियांनीं याबद्दल कांहीं प्रसिद्ध पाश्चात्यांचीं मतें जरूर विचारांत घ्यावीं. मिस् मॉड व्हिलर मोठ्या काकुळतेनें म्हणते, "कृपा करून वीस वर्षांच्या पुढें अविवाहित राहूं नका!" "ड्यूक ऑफ् बकिंगहॅम" यानें राजकुमार चार्लसचा, स्पेनच्या राजकन्येशीं ठरलेला विवाह लांबीवर पडूं नये, म्हणून मोठी मार्मिक सूचना केली आहे. तो म्हणतो.

"You know that the hawk, when she is first dressed and made ready to fly, having a great will upon her, if the falconer do not follow it at the time she is in danger to be dulled forever."

मनूनें, योग्य कालांत पित्यानें आपल्या मुलीचा विवाह करून न दिल्यास तिनें स्वतः योग्य तो मार्ग स्वीकारावा अशी मुभा देऊन ठेवली आहे, त्यांतीलहि मर्म हेंच आहे. रोमन संस्कृतीनें एकोणिसाव्या

वर्षी अविवाहित रहाणाऱ्या स्त्रीचा निषेध केला आहे. जपानानें हिंदुस्थानांतल्या प्रमाणेंच बालविवाहाचा पुरस्कार केला आहे. बाल-विवाहासंबंधीच्या सर्वच ठिकाणच्या ह्या रीतीभाती दूरदर्शकत्व निदर्शक आहेत. आधुनिक शास्त्रज्ञ या रूढींची चीरफाड करण्यास अनेक शस्त्रें घेऊन धावले, शेवटीं तेच सत्य बाहेर पडतांच थंड झाले. डॉ. मॅगनस् आपल्या शरीर व लैंगिक शास्त्रावर लिहिलेल्या प्रचंड ग्रंथांत म्हणतो कीं, योग्य कालीं प्रसूति न झाल्यास स्त्रियांना धोका निर्माण होतो. त्यानें मांडलेला खालील मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे.

'Whenever an ovum matures in the ovary, the female's body makes all necessary preparations........ should these natural provisions prove superfluous, owing to the fact that no fertilization occurs, then all the preparations for the development of the ovum are cleared away, together with the dead ovum itself, and the bloodgorged muscous membrance of the womb breaks up resulting in a bloody muscous discharge. This is the meaning of the menstrual flow. Every menstruation is to some extent an aborative pregnancy, a birth that has failed to take place.'

## दीर्घायुष्य कोणास लाभतें

डॉ. वेपचेक या गृहस्थानें १७ वर्षांचे आंत माता झालेल्या ९६ स्त्रियांची व २० ते २४ च्या दरम्यान माता झालेल्या ९६ स्त्रियांची तुलनात्मक दृष्टीनें सूक्ष्म परीक्षा करून खालील निकाल दिला.

"Found that the first group did not compare unfavourably with the second group, but that in some respects conditions were more favourable for them than for the older group"

न्यू साउथ वेल्समध्यें गोळा केलेली पुढील आकडेवारी पॉपेनाई यांनीं प्रसिद्ध केली आहे.

| नवीन जन्मलेल्या अपत्यांतील दर हजारी मृत्यूचें प्रमाण | मातांचें वय. |
|---|---|
| ३·०४ | २० ते २४ |
| ६·०८ | ३० ते ३४ |
| ११·०४ | ४० ते ४५ |

आणि शेवटीं ते शेरा देतात:—

"There are fewer infant deaths among the off-springs of younger mothers; Early marriage is accompanied by greater longevity children"

अशाच प्रकारें, प्रौढ विवाहावर सप्रमाण टीका करणारा किती पुरावा पुढें आणतां येईल. यांतून लक्षांत ठेवावयाचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, चौदा अगर पंधरा वर्षांच्या आंत होणाऱ्या मुलींच्या विवाहाविरुद्ध करण्यांत येणारी ओरड ही निव्वळ अशास्त्रीय अशा पायावर उभारण्यांत आली आहे. प्रौढविवाहामुळें बाळंतपणांत फारच त्रास होतो. यासंबंधानें 'गाईझ हॉस्पिटलने' उपलब्ध केलेला पुरावा अत्यंत महत्त्वाचा आहे. '६० वर्षांपूर्वीं बाळंतपणांत आलेल्या अडचणी व मृत्यू, यांचे प्रमाण किती तरी वाढलेलें आहे.' वैद्यकीय शास्त्रांत किती तरी प्रगति होऊनहि येथील तज्ज्ञ अधिकाऱ्यांवर असा अभिप्राय देण्याची पाळी प्रौढ विवाहानें आणली. इंग्लंडमधील विवाहकालाची मर्यादा साठ वर्षांपूर्वीं पेक्षां आज किती तरी वाढली आहे. आणि त्याचाच दृश्य परिणाम म्हणजे वरील अभिप्राय होय. माता आणि संतति यांच्या आरोग्याशीहि विवाहकालाचा संबंध असतो, तरुण पतिपत्नीपासून निर्माण झालेली संतति आरोग्याच्या व बुद्धिमत्तेच्या दृष्टीनें अधिक सरस असते असा

सिद्धांत बऱ्याच परीक्षणाअंतीं प्रोफेसर ॲन्टोनिओमारो यांनी काढला आहे. २० वर्षांच्या आंतील मातांच्या अपत्यासंबंधानें ते लिहितात—

'Coinciding with the youthfulness of their parents we find the maximum of good conduct and the maximum of higher intelligence.'

इंग्लंडमध्यें विसाव्या शतकाच्या आरंभापासून विशेषतः मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा वाढूं लागल्याचें दिसून येतें आणि त्याचा परिणाम सध्यां असा दिसून येत आहे कीं, २५ वर्षांपुढील कुमारिकांमध्यें क्षयरोगाचा प्रसार फार झपाट्यानें होत आहे. या संबंधीं एका निवेदनांत पुढील उल्लेख आढळतो—

'It is (T. B.) somewhat higher in the better class than in the poorer group, and it is confined to single women.

This rise in mortality in young adult females dates only from the beginning of this century, and may be associated with the strenuous and less sheltered lives now led by these young women.'

## क्षयरोगाचा प्रादुर्भाव

वरील विधानांतील अधोरेखित भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. बेटर क्लास म्हणजेच पांढरपेशा वर्ग होय; आणि या वर्गांतच प्रौढविवाहाचें वंड विशेष असतें व आहे; व म्हणूनच क्षयरोगाला त्यांना द्यावी लागणारी जकात फार मोठी आहे. या लोकांची शरीरस्वास्थ्याची आणि आरोग्याची कल्पना, खाण्यापिण्यावर व कपड्यालत्त्यावर उभारलेली असते आणि यामुळें वरील बाबतींत सुबत्ता असूनहि त्यांना खरें आरोग्य लाभत नाहीं. सुशिक्षित म्हणून मिरविणाऱ्या प्रौढ कुमारिकांची वाढती संख्या क्षयाचें मान वाढविण्यास कारणीभूत झाल्याचें उघड दिसून येत आहे. अशा निःसत्व कुमारिकांचा पुढेंमागें विवाह होण्याचा प्रसंग आलाच तर त्यांच्या अपराधाचें प्रायश्चित्त त्यांच्या संततीस भोगावें लागल्याशिवाय

राहात नाहीं, अर्थात् हे सर्व अनर्थ टाळण्याच्या दृष्टीनें मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा वाढूं न देण्यांत व त्यांना या बाबतींत मातापित्यांनीं अनिर्बंध स्वातंत्र्य न देण्यांतच अधिक 'समाजस्वास्थ्य' आहे असें म्हणण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं. योग्य काळीं होणाऱ्या विवाहांमध्यें दोष म्हणून कांहीं कलाप्रेमी लोक वैधव्याचाच एक बाऊ करून दाखवीत असतात; पण त्यांत कांहींच तात्पर्य नाहीं. पूर्वींच्या कुटुंबसंस्थेंत विधवा स्त्रीचें स्थान सर्वच दृष्टींनीं आदरणीय असें होतें हें आम्ही मागें सांगितलेंच आहे. आज विधवा स्त्रियांची होणारी दैना तिच्या लवकर झालेल्या विवाहाचें फळ नसून प्राचीन कुटुंबपद्धतींत शिरलेल्या पाश्चात्य स्वार्थबुद्धीचें फळ आहे.

## अविभक्त कुटुंब पद्धति व विधवा स्त्रिया

विभक्त आणि अविभक्त कुटुंब यांच्यामध्यें मोठा फरक आहे. प्रचलित विभक्त कुटुंबपद्धतीमुळें विधवांची स्थिति कांहींशी अनुकंपनीय होते, परंतु अविभक्त कुटुंबांत ती तशी होत नसे. कारण यांत वैयक्तिक उत्पादनाला महत्व नसून, कुटुंबांतील सर्वच कर्त्या पुरुषांचा दृष्टिकोन आपल्या एकत्रित कुटुंबाचें स्वास्थ्य पाहण्याचा असे. व्यक्तीच्या उत्पादनांतील कमीअधिकपणा प्रगल्भतेमुळें दृष्टीआड होई व परिस्थितीनें असाहाय्य झालेली व्यक्ति व उपेक्षणीय न ठरतां आदरणीय ठरे! विधवा म्हणजे मोलकरीण समजणाऱ्याहि घरांतील इतर स्त्रियाच असतात! यांत विवाहसंस्थेचा काय दोष? अविभक्त कुटुंब पद्धति व रशियांत सध्यां अस्तित्वांत येऊं पाहात असलेलीं मोठालीं सांघिक गृहें यांतील आर्थिक तत्त्व जवळ जवळ एकाच नमुन्याचें आहे. परंतु हिंदूच्या हाडींमासीं खिळलेली सहृदयता व मानसिक प्रगल्भता रशियांत आज नसल्यानें, त्यांना कायद्यानें हीं गृहें टिकवावी लागतात एवढाच फरक! आर्थिक दृष्ट्या हिंदु स्त्रीला मिळणारें स्वास्थ्य व संरक्षण आजच्या पाश्चात्य स्त्रीला आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण हिंदुसमाजरचनेनें पुरुषांवर घातलेलीं नैतिक बंधनें

इतकीं उपेक्षणीय खास नाहींत. अशा स्थितींत स्त्रीला अत्यंत आवश्यक असें सौख्य व त्यास जरूर एवढें स्वास्थ्य आणि संरक्षण आपल्या समाजरचनेंतच जास्तींत जास्त मिळूं शकतें असें म्हटल्याशिवाय आम्हांस राहवत नाहीं. निपुत्रिक विधवांना योग्य ती सवलत समाज-रचनाकारांनीं ठेविली आहे. रूढीनें या बाबतींत केलेला अन्याय दूर करण्यास कोणीच नको म्हणणार नाहीं, तो हटवादीपणा आहे. विधवेनें अपत्याची इच्छा तृप्त करून घेण्यास योग्य मार्ग गुरू अगर मातापित्यांच्या सल्ल्यानें स्वीकारावा असा स्पष्ट इशारा, मनु, नारद, गौतम, याज्ञवल्क्य, कुल्लुक भट्ट इत्यादि शास्त्रकारांनीं दिला आहे, आणि कांहींनीं याचा प्रत्यक्ष अवलंब केल्याचीं उदाहरणें आहेत. अशा स्थितींत स्त्रीसौख्याची खरी कल्पना हिंदुसमाजरचनाकारांना नव्हती असें म्हणणें म्हणजे धाडस करणें यापलीकडे दुसरें काय म्हणावयाचें?

## पाश्चात्य स्त्रीचें हिडिस स्वरूप

आतां जुन्या समाजरचनेचीं पाळेंमुळे खणून काढण्याची भाषा सर्वत्र ऐकूं येत आहे. या समाजरचनेंतील स्त्रियांचा दर्जा व त्यांना घालण्यांत आलेली गृहाची मर्यादा या गोष्टी स्त्रियांना गुलाम करणाऱ्या असून रानटीपणाच्या द्योतक आहेत असें म्हणण्यापर्यंतहि कित्येक पंडितांची मजल गेली आहे. परंतु हा सर्व भ्रम आहे! आतांपर्यंतच्या लिखाणामध्यें "स्त्री" सुख कल्पनांची व त्यांच्या जीवनांतील आत्यंतिक गरजांची निश्चित दिशा ठरविण्यांत आल्यानें, या दिशेला विरोधी असा कोणताच मार्ग स्त्रियांना खरें सुख मिळवून देणार नाहीं हें त्यांनीं व त्यांच्या "उद्धारार्थ" तळमळणाऱ्या पुरुषांनींहि पण पूर्ण लक्षांत ठेवावें. स्त्रियांच्या संबंधानें फारच जिव्हाळा आणि कळकळ दाखवून त्यांच्या स्वातंत्र्याच्या अघळपघळ गोष्टी बोलणारे पुरुषांपैकीं बरेचसे पुरुष आपल्या स्वैराचाराचा व बेजबाबदारपणाचा मार्ग जास्त निर्वेध करण्याच्या विचारांत असतात व पर्यायानें स्त्रीहितावर, सौख्यावर, आघात करीत असतात हें स्त्रियांनीं

ओळखलें पाहिजे. पाश्चात्य स्त्रीचें आजपर्यंत पुढें करण्यांत येणारें मोहक चित्र, वाढत्या परीक्षणानें, आणि निरीक्षणानें दिवसेंदिवस हिडीस स्वरूप धारण करूं लागलें आहे. व्यभिचार, बेवारस संतती, अनाथालयांत प्रत्यहीं येणारी पोरकी प्रजा, उन्मत्तपणा, यंत्राशीं झगडणारीं एका रूपसुंदरीचीं विद्रुप भुतें, हा जर मानव समाजाचा आदर्श असेल तर ॲन्टीननें म्हटल्याप्रमाणें 'Men have lost their reason' असें म्हणून स्वस्थ बसणें भाग आहे.

चालू आर्थिक दुःस्थिति ही एक स्त्रियांच्या सुखमार्गांतील धोंड आहे, हे आम्हांसही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. परंतु विवाहाचे मार्गांत या अडचणींचा विशेष बाऊ फक्त पांढरपेशावर्गांतच केलेला दिसून येतो, आणि त्यामुळें या वर्गांतील कुमारिकांना स्वाभाविकपणें कित्येक वेळा त्यांची व त्यांच्या पालकांची इच्छा नसूनहि अविवाहित राहावें लागतें म्हणून प्रौढविवाहाचीच स्तुति करावी हा कांहीं तर्कशद्ध मुद्दा नव्हे. प्रौढ कुमारिकांचे व कुमारांचे तांडे बाष्कळ शृंगारकथा व अनुभव सांगत फिरतांना दिसणें हा कांहीं कौतुकाचा विषय नाहीं. समाजाला जडलेला हा रोग आहे. हा व्यक्तिशः त्यांचें नुकसान तर करीलच पण मानवसमाजाने आतापर्यंत संपादिलेल्या, संरक्षिलेल्या आरोग्याचाहि नाश करील. खेडोपाडीं अद्याप ही प्रथा अस्तित्वांत आलेली नाहीं. परंतु ती आणण्याचा कायदेशीर प्रयत्न चाललेला पाहून कोणासहि विस्मय वाटल्यावांचून राहाणार नाहीं. खेड्यांतील लोकांना लाभणारें स्वास्थ्य हिरावून घेऊन त्यांना आपल्याच मालिकेंत बसविण्याचा हा घातकी उपद्व्याप अत्यंत त्याज्य आहे, ही गोष्ट प्रत्येक सुशिक्षित म्हणविणाऱ्या स्त्री–पुरुषांनीं ध्यानांत ठेवावी. घर हें स्त्री–जीवनांतील अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. संततीचें आरोग्य ही स्त्रियांवरील मोठी जबाबदारी आहे. जीवनाला भलतीच उच्च परिमाणें लावून त्याचा नाश स्त्रीपुरुषांनीं करूं नये. जीवनाच्या गरजा अत्यंत

असतात, त्यासाठीं विशेष कांहीं आर्थिक परिस्थिति असावी लागते, असा अर्थ नाहीं. व ही गोष्ट हिंदुस्थान तर कधींच जुमानणार नाहीं.

## आर्थिक स्थितीचा बाऊ

राहावयास झोंपडी, साधें भरडें अन्न, गोड्या तेलाची पणती या गोष्टी राजमहालांहून पूज्य मानणारे, व एवढ्याच सामुग्रीवर आदर्श संसार करणारें आपण मानवसमाजाचे आद्य अध्यात्म गुरू आहोंत. आर्थिक परिस्थितीचा बाऊ करून, जीवनाच्या गरजांसंबंधीं भलत्याच कल्पना करून, तरूण, स्त्रीपुरुषांनीं मृगजलाच्या मागें धावण्यांत अर्थ नाहीं. जीवनांतील सुवर्णकाल निघून गेल्यानंतर म्हाताऱ्या मनानें, पश्चात्तापांत होरपळत, कृतकर्माला दोष देत राहिलेला जीवनक्रम कसाबसा व्यतीत करण्यापेक्षां अंगांत तारुण्य, चैतन्य, जोम, नाचत असतां सहधर्मचारिणीसह प्रतिकूल परिस्थितीशीं झगडत व निसर्गरम्य सुखांचा स्वाद घेत कालक्रमणा करण्यांत स्वारस्य आहे, हित आहे, मौज तर आहेच आहे. वाचनामध्यें अनेक विचार आले. त्यांनीं आमच्या विचारांना चालना दिली. अनेक ग्रंथकर्त्यांनीं आपले विचार वाचावयास देऊन उपकृत केलें. वाटले बहुजनसमाजालाहि त्यांत भागीदार होऊं द्यावें आणि म्हणूनच ही लेखमाला लिहिण्याचें—साहस म्हणा वाटलें तर केलें. कोणाचीं मतें खोडावींत, कोणावर टीका करावी, कुणाची नालस्ती करावी, असा कोणताच उद्देश यांत नाहीं. वस्तुस्थितीचें यथार्थ दर्शन, करण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. कोणास रुचेल, कोणास रुचणार नाहीं. म्हणून वाटलेलें, आढळलेलें सत्य थोडेंच लपवून ठेवावयाचें आहे.

ज्यांच्या बहुमोल विचाररत्नांचा व माहितीचा आम्हा उभयतांना या लेखमालेच्या कामीं अत्यंत उपयोग झाला त्या सर्वांचे आम्हीं आभारी आहोंत.

आम्हांला ही लेखमाला लिहिण्याच्या दृष्टीनें जीं पुस्तकें उपयुक्त वाटलीं त्यांचा नामनिर्देश वेळोवेळीं आम्हीं केलाच आहे. तरी पण

विशेष माहितीच्या दृष्टीनें आम्हांला खालील ग्रंथ अत्यंत उपयुक्त झाले व त्या सर्व ग्रंथकर्त्यांचें पुन्हां एकदां आभार मानून या विषयाच्या अभ्यासूंना त्यांपैकीं जे कांहीं अत्यंत वाचनीय आहेत अशा ग्रंथांची यादी त्यांचे माहितीकरितां खालीं मुद्दाम देत आहोंत.

I. Revolt of modern youth.
II. Companiate marriage.
III. Philosophy of village movement.
IV. Why village movement.
V. Man in indictment.
VI. हिंदूंजें समाजरचना शास्त्र.
VII. आमची लग्नसंस्था.
VIII. मनुस्मृति.
IX. याज्ञवल्क्य स्मृति.
X. Hindoo law by Morison.
XI. Women a vindication.
XII. Reports of different Hospitals.
XIII. Science and Society.
XIV. Unhappy India.
XV. Indian Women.



डॉ. सौ. मनोरमाबाई थत्ते

# संतती--नियमन आणि लोकसंख्या

( लेखिका—डॉ. सौ. **मनोरमाबाई थत्ते,** मुंबई. )

सहाय्यक—**नारायण प. थत्ते.**

जपान, जर्मनी, इटली, इत्यादि राष्ट्रांनीं गेल्या चार पांच वर्षांपासून चालविलेल्या हालचालींची कारण मीमांसा देतांना सदर देशांतील वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न प्रामुख्यानें पुढें करण्यांत येतो, व सांगण्यांत येतें. कीं, वाढत्या लोकसंख्येला अन्नपाण्यासाठीं नवीन क्षेत्र उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनें त्यांचे हे लढे चालू आहेत. हें कारण दिलें जात असतांना त्याच बरोबर देशाची लोकसंख्या वाढावी म्हणून त्यांच्या चाललेल्या अनेक खटपटीं लक्षांत घेतल्या म्हणजे या परस्पर विरोधी क्रियांचें आश्चर्य वाटतें. विवाहाची सक्ति करणें, विवाहासाठीं कर्जें देणें, विवाहितांना नोकरी धंद्यांत सवलती देणें, अधिक संततीच्या मातापित्यांचा जाहीर गौरव करणें, या गोष्टी कशाची साक्ष देतात ? आणि या सर्व प्रकारामुळें स्वाभाविकच असें म्हणावेंसें वाटतें कीं, माणसें संकटें निर्माण करून घेतात आणि मग फिरून त्यावर उपाय योजना शोधून काढण्याच्या नादास लागतात. सध्यांच्या जगाच्या बहुतेक सर्व व्यवहारांतच ही विसंगति दिसून येऊं लागली आहे. आणि संतती-नियमनाची चळवळ व संशोधून काढण्यांत येणारीं साधनें अशाच एका विसंगत वृत्तीचा उत्तम नमूना आहे. मानवांच्या नैसर्गिक प्रवृत्ती इतर प्राणीसृष्टीहून कोणत्याच प्रकारें भिन्न नसतां संततीमुळें पेंचप्रसंग निर्माण होण्याची पाळी एका मानवावरच कां यावी ? हें एक मोठें कोडें आहे.

संतती नियमनाच्या चळवळीचा खरा उगम इंग्लिश भांडवलशाही-मध्यें असल्याची इंग्लंडच्या लैंगिक नीतीमत्तेचा इतिहास लिहिणाऱ्या एका ग्रंथकारानें कबुली दिली आहे. लैंगिक स्वेच्छाचाराला कित्येक वेळां

संतती बंधनकारक होत असल्यानें या रंगेल श्रीमंतांचे लक्ष यावर इलाज शोधून काढण्याचे दृष्टीनें १७ व्या शतकापासून लागले होते, तशांत कांहीं कालानंतर झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळें स्त्रीयांच्या मजूरीची आवश्यकता भांडवलदार वर्गाला अधिकाधिक भासूं लागली, परंतु स्त्री परतंत्र असल्यानें प्रथम तिच्या आर्थिक स्वातंत्र्याचा पुकारा करण्यांत आला, व मग तें अबाधित ठेवण्यासाठीं संतती--नियमनासारखी साधनें सुचविण्यांत आलीं. आभासमय कां होईना. पण विषयसुख मिळून आपत्यांची जबाबदारी कशी टाळतां येईल व स्त्री सदैव कारखानदारीच्या आहारी कशी राहील हा एकच उद्देश या सान्याच्या बुडाशीं होता थोडक्यांत म्हणजे या साधनांचे जोरावर स्त्री ही पुरुषाला निव्वळ एक उपभोग वस्तू म्हणून राहावी व त्याच बरोबर तिजकडून शारीरिक श्रम सदैव आपणांस घेतां यावेत असा डाव भांडवलदार वर्गानें टाकला व तो बऱ्याच अंशानें सफल झाला याबद्दल एक गृहस्थ म्हणतात, ' इंग्लंडमधील कित्येक विवाहीत स्त्रिया आपल्या वैवाहिक जीवनाचा बराच काळ आपल्या पतीच्या इंद्रियतृप्ति प्रीत्यर्थच खर्च करतात. त्यांना स्वतःला मात्र या पासून कोणतेंच सूख मिळत नाहीं. ' याही पुढें जाऊन ते म्हणतात, वैवाहिक सुखोपभोगाच्या सरासरी २५ वर्षें कालमर्यादेपैकीं सुमारे १८ वर्षें इंग्लिश स्त्रियां त्यांच्या पतीची भोग्यवस्तू या दृष्टीनें राहतात. याला कारण संतती–नियमन ! संतती–प्रतिबंधक योजना चालू ठेवून होणाऱ्या संबंधापासून स्त्रीचें समाधान होऊं शकत नाहीं अशा संबंधामुळें तिच्या इंद्रियांचा व्यवहार पूर्ण होऊं शकत नाहीं. त्याला गर्भधारणा आवश्यक आहे असा वैद्यकीय सिद्धांत आहे. प्रजोत्पत्तीची योजना घेऊन जन्माला आलेल्या स्त्रीला जर तिचा वारंवार उपयोग करण्याची संधि मिळाली नाहीं तर तिला नैसर्गिक आरोग्य लाभणार नाहीं. कृत्रिमतेला ते बळी पडलेच म्हणून समजावें. निसर्ग कांहीं मनुष्याच्या लहरीप्रमाणें आपल्या गुणधर्मांत

बदल करण्यास तयार नाहीं. संतती नियमनामुळें कॅन्सर अगर स्तनांचे विकार वाढतात असा तज्ञांचा अनुभव आहे. आरोग्य विषयक अहवालांत यासंबंधीं पुढीलप्रमाणें उल्लेख केला आहे. कॅन्सरचा प्रसार फार झपाट्यानें होत असून मृत्यूसंख्येंत यामुळें फार भर पडत आहे आणि अशा मृत्यूसंख्येत अपत्यहीन स्त्रियांचा फार मोठा भरणा आहे. यावरून उघड दिसतें कीं, वांझपण अगर बुध्या पत्करलेलें वांझपण याच्या बुडाशीं आहे. स्त्रियांची उत्पादक इंद्रियें बराच काळ निष्क्रिय राहतील तर लवकरच त्यांच्या नाशाला आरंभ होईल. असा हेस्टिंग्ज गिडफोर्ड यांनीं दिला आहे. सरकारी अधिकारयुक्त निवेदनें सोडून नुसत्या तज्ञांचे अभिप्राय जरी पाहिले तरी बऱ्याच जणांचें असें म्हणणें आहे कीं, स्त्रियांच्या स्तनांना वेळोवेळीं योग्य तें काम मिळालें नाहीं, त्यांच्या अंगावर मुलें प्यालीं नाहींत तर त्यांना छातीचा कॅन्सर होतो. इंग्लंडमधील घटलेली लोकसंख्या व स्त्रीयामध्यें वाढलेल्या कॅन्सरच्या आजाराचें प्रमाण यांचा परस्पर संबंध असल्याचें कित्येकांनी बोलून दाखविलें आहे. डॉ. गोगन यांनीं साऱ्या अमेरिकन संस्थानांतील जन्ममृत्यूंची नोंद काढून सिद्धांत प्रस्थापित केला आहे कीं, ज्या संस्थानांत जननीचें प्रमाण अधिक आहे त्या संस्थानांत स्त्रीयांना छातीचा कॅन्सर अत्यंत अल्प प्रमाणांत आहे. जगांतील पुष्कळशा देशांची आंकडेवारी घेऊन त्यांचा तुलनात्मक दृष्ट्या अभ्यास केला तर असेंच दिसून येतें कीं, सर्वांत कमी जनन, सर्वांत अधिक कॅन्सरमुळें होणारे स्त्रीमृत्यू इंग्लंडमध्यें आहेत. कमी संततीच्या स्त्रियांना जास्त संततीच्या स्त्रियांपेक्षां हा रोग अधिक प्रमाणांत होतो असेंही आढळून आलें आहे. गरोदरपणा व तदनुशंगिक क्रिया जर वरचेवर त्या प्रमाणांत घडत जातील तर या विकाराला फारसा वाव राहणार नाहीं. वरील सर्व विवेचनावरून दोन निश्चित प्रमाणें काढतां येतात. एक इंद्रियाची निष्क्रियता अगर त्यांचा अनैसर्गिक उपयोग यामुळें रोग उद्भवतात

व दुसरें म्हणजे अपत्यहीन राहून वासनातृप्ति ही गोष्ट स्त्रियांच्या बाबतींत शक्य असत नाहीं. इंग्लंडमधील १४ वर्षांपुढील सुमारें ६० लक्ष स्त्रीयां संततीहीन आहेत. अशा स्त्रियांनीं आपण आरोग्यसंपन्न व सुखी असल्याची घमेंड मारणें हास्यास्पद आहे ही आत्मवंचना आहे. त्यांना एवढें कळत नाहीं कीं, आपल्या या कृतीनें आपण फक्त पुरुषांची वासनातृप्ति करणारीं यंत्रें ठरत आहोंत. जगांतील विवाहसंस्थेचें स्थैर्य नाहींसें होण्यास सुद्धां संततीनियमन फार मोठ्या प्रमाणांत कारणीभूत आहे. स्त्रियांना आपल्या अंतर्गत व्यथांची नीटशी जाणीव असत नाहीं व त्यामुळें नवऱ्याच्या किरकोळ वर्तुणीकीचा बाऊ करून कोर्टांत काडीमोड मागण्यांत येतो. ज्यांना आपल्या खऱ्या दु:खांची जाणीव असते त्या मात्र अगदीं स्पष्ट शब्दांत खुलासा करण्यास मागें पुढें पहात नाहींत. इंग्लंडमधील घटस्फोटांचें परीक्षण करून विवाहसंस्थेला संततीनियमनामुळें धक्का बसला. या माझ्या म्हणण्यांतील सत्य सहज पारखून घेतां येण्याजोगें आहे. १९२१ मध्यें २९०७ स्त्रियांनीं घटस्फोट घेतला आहे. हें प्रमाण वाढत वाढत १९३४ सालीं ३८५५ वर आलें आहे. या घटस्फोट घेणाऱ्या स्त्रियांमध्यें विवाहास दहा वर्षे होऊनही अपत्य न झालेल्या शें. ४१ स्त्रियां आहेत. शेंकडा ३१ स्त्रियांना फक्त एकच अपत्य आहे. १९३० सालीं झालेल्या सुमारें ३००० घटस्फोटांपैकीं १४०० स्त्रियां विवाहानंतरही बराच काळ अपत्यहीन राहिल्या आहेत व १०१३ स्त्रियांना फक्त १ च अपत्य झालेलें आहे. या सर्व आंकड्यावरून सर्वसाधारण कोणतें अनुमान निघतें. अपत्य नसणें हें स्त्रियांना सुखावह होत नाहीं. अतृप्त इंद्रियें त्यांना बेचैन करून हा सोडून दुसरा मार्ग पहावयास लावतात व त्याचे परिणाम घटस्फोटाच्या स्वरूपानें दिसून येतात.

संतती नियमनाचा स्त्रियांच्या एकंदर आरोग्यावर व मनोवृत्तीवर

काय परिणाम होतो याचें एवढें विवेचन झाल्यानंतर सामाजिक दृष्ट्या या प्रश्नाचा थोडा विचार करणें प्राप्त आहे. वाढती लोकसंख्या व त्यामुळें दुष्कर होणारा जीवनकलह याची भडक चित्रें रंगवून कित्येक प्रचारक संतती-नियमनाची पुरस्कार करीत असतांना आढळून येतात. त्यांतील सत्यासत्यही पारखून घेतलें पाहिजे.

आतां स्त्रीहितवादाचेंच एक प्रमुख अंग " संतती-नियमन " याचा थोडा निराळ्या दृष्टीनें विचार करण्याचा प्रयत्न मी या ठिकाणीं करणार आहे. संतति-नियमनाचीं साधणें आरोग्यविघातक अतएव अनैसर्गिक कशीं आहेत याचा विचार मागें झालाच आहे. प्राचीन शास्त्रकारांनीं संयमाचा उपाय संतती-नियमनाचे दृष्टीनें सुचविला आहे. यालाच कोणी वैवाहिक ब्रम्हचर्य असेंही म्हणतात. परंतु संतती-नियमनाच्या साधनांचा पुरस्कार करणारे लोक याला 'अनैसर्गिक' म्हणून त्याज्य ठरवितात ही विशेष आश्चर्याची गोष्ट आहे. त्यांच्या मतांप्रमाणें संयम करण्यांत लैंगिक 'भूक' शमविली जात नाहीं, परंतु संतती-नियमनाची साधनें वापरल्यानें ती शमली जाऊन मूळ संतति वाढूं न देण्याचा जो उद्देश तो साध्य होतो, परंतु ही कल्पनाच चुकीची आहे. कृत्रिम अवयवांनीं आपण कदाचित् आपली वेळ भागवून नेऊं. दाताची कवळी, चष्मे असल्या वस्तु वापरल्यानें आपली नड भागेल, पण नैसर्गिक रीत्या होणाऱ्या इंद्रियव्यापारामुळें मिळणारें सुख व स्वास्थ्य ज्याप्रमाणें त्यांत नाहीं, त्याच प्रमाणें संतति-नियमाची साधनें वापरून होणारा लैंगिक आचार हा नैसर्गिक क्रियांनीं युक्त नसल्यानें अंतीं समाधानकारक होणार नाहीं.... होत नाहीं. असा कित्येक लेखक-लेखिकांनीं आज स्वानुभव म्हणून दिला आहे. निसर्गाचा व्यवहार योग्य त्या मार्गांनीं पार पाडला तरच तो नैसर्गिक, बाकी सर्व व्यवहार-मग ते कोणत्याही उपायांचे अगर साधनांचे साहाय्यानें पार पडलेले असोत ते अनैसर्गिकच.

## अपवाद हा नियम नव्हे !

संतति–नियमनवाल्यांच्या प्रचाराचा सरसहा मारा गरीब लोकांच्यावर विशेष असतो. कोणीतरी एक वीस रुपये मिळविणारे पंत ते कल्पनेनें उभे करतात. त्यांना दहा मुलें असतात व त्यांची पत्नी अकराव्या खेपेस बाळंत असते. ते अगदीं टिचक्या घरांत रहात असून सभोंवार घाण असते. त्यांची दहा मुलें अगदीं अज्ञ असतात. कोठेंतरी अंधाऱ्या खोलींत बाळंत झालेल्या त्यांच्या पत्नीला क्षयाची भावना झालेली असते. अशा स्थितींत सदर पंत तिच्या परिस्थितीचा काडीमात्र विचार न करतां पुढील बारावें बाळंतपण तिच्यावर जुलमानें लादण्याचा प्रयत्न करतात इ. इ. आणि या सर्व दु:स्थितींतून मुक्त होण्यासाठीं स्त्री-पुरुषांना, विशेषत: स्त्रियांना संतती–नियमनाच्या साधनांचा उपाय सुचविण्यांत येतो. संतती–नियमनवाल्यांचे पोतडींत अशा कित्येक गोष्टी शिल्लक पडलेल्या असतात व त्यांचा उपयोग ते तत्वप्रचारासाठीं करीत असतात. परंतु वर वर्णन केलेले देखावे उदाहरणादाखल घेण्याइतके सामान्य आहेत काय ? याचा ते विचार करीत नाहींत. समाजांत अपवादात्मक असणाऱ्या गोष्टींचा दाखला सर्व सामान्य नियम बनविण्यासाठीं घेतां येणार नाहीं. मनुष्यच्या भावना प्रधानतेचा फायदा घेण्यासाठीं जरी वरील उदाहरण उपयोगीं ठरलें तरी व्यवहारदृष्ट्या तें कवडी किंमतीचेंच आहे. इंग्लंडमध्यें ज्या भागांत अठरा विश्वें दारिद्र्य आहे व ज्या दारिद्र्यापुढें हिंदी दारिद्र्यसुद्धां कमी प्रतीचें ठरतें, त्याच भागांतील स्त्रियांची परिस्थिति पाहून सर ऑर्थर न्यूज् होम एके ठिकाणीं म्हणतात, "मोलमजुरी करणाऱ्या लोकांत संतती–नियमनाचा प्रसार करावा म्हणणाऱ्या लोकांत संतति–नियमनाचा प्रसार लोकांचा ठराविक मुद्दा म्हणजे पुष्कळ मुलें होण्यानें यांतील स्त्रियांच्या शरीरप्रकृतीचा ऱ्हास होतो, परंतु या म्हणण्याला काडीमात्र आधार नाहीं." सर्व साधारण आरोग्याची स्त्री बाळंतपणानें निसत्व होते ही कल्पनाच मुळीं चुकीची आहे. हॅरी

कॉक्स् यांनीं केलेल्या "विवाहितांनीं जर संतती-नियमन केलें नाहीं, त्याच्या साधनांचा पुरस्कार केला नाहीं, तर लागोपाठ होणाऱ्या संततीनें ढासळणारें आरोग्य सुधारण्यास खीला वेळ मिळणार नाहीं." या विधानास उत्तर देतांना डॉ. कॅथेराइन म्हणते, "वरील विधानामध्यें बिनचुकपणा अजिबात नाहीं. यांत हें विधान करणाऱ्याचें अज्ञान मात्र चांगलेंच प्रकट होत आहे. त्याला शरीरशास्त्राची, अपत्य जन्माशीं निगडित असलेल्या शारिरिक गुणधर्मांची माहिती नाहीं. अनिर्बन्ध गतीनें अपत्यांची संख्या वाढते हें खरें नाहीं व शरीर ऱ्हासाचाही पण त्याच्याशीं संबंध नाहीं. काल्पनिक दुःखें निर्माण करून त्यावर उपाय सुचविण्याऱ्या या प्रयत्नास अज्ञ लोक फसतील, नाहीं असें नाहीं. परंतु याचे दुष्परिणाम मात्र बहुजन समाजाला भोगावे लागतील.

## नीतिविरुद्ध ओरड

इंग्लंडसारख्या देशांत, व विशेषतः फ्रान्समध्यें, अविवाहित राहून विवाहितांचीं सुखें या साधनांचे जोरावर उपभोगण्याची प्रथा फार जोरानें वाढत आहे. भावी अपत्यजोपासनेची तयारी नसल्यामुळें अशा अनैतिक संबंधांना ऊत आला आहे. कुमारिकेशीं संबंध ठेवतांना प्रसंगीं आपणांस विवाहबद्ध होऊन भावी जबाबदारी स्वीकारावी लागेल एवढें दडपण मनावर असल्यानें तरुणांची मजल चटकन् अनैतिक संबंधापर्यंत जात नसे. परंतु आतां वरील साधनें अस्तित्वांत आलीं असल्यामुळें अशा संबंधाचा विधि निषेध फारसा राहिलेला नाहीं, त्यामुळें विवाह संस्थेचें स्थैर्य स्वाभाविकच नष्ट होण्याच्या पंथाला लागलेलें असून भावी पिढ्यांची स्थिरता व आरोग्य ही त्याबरोबरच नष्ट होत आहेत. "या आक्षेपावर संतती-नियमनवाले एक ठराविक उत्तर देत असतात. परिणामाच्या भीतीवर उभारलेली नीतिमत्ता ही कांहीं खरी नीतिमत्ता नाहीं, खरी नीतिमत्ता अशी असावी कीं, तिला कांहीं तरी उच्च भावनांचा आधार असावा. परिणामाच्या भीतीचें दडपण तिच्यावर असूं नये." खरी नीतिमत्ता, खोटी

नीतिमत्ता, हे शब्द उगाच दिशाभूल करणारे आहेत. समाजाच्या चालीरीतीसंबंधीं लिहिलेले अगर न लिहिलेले पण समाजधारणेला उपयुक्त, पोषक असे सर्व नियम, निर्बन्ध नीतिमत्तेचे द्योतक असतात, आणि या निर्बंधांचें उल्लंघन करणारी प्रत्येक कृति अनीतिमानच होय! दंडाची भीति असल्याशिवाय नीतिमत्ता लोकांवर लादतांच येत नाहीं. आपल्या घरांतील मालमत्ता सुरक्षित राखण्यासाठीं आपण जपत असतो. कारण बहुजन समाजाची प्रवृत्तिच ही कीं, सहज एखादी हाताला लागण्यासारखी वस्तु दिसली कीं घातली खिशांत! चोरीसंबंधीं इतके कायदे दंडक असूनही चोऱ्या होतात म्हणून जपावें लागतें; मग हे कायदे नसते तर विचारावयासच नको! योग्य भीतीच्या अभावीं नीतिनियम फोलच ठरतील! दंडाच्या भीतीनें गुन्ह्याची प्रवृत्ति कमी झाली म्हणून ती नीतिमत्ता नव्हे असें म्हणणें म्हणजे निव्वळ शब्दच्छल करणें होय.

निसर्गानें आपणांवर लादलेले निर्बन्ध पाळणें, त्यांची अवहेलना न करणें, हीसुद्धां एक प्रकारची नीतिमत्ताच आहे. अशा नियमांचा उल्लंघनालासुद्धां निसर्गानें कठोर प्रायश्चित ठेविलें आहे. आपल्या शरीर-यंत्राच्या स्वाभाविक गुणधर्माची अवहेलना करणारी प्रत्येक व्यक्ति अंती दु:खी झाल्याविना राहात नाहीं. तेव्हां या दु:खांना भिऊन व्यक्ति आरोग्याचे नियम व्यवस्थित पाळतात. अतएव ही खरी नीतिमत्ता नव्हे असें म्हणून चालणार नाहीं. समाज आणि व्यक्तीचे वैयक्तिक नैसर्गिक नियम निर्बन्ध याखेरीज आणखीही कांहीं निर्बन्ध व्यक्तीला पाळावे लागतात. त्याला आपली कौटुंबिक कर्तव्यें म्हणून कांहीं असतात, त्यांचे पालनही त्याला करावें लागतें. परंतु संतती-नियमनाच्या साधनांनीं जर भावी परिणामांची भीति कमी केली अगर तसा नुसता आभास निर्माण केला, तर या प्रत्येक कर्तव्यांत मानव चुका केल्याशिवाय राहणार नाहीं. कर्तव्यांत चुकणें म्हणजेच मानवसमाजानें अनीतिमान होणें, आणि अनीतिचा परिणाम म्हणजेच हानि!!

## मोठ्या कुटुंबाची भीति !

संतती-नियमनवाल्यांचा खरा कटाक्ष मोठ्या कुटुंबावर आहे. परंतु पिढीच्या व व्यक्तीच्या स्वास्थ्यभंगाच्या दृष्टीनें या कटाक्षांत कितपत तात्पर्य आहे हें पहाण्यास हरकत नाहीं. मोठालीं कुटुंबें अस्तित्वांत आल्यानें लोकसंख्येची भरमसाट वाढ होऊन देशाचा आर्थिक तोल सुटतो एवढाच मुद्दा असता तर फारसा प्रश्न नव्हता. परंतु सामान्य जनतेच्या मनांत मोठ्या कुटुंबाविषयीं एक निराळीच भीति त्यांनीं निर्माण केली आहे. वारंवार गरोदरपणा, व बाळंतपण म्हणजे पुरुषांचा अमानुष जुल्म व स्त्रियांची आणि मुलांची भयंकर हानी असा आभास निर्माण करून त्याच्या रसभरित वर्णनानें सामान्य जनतेला भिववून ते आपला कार्यभाग साधीत असतात. संतती-नियमनवाल्यांनीं जास्तींत जास्त चार ही अपत्यसंख्या धरली आहे. म्हणजे मोठ्या कुटुंबाचा विचार करतांना चारीपेक्षां जास्त अपत्यें असलेलीं कुटुंबें एवढी गोष्ट गृहीत धरण्यास हरकत नाहीं. सर्वसाधारपणें प्रत्येक अपत्यांमध्यें २–३ वर्षें जातात. अपत्यधारणेला अगदीं अनुकूल अशा कालांत विवाह झाला तर अपत्यधारणा बंद होईपर्यंतचे कालांतहि सरसहा संतती झाल्यास अपत्यांची सरसकट संख्या जास्तींत जास्त दहा ते बारापर्यंत जाईल. कुटुंबाच्या मोठेपणाची कल्पना सहसा दहा ते बारापर्यंत जाईल. कुटुंबाच्या मोठेपणाची कल्पना सहसा याच्यापुढें जाऊं शकत नाहीं. तेव्हां मोठें कुटुंब म्हणजे पांचापासून बारापर्यंत ज्यांना अपत्यें आहेत अशांचें कुटुंब असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्त्रियांच्या अपत्यधारणेचा काल सरासरी वयाच्या चवदा वर्षांपासून ४५ वर्षांपर्यंत असतो. कांहीं अपवादात्मक उदाहरणामध्यें हा काल ५० वर्षांपर्यंतही जातो, नाहीं असें नाहीं. या सव्वीस वर्षांच्या कालावधींतील बराचसा काल विवाह लांबणीवर पडल्यानें फुकट जाण्याचा संभव असतो. परंतु २॥ ते ३ वर्षांस एक या प्रमाणांत सरसहा अपत्यें झाल्यास ८ ते १० पर्यंत त्यांची संख्या जाते.

## कुटुंबवाढीची अनर्थपरंपरा ?

मग वर दिलेले हे १० ते १२ हे आंकडे अगदीं कमाल जास्त मर्यादेचे म्हणून धरण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं. मोठ्या कुटुंबानीं लोकसंख्या फाजील वाढते व संतती-नियम-वाल्यांच्या दृष्टीनें जे खालील दोन अनर्थ ओढवतात त्यांचा विचार करूं. पहिला अनर्थ म्हणजे लोकसंख्या फाजील झाल्यानें अन्नाचा तुटवडा व गरिबी. दुसरा म्हणजे, कुटुंबांतील अपत्यांची संख्या वाढल्यानें कुटुंबाच्या मर्यादित उत्पादन-सामर्थ्याला हा ताण सहन होणार नाहीं. व त्यामुळें अपत्यांची व त्याज-बरोबर मातेचीही कुचंबणा होईल. तूर्त हे दोन आक्षेप जरा बाजूला ठेवून आणखी कांहीं आक्षेप प्रथम पाहूं. तिसरा आक्षेप असा आहे कीं, मातांचे नैसर्गिक आरोग्य बिघडून त्यांना व पर्यायानें त्यांच्या संततीला याचे दुष्परिणाम सर्व आयुष्यभर सहन करावे लागतात. वरील तीन मुद्यांपैकीं तिसऱ्या मुद्यांत फारसा राम नाहीं हें मीं मागें सांगितलेंच आहे. संतती-नियमनवाल्यांनीं सामान्य जनतेला भेडसावण्यासाठीं उभारलेला हा लाल बावटा आहे. गरोदरपण व बाळंतपण या अगदीं स्त्रीसुलभ नैसर्गिक क्रिया असल्यानें आरोग्यसंपन्न स्त्रीला अधिक अपत्यें होणेंच श्रेयस्कर आहे. तिच्या लैंगिक व्यवहाराची परिपूर्णता त्यांत असल्यानें तिच्या सुखाची पूर्ति त्यामुळें चांगली होते. स्त्रियांच्या अपत्य धारणेच्या कालाची जास्तींतजास्त मर्यादा तीसच वर्षांची असल्यानें या कालांतील तीन किंवा चारच अपत्यांना लागणारा सुमारें १० वर्षांचा काल वजा केला तर बाकीची तीस वर्षें स्त्रियांना लैंगिक सौख्य मिळालेंच नाहीं असाच याचा अर्थ होईल. स्त्रीशी समागम होतांच पुरुषांचा लैंगिक व्यवहार पूर्ण होतो. त्यांची तृप्ति होते, पण स्त्रियांच्या बाबतींत ही गोष्ट जरा निराळी आहे. समागमानंतर तिच्या इंद्रिय व्यवहाराला आरंभ होतो व ही क्रिया आपल्या अंगावर मूल पिऊं लागून सुटल्या-नंतर पूर्ण होते. म्हणजे पुरुषांच्या कार्याचा शेवट तो स्त्रियांच्या

कार्याचा आरंभ होय ! आणि पुरुषांप्रमाणें समागमोत्तर स्त्रीचाही व्यवहार तेथेंच पूर्ण होईल तर त्यामुळें तिचीं बरीचशीं इंद्रियें निष्क्रीय राहतील. आणि या निष्क्रियतेचे परिणाम काय होतात हें मागेंच सांगितलें असल्यामुळें फिरून तेंच आतां सांगत नाहीं. यानंतरचा आक्षेप मुलांची हेळसांड होणें हा आहे. यांतील हेळसांडीला आर्थिक दुस्थिति हें एक कारण असेल, पण याचा विचार मी जरा पुढें करणार असल्यानें आणखी इतर कोणत्या बाबतींत. मुलांची हेळसांड होते कीं काय एवढेंच येथें पहावयास हरकत नाहीं. मोठ्या कुटुंबांतील मुलांची शारीरिक व मानसिक दृष्ट्या फारच उत्तम रीतीनें वाढ होते असें बऱ्याच मोठ्या कुटुंबांचे परीक्षणांतीं दिसून आलें आहे. इतर भावंडांच्या मेळ्यामध्यें त्यांना सामुदायिक आयुष्याचे पाठ घरच्या घरीं मिळतात. त्याचप्रमाणें स्वभावभिन्नत्वाचे नमुने घरच्या घरींच चाखावयास मिळाल्यामुळें लहानपणींच बाहेरच्या समाजाशीं येणाऱ्या संबंधाची प्रथम तयारी केली जाते. स्पेन्सरच्या म्हणण्याप्रमाणें कर्तबगार माणसें मोठ्या कुटुंबांतून निर्माण होतात. सर थॉमस हार्डर म्हणतोः—

It would be a misfortune if the large family entirely ceased to exist. This is not seldom the source whence genius springs and if not genius, then thrift, pattience, discipline, the habit of work and spirit of brother-hood–virtues which make valuable contribution to society. Families of one or two and a metriculous care to limit a family, results very often in one or two instead the provebial quiverful........too frequently breed the spoilt child, the new rote and the man or woman though richly endowed both in means and education is off times a paracite upon the community (Medical views on birth Control.)

## कर्तबगारीला पुरुषांचा अपत्यक्रम.

संततीनियमनवाल्यांनीं आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी म्हणजे कर्तबगार पुरुषांचीं जर यादी काढली तर त्यांत शेंकडा ८० लोक हे चवथ्या अगर पांचव्या क्रमाच्या पुढील अपत्यें असतात. म्हणजे जर सरसहा संततीनियमनाचीं साधनें उपयोगांत आणलीं गेलीं असतीं तर कित्येक कर्तबगार माणसेंच जन्माला आलीं नसतीं, व मोठी हानी झाली असती. यासंबंधीं एका इंग्लिश ग्रंथकारानें दिलेली यादी मोठी मजेशीर आहे. त्यांत एडवर्ड लीयर हा २१ वा मुलगा आहे. ब्रोवान १३ वा, फ्रॅन्कीन १२, स्कॉट ९ वा व डार्विन ५ वा याप्रमाणें अनुक्रम आहेत. इमरसन, रॉसेटी, टेनिसन, टॉलस्टाय, ग्लॅस्टडन, जेम्स वॅट, इत्यादि महापुरुषहि पण जगाला संतती नियमनवाल्यांनीं दिसूं दिलें नसतें. उत्क्रांतीतत्वाला अनुसरून प्रथम संततीपेक्षां पुढील संतती शरीर व मानसशास्त्रदृष्टया अधिक कर्तबगार निपजत असते. संततीनियमनानें अधिक कर्तबगार पिढी तेवढी नेमकी खच्ची केली जाईल व एकंदर मानव वंशाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें हा एक प्रकार अनिष्ट आहे.

## वाढत्या लोकसंख्येची आपत्ति ?

संततीनियमन न केल्यास लोकसंख्येची बेसुमार वाढ होईल. व मोठी आपत्ति कोसळेल अशीही कांहीं कल्पना केली जाते. पण ती वस्तुस्थितीला सोडून असते. इंग्लंडमध्यें ज्या वेळीं सुमारें १०० वर्षांपूर्वी प्रथम संततीनियमनाचा पुरस्कार करण्यांत आला, त्या वेळीं तत्कालीन इंग्लंडला दारिद्र्याचीं भडक वर्णनें देऊन संततीनियमन-वाल्यांनीं सांगितलें कीं सुमारें १०० वर्षांनीं, जर याच प्रमाणांत इंग्लंडची लोकसंख्या वाढली तर लोकांना खावयासहि मिळणार नाहीं, आणि मोठा अनर्थ होईल. परंतु सांगण्याची गंमत ही कीं, खरोखरच

त्यांच्या अंदाजाप्रमाणें इंग्लंडची लोकसंख्या वाढली असूनहि दारिद्र्य मात्र त्या वेळच्या मानानें काटाभर कमीच आहे.

संततीनियमनाचा इतिहास काढून पाहिला तर असें दिसतें कीं, संततीनियमनावरील पहिलें पुस्तक डॉ. ड्रेसडेल यानें १८५४ मध्यें लिहिलें. त्यानंतर १८७७ सालीं "माल्थ्यूजियन लीग" नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली. स्त्रियांच्या गर्भधारणेला म्हणजे संततीला आळा घालून लोकसंख्येला आळा घालण्याचा उद्देश या सर्वांचे बुडाशीं होता. त्यानंतर इतरही अनेक मुद्यांची जोड संततीनियमनवाल्यांनीं आपल्या प्रचारासाठीं घेतली; परंतु संतती-नियमनाचा मूळ उद्देश म्हणजे लोकसंख्येची अमर्याद वाढ करूं न देतां तिचें नियंत्रण करणें हाच होता. गेल्या शतकांतील संततीनियमनवाल्यांप्रमाणें आजचेही लोक हाच मुद्दा पुन्हां पुन्हां कंठशोष करून मांडीत असतात. पाश्चात्य राष्ट्रांनीं लोकसंख्येचा केलेला बाऊ कितपत खरा आहे हें आतां पाहूं. १९२५ सालीं लोकसंख्येची परिस्थिति खालीलप्रमाणें होती:—

| देश | लोकवस्ती दर चौ. मैल | देश | लोकवस्ती दर चौ. मैल, |
|---|---|---|---|
| इंग्लंड | ८०१ | इंग्लंड आणि वेल्स | ६४९ |
| बेलजम | ६३५ | हॉलंड | ५८० |
| ग्रेट ब्रिटन | ४८१ | जपान | ३९० |
| जर्मनी | ३४५ | इटली | ३२३ |
| डेन्मार्क | २०६ | फ्रान्स | १८४ |
| यू. एस् ए. | ३५ | | |

ड्रेसडेलनें आपलें पुस्तक लिहिलें त्यावेळीं इंग्लंड आणि वेल्सची मिळून लोकसंख्या १७,९२७,६०९ इतकी होती. तीच १९२५ सालीं ३७,८८५,२४२ इतकी म्हणजे दुप्पटीपेक्षांहि अधिकच झाली, आणि इतकें असूनही, एका चौरस मैलावर पूर्वींच्या लोकसंख्येच्या

दुप्पट लोकसंख्येचा बोजा पडूनहि इंग्लंडवर कोणतीच आपत्ति ओढवली नाहीं.

"ग्रेटब्रिटनची लोकसंख्या अशीच वाढल्यास सुमारें ५० वर्षांनीं ती ५,००,००० होईल व काय अनर्थ ओढवेल याची कल्पना आहे काय !" अशी ड्रेसडेलनें १८५४ सालीं भीति व्यक्त केली आणि खरोखरच त्याच्यानंतर पन्नास वर्षांनीं म्हणजे १९१०–११ चे दरम्यान ग्रेटब्रिटनची लोकसंख्या ४५,३७०,५३० वाढली. परंतु त्यामुळें धोका असा तर झालाच नाहीं; पण उलट महायुद्धाची आपत्ति सहन करण्याची शक्ति मात्र इंग्लंडला आली. ब्रिटिश लोकांत दारिद्र्याची वाढ झाली म्हणावें तर तसेंही नाहीं. कारण इंग्लंडच्या व्यापारांत व नवीन वसाहतींतही त्याच प्रमाणांत वाढ झाली. इंग्लंडची आयातही खूपच वाढली; इंग्लंडच्या आयात निर्यातींत फार मोठा फरक पडला आहे.

| सन | निर्यात ( इंग्लिश वस्तू ) | आयात |
|---|---|---|
| १९१३ | १०० | १०० |
| १९२४ | ७६.१ | १०६.६ |
| १९२५ | ७६ | १११.८ |
| १९२६ | ६७ | ११७.४ |

म्हणजे इंग्लंडची निर्यात कमी होत असून आयात वाढत आहे याचाच अर्थ जनतेची खरेदीशक्ति ( परचेसिंग पॉवर ) वाढली आहे व लोकसंख्येचें पोषण होत आहे. याची कल्पना त्यावेळीं ड्रेसडेलला असणें शक्य नाहीं. सध्यांच्या संततीनियमनवाल्यांना हाच न्याय लागू आहे. उद्यांच्या जगाची उत्पादन शक्ति कशी वाढणार आहे, कोणते नवीन देश वसाहतीखालीं येणार आहेत, कोणत्या आपत्ति जगावर ओढवणार आहेत, याची कल्पना नसतां उगाचच लोकसंख्येचा बाऊ करून नसती काळजी करण्यांत काय तात्पर्य आहे. १८५४ सालच्या ड्रेसडेलला

ज्याप्रमाणें १९११ सालीं अगर पुढें काय होणार आहे हें न कळल्यामुळें आपलीं विधानें खोटीं करून घेण्याचा प्रसंग आला तोच प्रसंग १९८०–९० सालीं आजच्या लोकसंख्येचा बाऊ करणाऱ्या संततीनियमनवाल्यांवर खास येईल. तेव्हां अर्थात् लोकसंख्येची वाढ ही भीति संततीनियमनासाठीं पुढें करणें अव्यवहार्य होणार नाहीं. परंतु आजचे संततीनियमनवाले, लोकसंख्येचा निष्कारण बाऊ करून फिरून हीच चूक करीत असतात. वाढत्या लोकसंख्येला चरितार्थाचीं, उत्पादनाचीं नवीन साधनें निर्माण करावीं लागतात व तीं निर्माण होतीलही. लोकांचा चरितार्थ चालतो. तो कधीं अडून राहात नाहीं. कांहीं लोकसंख्या बेकार असते, ती तशी असावीही लागते. तें एक राखीव सामर्थ्य आहे. कांहीं आकस्मिक कारणें निर्माण होतांच या राखीव सामर्थ्याचा उपयोग होतो. असें राखीव सामर्थ्य नसेल तरच कित्येक वेळां पंचाईत पडते. भविष्य काळांत निर्माण होणारीं जीवनाचीं नवीं नवीं साधनें आपणांस आज अजमावितां येणार नाहींत. भावी पिढ्यांच्या दुःखाच्या खोट्या कल्पनांनीं आजच्या पिढीला संकटांत लोटणें कधींही प्रशंसनीय होणार नाहीं. हिंदुस्थानच्या विस्ताराला व समृद्धीला ७० कोटी प्रजा पोसण्याचें सामर्थ्य आहे असा अर्थशास्त्रज्ञांचा कयास आहे. सध्यांच्या परकीयांच्या लुबाडणुकीमुळें होणारी हीन दशा कांहीं कायम टिकणारी नाहीं. हिंदुस्थानच्या मालकांनी हिंदूच्या आपल्या संततीला आळा घालण्याचें मुळींच कारण नाहीं. वाढती संख्या आपणांस जागा व सुबत्ता मिळविण्यासाठीं आकांड तांडव करील. आपली सोय लावून घेईल. प्रचलित दारिद्र्य बेकारी, तीव्रतर करण्यानेंच भावी सुबत्ता निर्माण होण्याची अधिक आशा आहे. सरकारची चाकरी मिळेल तेवढीच प्रजा ठेवावी असें म्हणून दासवर्ग निर्माण करण्याकरितां झटण्याचें कारण नाहीं. घरीं एक दोनच लाडोबा असले म्हणजे आईबापांच्या देखरेखीखालीं वाढलेले हे गुळाचे गणपती कर्तबगार शून्यच निपजतात. महिन्याला खर्चाचा आढावा तयार करून खिशांतून

पैसे काढावेत त्याप्रमाणें, भावी सुबत्ता, माणसांची आवश्यकता लक्षांत घेऊन संतती वाढावी अगर कमी करावी इतका हा व्यवहार सोपा नाहीं. एकादा नवीन शोध लागला म्हणजे दहापांच हजार माणसें कामाला लागतात. संसती-नियमनाचा अवलंब करून मानवाला ही तोंडमिळवणी एकाएकी, एका दिवसांत वा एका वर्षांत करतां येणार नाहीं. या गोष्टी लक्षांत घेतां, वाढत्या लोकसंख्येचा वृथा बाऊ करण्यांत हंशील नाहीं. हें दिसून येणार आहे. खरोखर अशी लोकसंख्या एकसारखी वाढतच राहिली असती तर आजच जगांत माणसाला राहावयास जागा मिळा-वयास नको होती. पण तसा प्रकार नाहीं.

मनुष्याचा निसर्गाशीं चाललेला झगडा अनादि तसाच अनंत आहे. संततीनियमन हाहि एक निसर्गाशीं मांडलेला लढाच असून त्यांतील मनुष्याला बव्हंशी हारच खावी लागते. निसर्गनियमानें होणार विस्तार ज्या वेळीं निसर्गालाच डोईजड होतो त्यावेळीं कांहीं अतर्क्य अशा प्रकारानीं त्या विस्ताराचाही नाश करून समस्थिति निर्माण करीत असतो. ना रोगराई ना युद्ध ना भांडणतंटा ना मृत्यू अशी न न ची स्थिति केव्हांच येऊं शकणार नाहीं. माणसानें एवढेंच करावयाचें कीं, नैसर्गिक व्यवहार असे चालू ठेवून निसर्गाशीं तंव्याऐवजीं सहकार्य करावयाचें !

कल्पनेचीं भुतें निर्माण करून त्यावर तोडगे काढण्याचा रिकामा उद्योग म्हणजेच संततीनियमनाची चढाओढ होय ! असल्या वृथा कार्यानें मनुष्य आपला वेळ वाया तर घालवतोच, पण या रिकाम्या उद्योगांनीं सामा-जिक जीवनावरही दुष्ट आघात करीत असतो. तरी अशा प्रकारांना सूज्ञांनीं तरी त्वरित आळा घातला पाहिजे.

११–५–३९

डॉ. सौ. मनोरमाबाई थत्ते

मु॥ सांगली.

भवानराव श्रीनिवासराव पंडित प्रतिनिधी सं. औंध नमस्कार वि. वि.

तुम्ही व रा. नारायण परशुराम थत्ते, आपले यजमान, यांनीं केसरीमध्यें आतांपर्यंत 'वाचा आणि विचार करा' या सदराखालीं जी १०–१२ लेखांची लेखमाला लिहिली ती आम्हांस फार आवडली. सदरहू लेखमालेंत तुम्ही संतति-नियमन व स्त्रियांच्या विषयासंबंधी जी शास्त्रीय साधक बाधक चर्चा केली ती जनतेला फारच उद्बोधक होईल अशी आमची खात्री आहे. ही लेखमाला लिहिल्याबद्दल तुमचें उभयतांचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे.

सदरहू लेखमालेचा प्रसार शक्य तेवढा जास्त व्हावा अशी आमची इच्छा आहे. सदरहू लेख पुस्तकरूपानें आपण एकत्र केलें असल्यास त्याची प्रत आमचेकडे पाठवावी. जरूर पडल्यास त्याच्या अधिक प्रती घेण्याची आमची इच्छा आहे.

कळावें, बहुत काय लिहिणें हे विनंति.

भवानराव,

राजेसाहेब संस्थान औंध.

REFBK-0005985

वाचा आणि विचार करा

या मालेपैकीं

## ३ रें पुस्तक

# पाश्चात्य

# स्त्री-समाज-दर्शन

लौकरच प्रसिद्ध होईल.

# पुरुषद्वेष्ट्या कुमारिका

ज्या मुली वयाची पंचविशी गांठतात त्यांच्या ठिकाणच्या नैसर्गिक वासना हळूहळू मृतप्राय होऊं लागतात. तृप्तीसाठीं धडपडणारीं इंद्रियें अनैसर्गिक साधनांचा मारा होतांच हळूहळू चेतनाहीन बनूं लागतात. यौवनसपन्न व तेजस्वी कुमारिकेंतून दुर्मुखलेली, दुबळी, क्षीण, कांतिहीन अशी ही प्रौढ कुमारी निर्माण होते.

अशा प्रौढ कुमारिकांकडून व अतृप्त स्त्रियांकडूनच सहसा पुरुष-द्वेषाचीं विधानें केलीं जातात; आणि त्याच्या बुडाशीं तत्व नसून मानव्य-सुलभ सूडबुद्धिच असते. यौवन-भरामध्यें उत्साहानें, आशेनें जीवाला कवटाळण्यासाठीं आपले हात पसरणारी तरुण स्त्री हातांमध्यें योग्य तें वरदान घेतल्याशिवाय हात मागें घेऊं शकत नाहीं. तिच्या जीवनाला कायम चैतन्य प्राप्त करून देणारी शक्ति या प्रसंगीं तिच्या हातांत प्रसादरूपानें पडली नाहीं तर निराशेचा दारुण आघात एखाद्या कोमल वेलीवर झालेल्या वज्रघाताप्रमाणें चूर्णविचूर्ण केल्या-शिवाय ती राहणार नाहीं.

( आदर्श स्त्रीजीवन )

# केसरी

मंगळवार तारीख ९ माहे मे सन १९३९.

## पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना.

### "वाचा आणि विचार करा"*

सांगलीचे रहिवासी श्री. नारायण परशुराम थत्ते व सौ. डॉ. मनोरमाबाई थत्ते यांनीं 'वाचा आणि विचार करा' या नांवाखालीं लिहिलेली लेखमाला शुक्रवार ता. २८ एप्रीलचे केसरींत संपली. सदर लेखमाला आपणांस आवडल्याचें अनेकांनीं आम्हांपाशीं बोलून दाखविलें आहे व तिजविषयीं प्रशंसापर पत्रेंही आम्हाकडे आलीं आहेत. हे लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावें अशीही इच्छा कित्येकांनीं प्रदर्शित केली आहे. स्त्री व पुरुष या दोन घटकांवर अखिल मानवसमाजाची उभारणी आहे. त्यांचे परस्पर संबंध फार प्राचीन काळापासून प्रत्येक देशांत ठरले असून पूर्वकालीन हिंदूंनीं त्यासंबंधीं अनुभव घेऊन व अत्यंत खोल विचार करून शास्त्रही बनविलें आहे. परंतु नव्या काळांत नवीन कल्पना पुढें येतात व पूर्वजांच्या मागून आपण आलों या घमेंडींत त्यांजपेक्षां स्वतःला अधिक शहाणे व विचारी समजण्याचा मोह मनुष्यास न आवरल्यामुळें प्राचीनांच्या ज्ञानास तुच्छ मानून नवीन वहिवाटी व नवीन विचारसरणी रूढ करण्याचा प्रयत्न, प्रथम पश्चिमेकडील देशांत व त्यांच्या मागून त्यांच्या अनुकरणानें आमचे देशांतही गेल्या ४०-५० वर्षांत सुरू झाला. त्याचे बरेवाईट परिणाम आतां सर्वांच्या हळूहळू प्रत्ययास येऊं लागले असून पूर्वींच्या समाजशास्त्रांत पुष्कळ तथ्य असल्याविषयीं समाजहितेच्छू विचारी लोकांची खात्री पटत चालली. **'वाचा आणि विचार करा'** या लेखमालेच्या विद्वान लेखकांनीं महाराष्ट्रीयांचे विचारसरणीस या दिशेनें जोराची चालना दिली आहे यांत शंका नाहीं. त्यांतून लेखक केवळ पुरुष अगर स्त्रीवर्गातील नसून दोनही वर्गांतील असल्यामुळें एकांगीपणाचा अगर अन्यायाचा दोष त्यांस देण्याचे कोणीही धाडस करणार नाहीं. मानवी जीवनांत विचारांना चालना हा महत्वाचा भाग असून त्या कार्यांत लेखकद्वयानें यश मिळवलें आहे. त्याप्रमाणें क्रिया ही पुढची व कांहींशी बिकट पायरी असली तरी ती गाठण्याचा प्रयत्न केल्याशिवाय मानवसमाज कधींही राहाणार नाहीं असा आमचा दृढ विश्वास आहे. **आधुनिक विचारसरणींतील दोष दाखवण्याची व सद्यःस्थितीवर उपाय सुचवण्याची कामगिरी विद्वान थत्ते पतिपत्नींनीं इतक्या कुशलतेनें व परिश्रमानें केल्याबद्दल** आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतों.

* हीच लेखमाला आज "आदर्श स्त्रीजीवन" म्हणून प्रसिद्ध होत आहे.